# माणूस

शनिवार । १४ फेब्रुवारी १९८१ । एक रुपया

## मुर्दाड साहित्य संमेलन


पृष्ठ....३

म्हणून 'सलाम' ही एक चिरंतन समस्या आहे.

पृष्ठ...१७

## जिवंत चित्रपट

पृष्ठ...२१



अंकुर ते आक्रोश
अंधुक आशावादाकडून
घोर निराशावादाकडे...

शबाना
स्मिता पाटील

# दिवट्यांनो, पेटवा दिवट्या

'इथे मराठीचिये नगरी' गेल्या काही दिवसात आम्हास मोठी धमाल दिसून येत आहे. साहित्य-संमेलनाहून अनेक जण हातात दिवट्या घेऊनच परतले असून 'ज्योत से ज्योत जलाते चलो' हे गाणे मौजेने गात दिवट्या पेटवत फिरत आहेत. आम्ही एकास विचारले, 'बाबांनो, हे काय चालले आहे?' तेव्हा तो तत्काळ उत्तरला, 'साहित्यसंमेलनात बाप्पा शिवगडकरानी दिलेल्या संदेशानुसार हा कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे!'

'दिवट्या पेटविण्याचा संदेश?'

'हो, हो. ज्ञानाच्या दिवट्या.'

'आनंद आहे.'

'सारे संमेलन हा एक अपूर्व आनंदसोहळा होता. साऱ्या संमेलननगरीला आनंदवनभुवनाचेच स्वरूप प्राप्त झाले होते.'

आणि एवढे बोलून तो मौजेने बागडत दिवटी घेऊन गुंग झाल्यासारखा पुढे निघून गेला.

आम्हीही संमेलनास गेलो होतो; पण आमची दिवटी काही पेटली नाही. या इतर दिवट्यांच्या प्रकाशात आमच्या पुढे संमेलनाच्या आधीची आणि नंतरची काही दृश्ये तरळू लागली. पुन:प्रत्ययाचा की कसला म्हणतात तो अनुभव आम्हास येत गेला...

(१)

स्थळ : संमेलनाध्यक्ष तुकाराम रामदास उपाख्य बाप्पा शिवगडकर याचे निवासस्थान. डोळे मिटून, दाढीवर हात फिरवत कसल्या तरी तंद्रीत असल्यासारखे बाप्पा बसलेले. कुणी तरी धावत धावत येतो.

तो: बाप्पा, बाप्पा, मंत्री डॉ. तारे तुम्हाला भेटायला येत आहेत. साहित्य-संमेलनासंबंधी काही तरी बोलणार आहेत म्हणे ते. साहित्यपुरस्कार नाकारण्याबद्दल सरकारचा निषेध संमेलनात होऊ नये, अशी त्यांची इच्छा असल्याचे कानी आले.

बाप्पा : (तंद्रीतच) येवोत, मंत्री येवोत, मंत्री येवोत, कुणीही येवोत. असे किती एक मंत्री आले आणि गेले, बाप्पा. पण ज्ञानियांच्या राजाने तेवविलेला हा दीपू तैसाच तेवत राहिला आहे, राहणार आहे. साक्षात् शिवरायांनी गडागडावर भ्रमण करताना जिचा उच्चार केला आणि जिला आश्रय दिला ती ही मल्हारी बोली ऐसीच वृद्धिंगत होत राहणार आहे.

तो : बाप्पा, तुम्ही सरकारचा निषेध करू नये, म्हणून त्यानी तुमच्यावर दबाव आणला तर...'

बाप्पा : मी कुठल्याही शासनसत्तेपुढे नमलेलो नाही. माझे म्हणणे मी परखडपणाने माडेन.

तो : धन्यवाद, बाप्पा, धन्यवाद. तुमच्याबद्दलचा आमचा अभिमान काकणभर वाढला आहे.

बाप्पा : हॅं: हॅं: हॅं.

(२)

स्थळ : बाप्पांचे घर. मंत्री आलेले. बरीच चर्चा झाली आहे. मंत्री परत निघाले आहेत.

मंत्री : (निघता निघता) सरकार आणि साहित्यिक यात दरी निर्माण व्हावी, असे आम्हाला वाटत नाही. त्यांच्यामध्ये सुसंवाद असावा, अशी सरकारची इच्छा आहे. तीन पुस्तकाना आम्ही पुरस्कार का नाकारले...

बाप्पा : त्याला 'पुरस्कार' म्हणूच नका, ते 'मानधन' आहे, जनतेच्या पैशातून दिलेले.

मंत्री : बरे, यापुढे त्याला 'मानधन' म्हणू.

एक : सरकारला समजून न घेता अध्यक्षीय भाषणात काही बोलले जाऊ नये आणि त्यातून दरी वाढू नये, या सदिच्छेपोटीच नामदारसाहेबांनी आपल्याला ही विनंती केली आहे.

बाप्पा : ठीक आहे, मी तिचा विचार करीन. आता माझ्या अध्यक्षीय भाषणाबद्दल म्हणाल, तर मला जे काही म्हणावयाचे आहे ते मी परखडपणाने म्हटले आहे. त्याबद्दल आज मी काहीच बोलणार नाही; पण तुम्ही रमण्यातली दक्षणा देत नाही, एवढी खूणगाठ अवश्य मनाशी बाळगावी.

मंत्री : आपण आमची भूमिका समजावून घेतली, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

३)

स्थळ : परिषदेचे सभागृह. बाप्पा, खा. वा. लहरे, रामचंद्र भडके, रा. रा. जिरंतीकर, मरुधर वरुंडकर आणि संमेलनाचे मावळते अध्यक्ष रं. बा. महादार बसलेले.

लहरे : सरकारचा निषेध झालाच पाहिजे. मी ठराव मांडणार आहे.

जिरंतीकर : ही भूमिकाच रास्त आहे. निषेध व्हायलाच हवा.

भडके : वेळीच याची दखल घेतली नाही, तर साहित्यिकांच्या विचारस्वातंत्र्याला आणि आविष्कारस्वातंत्र्याला काहीच अर्थ उरणार नाही

वरुंडकर : लोकशाहीत सरकारची भूमिका ही व श्वस्ताचीच असली पाहिजे. पैसा अखेर जनतेचाच असतो.

महादार : वास्तविक अध्यक्षांनी पुरस्कार प्रकरणी अध्यक्षीय भाषणातच सरकारचा निषेध करावा, असे पत्रक आम्ही पूर्वाध्यक्षाच्या सहीने काढलेच आहे. आजही माझे तेच मत आहे.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : सदतिसावा

१४ फेब्रुवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

बाप्पा . मी अध्यक्षीय भाषणात निषेध केला तर ठरावाला जागा उरणार नाही मला म्हणावयाचे ते मी स्पष्टपणे म्हणणारच आहे.

. लहरे : तुम्ही ठाम भूमिका घ्यायला हवी

भडके : हा फार महत्त्वाचा आणि आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. त्यात आम्ही तडजोड स्वीकारणार नाही.

लहरे : भले संमेलनात गोंधळ झाला तरी चालेल. ही तलवार आम्ही म्यान करणार नाही !

बाप्पा : आपल्या इच्छेनुसारच घडेल.

(४)

स्थळ : संमेलनमंडप. उद्‌घाटनसोहळा संपलेला बाप्पाचे 'परखड' भाषण झालेले.

. अरे, समेलनापेक्षा नामदार घाट्याकडेच लोकाचं जास्त लक्ष होतं

: लोकाचं तर सोडाच, साहित्यिकाचंही त्यांच्याकडेच जास्त लक्ष होतं!

: त्याच्याशी हस्तादोलन करायची कोण धडपड चालली होती साहित्यिकांची !

: तेही घारे डोळे रोखून हसत हसत प्रसाद वाटल्यासारखं हस्तादोलन करत होते.

: बाप्पांचं भाषण कसं वाटलं ?

: अरे, त्यात सगळंच 'चिंत्य' आणि चिंतनीय' होतं. साहित्यिकाना सरकारनं पुरस्कार नाकारणं 'चिंतनीय.' लेखकानी पुरस्कार नाकारणं 'खेदाचं.' तोडगा एक स्वायत्तमंडळ स्थापण्याचा. 'सरकारने पुरस्काराचे काम स्वत कडे ठेवूच नये. त्यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे. *त्याला निधी पुरवावा. तज्ज्ञांची त्यावर* नियुक्ती करावी. मग त्याला स्वायत्तता द्यावी. त्यात कुठलाही हस्तक्षेप करू नये,' अशी बाप्पांची सूचना.

: सारे कसे गड चढायला येणाऱ्या पोरा-पोरीसारखे भोळे-भाबडे. भावुक.

: केवढे वैचारिक सखोल मार्गदर्शन करणारे हे भाषण ! दलित साहित्यापासून मामांतरापर्यंत साऱ्या प्रश्नांचा विचार आहे त्यात. एव्हरी थिंग मेड ईझी.

: या विचारवंताला आजवर कोठे दडवून ठेवले होते, बाप्पा ?

(५)

*स्थळ : संमेलनकार्यालयातली एक खोली.* विषयनियामक समितीची सभा सुरू. बाहेर वातावरण तंग पुरस्कारप्रकरणी सरकारचा निषेध झाल्यास काय होणार, हीच चर्चा. सरकार पक्षाचे रसिक सज्ज,विषयनियामक समितीच्या सभेला नामदार घाटे आवर्जून हजर.)

सूचक : संमेलन आणि साहित्यमहामंडळ याना पंचाहत्तर हजार रुपयाची देणगी दिल्याबद्दल आणि या प्रचंड निधीचे 'इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान' स्थापन केल्याबद्दल अंतुले सरकारचे हे समेलन अभिनंदन करीत आहे.

एक . शब्दरचनेत बदल हवा.

अध्यक्ष : कोणता ?

एक : 'अंतुले सरकारचे हे संमेलन' या शब्दरचनेतून हे संमेलन अंतुले सरकारचं आहे. असा अर्थ निघतो

कुजबुज खरंच आहे, उत्तम जेवणापासून राहण्यापर्यंत सगळं सरकारी पैशावरच तर चाललं आहे.

एक : हे संमेलन अंतुले सरकारचे अभिनंदन करीत आहे' अशी रचना हवी.

अनेक जण : बरोबर आहे.

अध्यक्ष : ठीक आहे.

सूचक : सिंहासन, जनांचा प्रवाहो आणि जयप्रकाश नारायण या पुस्तकांना तज्ज्ञसमितीची शिफारस डावलून पुरस्कार नाकारल्याबद्दल हे संमेलन सरकारचा निषेध करीत आहे.

अनुमोदक : माझे या ठरावाला अनुमोदन आहे.

कवी कुटिल . असा ठराव मांडू नये, असे माझे मत आहे.

डॉ. नाष्टीकर : मलाही वाटते की...

ना. घाटे : सरकारला साहित्यिकांबद्दल आदर आहे. या पुस्तकांना पुरस्कार नाकारण्यामागची सरकारची भूमिका योग्य आहे.

लहरे : अध्यक्षमहाशय, नामदारांच्या उपस्थितीला माझा आक्षेप आहे.

बाप्पा : ते आपले सन्माननीय पाहुणे आहेत.त्यांचा आदर राखणे आपले कर्तव्य आहे.

कवी कुटिल : घटनेनुसार असा निमंत्रित हजर राहू शकतो.

ना. घाटे : सरकारची भूमिका मी सविस्तर माडण्यासाठी हजर राहिलो आहे. गैरसमजातून काही घडू नये, म्हणून मी हे करणार आहे (सविस्तर भूमिका मांडून झाल्यावर) आपण याचा विचार करावा आणि सरकारचा निषेध करू नये, असे मला वाटते. तुमची सर्वांचीच हरकत असेल तर मी इथे थांबणार नाही; पण कुठलीही गोष्ट करताना समाजाचा मूड आणि त्याचा परिणाम याचाही विचार करा एवढंच मी सांगू इच्छितो. मी चाललो . . .

बाप्पा : बसा. बसा. आपल्या उपस्थितीला आमची हरकत नाही. आपण तो आमचे पाहुणे.

*ना घाटे* . पुरस्कारासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याची अध्यक्षाची सूचना चांगली आहे. मी त्यासंबंधी महाराष्ट्र सरकारशी जरूर चर्चा करीन. तुमच्या भावनांशी मी सहमत आहे. त्या मी सरकारच्या कानांवर घालीन.

सौ. सावकार : (हळूच) केवढा हा दिलदारपणा ! उगाच नको बाई निषेध.

ना. घाटे : तेव्हा असं मंडळ स्थापन करण्याची शिफारस करणारा ठराव करावा, अशी माझी विनंती आहे.

(लहरे, भडके, वाळुजकर वगैरे सर्व विरोधक गप्पच.)

अितर : नवी सूचनाच चांगली आहे.

बाप्पा : एकूण विचार करता शासनाने *आपल्या भावना समजून घेतल्या आहेत. नाम*दार घाटे यानी आपणास तशी ग्वाही दिली आहे यावर आपण टोकाची भूमिका घेऊ नये.

सर्वजण : अगदी बरोबर आहे....

(६)

(सर्वजण बाहेर पडलेले. विरोध करणाऱ्यांभोवती घोळका.)

: तुम्ही ठाम भूमिका घेतलीत, तुमचं अभिनंदन.

लहरे अहो, असं बोलावंच लागतं. सगळे मंत्र्यांच्या तालावर गप्प बसणार. मग आपण कटुता घ्यावीच लागते.

एकजण पण एक शंका होती.

भडके : बोला.

: निषेधाच्या ठरावाऐवजी दुरुस्त ठराव मांडताना तुम्ही सगळे बसून का राहिलात ? निषेधार्थ सभात्याग का केला नाहीत ?

वरंडकर : त्याची गरज नसते. आपण आपल्या भावना नोंदवल्या, त्या शासनाला कळल्या, झालं.

निरंतीकर : तेवढ्यापुरतंच असतं ही ते.

लहरे : फार ताणवायचं कशाला ? नामदारांचं.–आमचं व्यक्तिशः भांडण थोडंच आहे ?

: तुम्ही सर्वांनी विरोधी मत तरी नोंदवलं का ?

वरंडकर : तुम्ही गल्लत करताहात. .

एकजण : ठराव एकमतानं मंजूर झाला ना?

लहरे वगैरे : हो...पण...

जमाव : सरकार–

झिंदाबाद.

जमाव : इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानचा
विजय असो.

(सगळे झपाट्याने निघून जातात)

(७)

(स्थळ : मडप. समारोप सुरू. विविध ठराव)

ठराव एक . अंतुले सरकारचे अभिनंदन...

ठराव दोन : सरकारला शिफारस. ...

ठराव तीन : सरकारला विनती...

चार ! सरकारला शिफारस...

पाच : संमेलन यशस्वी केल्याबद्दल अभिनंदन, आभार....

बाप्पा : (गदगदलेले. समारोपाचे भाषण तशाच सुरात सरत आलेले) मी एकच 'पसायदान' मागतो. *या संमेलनाच्या वाळवंटी तुमच्या मनी ज्या दिवट्या पेटल्या असतील, अंतरी जो ज्ञानदीप प्रज्वलित झाला असेल तो पिढ्यान् पिढ्या तेवत राहू द्या....* (बाप्पानी डोळे पुसले.)

......

आम्ही एकदम भानावर आलो. केवळ त्या अपूर्व प्रसंगांच्या स्मरणानेही आमचे डोळे पुन्हा पाणावले होते. आत्ता आम्ही पुन्हा डोळे पुसले धन्य पावलो. धन्य धन्य ते दिवटयाचे समेलन !

—विजय

# राखीव जागांचा प्रश्न

## गुजरातेतील आंदोलनाचा अर्थ

वा. दा. रानडे

वैद्यकीय शिक्षणाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात राखीव जागा रद्द कराव्यात या मागणीवरून गुजरातच्या काही शहरात झालेले हिंसाचार म्हणजे देशात भावी काळात स्पृश्य–अस्पृश्य–संघर्ष तीव्र होत जाणार याचे निदर्शक आहेत काय याची चिंता वाटू लागली आहे. बसेसवर दगडफेक करणे, जाळपोळ करणे, बँका, पोस्टऑफिसांवर हल्ले करणे यांसारखे हिंसाचार घडले. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी लाठीहल्ला, अश्रुधूर, गोळीबार हे उपाय पोलिसानी योजले. अहमदाबादेत लष्कराची मदत बोलावण्यात आली. हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत कदाचित शांतता प्रस्थापित झालेलीही असेल; पण काही दिवसांनी त्याचा स्फोट तेथे किंवा अन्यत्र होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

राखीव जागा केवळ हरिजनासाठीच असतात असे नव्हे. आदिवासी, मागास जमाती यांच्यासाठीही शिक्षणात व सरकारी नोकऱ्यात राखीव जागा ठेवल्या जातात. राखीव जागा ठेवण्याची वेळच येऊ नये ही सर्वांत आदर्श परिस्थिती होय यात शंका नाही. सरकारी नोकऱ्यात व शिक्षणात गुणवत्तेनुसार प्रवेश हाच एकमेव निकष लावायला हवा असे म्हटले जाते; पण हा निकष लागला तर हरिजन, आदिवासी व मागास जमातीची मुले नेहमीच मागे पडतील.कारण शेकडो वर्षे हे वर्ग मागासलेलेच राहिले आहेत. त्यांना इतर समाजाच्याबरोबर आणण्यासाठी उपाय योजणे हे सामाजिक एकतेचा पुरस्कार करणाऱ्या सर्वांचे कर्तव्य आहे आणि लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेल्या सरकारवर याबाबतीत विशेष जबाबदारी आहे. सर्वांना विकासाची समान संधी असा समतेचा अर्थ केला जातो; पण समान संधी खऱ्या अर्थाने मिळते का? आर्थिक व सामाजिक विषमता दूर झाल्याशिवाय दलित व मागासवर्गांना खऱ्या अर्थाने विकासाची समान संधी मिळत नाही. या वर्गांना इतर समाजाच्याबरोबर आणल्यानंतरच विकासाच्या स्पर्धेत ते टिकू शकतील. पोषण कमी असलेली मुले सर्वच क्षेत्रात मागे पडतात. त्यांना सकस आहार देण्याची प्रथम तरतूद करायला हवी. तसेच दलित व मागासवर्गांच्या बाबतीत आहे. त्याच्या आर्थिक, सामाजिक विकासाच्या कार्यक्रमास अग्रक्रम द्यावयास हवा. राखीव जागांची तरतूद त्या उद्देशानेच करण्यात आलेली आहे. या वर्गाचे मागासलेपण दूर होत नाही तोपर्यंत राखीव जागा ठेवायलाच हव्यात. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमात राखीव जागा रद्द कराव्यात ही गुजरातेतील विद्यार्थ्यांची मागणी या दृष्टिकोनातून चुकीची आहे. अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांपेक्षा आपल्याला अधिक गुण मिळनही राखीव जागाचे तरतुदीमुळे त्यांना प्रवेश मिळतो आणि आपली वैद्यकीय शिक्षणाची संधी हुकते, हा आपल्यावर अन्याय आहे असे या विद्यार्थ्यांना वाटणे स्वाभाविक आहे. त्यांच्या शिक्षणाचाही प्रश्न सोडवायला हवा; पण राखीव जागा रद्द करणे हा त्यावर उपाय नाही. वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी वाढविणे, सध्याच्या मेडिकल कॉलेजातील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे, नवी कॉलेजे काढणे या दिशेने उपाय योजायला हवेत. तसेच याबातीत पूर्वनियोजित कार्यक्रम हवा. देशाला किती डॉक्टरांची गरज आहे, ही गरज पुरी करण्यासाठी सध्याच्या कॉलेजातील प्रवेशसंख्येत वाढ करायला हवी. नवी कॉलेजे काढणे आवश्यक आहे काय या सर्वांचा विचार करून यासंबंधी योजना आखायला हवी आणि त्या योजनेनुसार मेडिकल कॉलेजातील प्रवेश नियंत्रित करायला हवा. कॉलेजात मेडिकलकडे जाण्याचा निर्णय घेण्याचे वेळी विद्यार्थ्यांना सर्व परिस्थितीची कल्पना यावयास हवी गुजरातमध्ये सरकारने असे काही न केल्याने मेडिकल विद्यार्थ्यांत असंतोष निर्माण झाला आणि त्याचा उद्रेक हिंसाचारात झाला.

राखीव जागांच्या बाबतीत एक लक्षात घ्यावयाची गोष्ट म्हणजे राखीव जागा ठेवण्याची दलित, आदिवासी, इतर मागासवर्ग याच्या बाबतीत आपली जबाबदारी संपली अशी प्रवृत्ती सत्ताधाऱ्यामध्ये दिसून येत आहे ती अनिष्ट आहे. दलित व मागासवर्गांना इतर समाजाच्या बरोबरीस आणण्यासाठी राखीव जागा हा तात्पुरता उपाय आहे, तो कायमचा उपाय नाही ही जाणीव सरकारने ठेवायला हवी. या वर्गांच्या सामाजिक, आर्थिक विकासाचा कार्यक्रम निर्धाराने अंमलात आणून त्यांचा मागासलेपणा काही निश्चित कालावधीत दूर करण्यासाठी निर्धाराने पावले टाकायला हवीत राखीव जागांची आवश्यकताच वाटू नये एवढया पातळीपर्यंत या वर्गांचा विकास घडवून आणणे ही सरकारची जबाबदारी आहे. आतापर्यंत तिकडे दुर्लक्ष झाले आहे. आपणच दलिताचे खरे कैवारी असल्याचा दावा पंतप्रधान इंदिरा गांधी व त्याचे सहकारी करीत असतात; पण घोषणा व आश्वासनांपलीकडे त्यांनीही विशेष काही केलेले नाही. जमीनसुधारणा निर्धाराने अंमलात आणून भूमिहीन हरिजनांना जमिनीचे वाटप करण्याचे बाबतीत त्यांची प्रगती मंदच आहे. बडा शेतकरी हा इंदिरा कॉंग्रेसचा मोठा आधार आहे. त्याच्या हितसंबंधात बाध येईल अशी पावले इंदिरा सरकार टाकणार नाही. जमीनसुधारणा व जमीनवाटपाच्या कागदी योजना मात्र जाहीर केल्या जातील.

आपली राज्यघटना १९५० साली मंजूर झाली तेव्हा राखीव जागाची तरतूद पंधरा वर्षांपूर्वीच केलेली होती. अनुसूचित जाती व जमातीचा इतर वर्गांच्या बरोबरीस आणणारा कार्यक्रम तेवढया मुदतीत अंमलात आणला जाईल व त्यानंतर राखीव जागाची आवश्यकता भासणार नाही अशी त्या वेळी घटनाकारांची अपेक्षा होती, पण पंधरा वर्षेच काय तीस वर्षे झाली तरी परिस्थितीत फरक पडला नाही आणि गेल्या वर्षी राखीव जागांची मुदत आणखी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला! तीस वर्षांत दलिताना आम्ही दलितच ठेवले, त्यांची परिस्थिती सुधारली नाही, हा आमचा नाकर्तेपणा आहे. सामाजिक समतेबद्दल आम्हाला खरी आस्था नाही हे त्यावरून दिसून येते. या तीस वर्षांपूर्वी सत्तावीस वर्षे तर कॉंग्रेसकडेच सत्तेची मक्तेदारी होती. तेव्हा दलितांची स्थिती सुधारली नाही या दोषाचा मुख्य वाटा कॉंग्रेस राज्यकर्त्यांकडेच येतो. दलितांच्या विकासाचा कार्यक्रम त्यानी यशस्वीपणे अंमलात आणला असता वर राखीव जागा पुढे चालू ठेवण्याची आवश्यकताच राहिली नसती !

अर्थात केवळ कॉंग्रेसला दोष देऊन विरोधी पक्ष आपल्या जबाबदारीतून मोकळे होऊ शकत नाहीत. दलितामध्ये त्यांनीही फारसे भरीव कार्य केलेले नाही. हरिजनांवर अत्याचाराच्या बातम्या येतात तेव्हा त्या अनुषंगाने सरकारचा जोरदार निषेध करण्यापलीकडे त्यानीही विशेष काही केलेले नाही. दलितावरील अन्याय निवारण्यास'ठी संघर्ष तर करायलाच हवा,पण त्याच्यात राहून शिक्षण, साक्षरता प्रसार व त्यातून जागृती यासारखे विधायक कार्यही करायला हवे; पण सत्तेच्या राजकारणामागे लागलेल्या आमच्या बहुसंख्य राजकीय नेत्यांना दलिताची आठवण येते ती निवडणुकीत त्यांची मते मिळवण्याच्या वेळी.

गुजरातेतील हिंसाचारामागे व मेडिकल विद्यार्थ्यांचे चळवळीमागे भा. ज. प. आहे असा आरोप केंद्रीय मंत्री मकवाना यानी केला ! असे निराधार आरोप करण्याची त्यांची सवय जुनीच आहे, पण असल्या आरोपांनी राजकर्त्यांचा नाकर्तेपणा काही झाकला जात नाही. □

# मुर्दाड साहित्यसंमेलन

## मुलाखतींवर आधारित लेख

अकोला येथे गो. नी. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ५५ व्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या प्रतिक्रिया आता उमटू लागलेल्या आहेत आणि त्या उत्तरोत्तर मोठ्या प्रमाणात उमटू लागतील. त्यामुळे साहित्यसंमेलन भरविणाऱ्या मंडळींनी केलेल्या परिश्रमाचा शीणभार उतरण्यापूर्वीच त्यांचा भ्रमनिरास व्हावा, अशा प्रकारच्या घटना जनतेसमोर येऊ लागलेल्या पाहून ती मडळी अस्वस्थ होतील, कशाला (XX XXX) 'आणि हे संमेलन घेतले, असे क्षणभरच्या स्मशानवैराग्याने ते घेरले जातील; परंतु अकोल्याच्या साहित्यसमेलनात जे घडले, त्याची गंभीरपणे वाचकानी, जनतेला कल्पना येणे अत्यावश्यक असल्याने त्याची वेळीच स्पष्टपणे चर्चा करण्याच्या दृष्टीने हे समेलन महत्त्वाचे ठरेल यात काही शंका नाही.

तसे पाहिले तर अकोल्याचे साहित्य-संमेलन गर्दीच्या दृष्टीने आतापर्यंतच्या अनेक मोठमोठ्या समेलनावर मात करणारे होते. मडप जितका प्रचड, त्याच्यापेक्षाही गर्दी विलक्षण ! काव्यगायन, कथाकथन इत्यादी कार्यक्रमाना ३०-४० हजार श्रोते प्रचंड दाटीवाटी करून इतकी गर्दी करत होते की, ते पाहून डोळ्याचे पारणे फिटावे ! जवणा-खाण्याची, राहण्याची सोय खूपच चागली. वऱ्हाडी आदरातिथ्य तेथे यत्किंचितही कमी नव्हते. जेवण्यासाठी मंडप उभा केला होता, तोच मुळी एखाद्या साहित्य-समेलनाच्या कार्यक्रमाचा मडप म्हणून शोभून आणि खपून गेला असता ! आपल्या नेहमीच्या प्रथेप्रमाण अकोलेकरानी जेवण अतिशय उत्तम प्रकारची दिली, नास्ता अतिशय चागला आणि तोही पोटभर, हवातितका खायला लावून आजच्या महागाईच्या दिवसांतही सयोजकानी समेलनास आलेल्या प्रतिनिधीना आश्चर्याचा प्रचंड धक्का दिला. मंडप अत्यंत भव्य, पार्श्वभागी आगरकर ज्या शाळेत शिकले ती शाळा, सजावट आकर्षक. कार्यक्रम वेळेवर सुरू करण्याची कार्यकर्त्यांची धडपड आणि त्याबाबतीत त्यानी दाखविलेली तत्परता इ. अनेक गोष्टी या समेलनात कितीही कौतुक केले तरी ते कमीच ठरेल, अशा वाटणाऱ्या होत्या. समेलनाच्या भव्य मडपाची आदल्या दिवशी पाहणी करणाऱ्या कित्येक साहित्यिकानी 'एवढे लोक कुठून येतील ? पार्टिशन घालून अर्धा करा !' अशाही सूचना केल्या होत्या; परंतु आश्चर्य असे की, अत्यत रटाळ अशा परिसवादाच्या वेळीही हा मंडप शिगोशीग भरलेला असे. प्रवेशासाठी शुल्क असे. ते भरून स्त्री-पुरुष साऱ्या कार्यक्रमास गर्दी करीत होते.

एक गोष्ट निश्चित की अकोल्याच्या समेलनाने आतापर्यंतच्या गर्दीचे सारे उच्चाक मोडून टाकले. त्याबद्दल अकोलकराना लक्षश: धन्यवाद दिले पाहिजेत्.

परंतु त्याच्या बदल्यात या प्रचंड समुदायाला संमेलनाने काय दिले, असा प्रश्न विचारला तर डोके एकदम सुन्न होऊन जाते.

वास्तविक अशी संमेलने म्हणजे एक प्रकारची जत्रा, एक प्रकारचा उरूस असतो, असे म्हणण्यात येते आणि ते काही प्रमाणात खरेही असते; परंतु त्या निमित्ताने मराठीतील सर्व प्रकारच्या महत्त्वाच्या साहित्यिकाचा मेळावा डोळ्यांनी पहावयास मिळतो, त्यांची भाषणे ऐकायला मिळतात, त्याच्या गप्पाटप्पानी वातावरणात एक चैतन्यदायी आनंद ओसंडून राहतो आणि त्या साऱ्याच्या सुखद स्मृती त्यानंतर खूप दिवस रेंगाळत राहतात. १९१२ साली अकोल्याला भरलेले समेलन तुलनेने खूप लहान होते; परंतु त्या संमेलनातील घडलेल्या घटनांची नोद करणारी एक पुस्तिका उपलब्ध आहे. त्या वेळचे मातब्बर साहित्यिक, त्याचे महत्त्वाचे विचार याची त्यावरून कल्पना येते. हरी नारायण आपटे यांनी त्या प्रसंगी केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे संमेलनाध्यक्षाच्या भाषणातील तुराच शोभावा इतके ते महत्त्वाचे आहे ! त्या वेळी स्वागताध्यक्ष होते विष्णु मोरेश्वर महाजनी. अर्थात त्याही वेळी 'भो पचम जॉर्ज भूप'ची आळवणी केलेली होती. स्वातंत्र्यानंतरच्या आजच्या काळात या 'भो पंचम 'वाल्यांची वंशवेल इतक्या झपाट्याने वाढीस लागली आहे की, आज सारे संमेलनच त्याने कसे खाऊन टाकले आहे याचे हिडिस प्रदर्शन मोठ्या प्रमाणात घडले ते अकोल्यासच ! समेलनासाठी कराव्या लागणाऱ्या पैशाची तरतूद सर्वसामान्याना करता येत नाही म्हणून सत्ताधाऱ्याना त्यासाठी शरण जावे लागले अशी एक परंपराच अलीकडे निर्माण होऊ पहात आहे. यवतमाळ, इचलकरंजी, कऱ्हाड येथे सत्ताधाऱ्यांच्या आश्रयानेचही समेलने भरली तरी सत्ताधाऱ्यानी अनेक बाबतीत संयमाचे आणि शहाणपणाचे धोरण स्वीकारले होते आणि साहित्यिकाना महत्त्व आणि प्राधान्य देऊन आपल्या रसिकतेचे आणि समंजसपणाचे दर्शन घडविले होते. त्याहीपूर्वी राजेरजवाड्याना महत्त्व देऊन त्याच्या कृपाप्रसादाने भरलेल्या समेलनातून साहित्यिकाचेच वर्चस्व होते ; परतु कोणतीहो गोष्ट घसरणीला लागली की, ती कुठे तरी खडकावर आपटून कार्यनाश करावयास कारणीभूत होते. तो दिवस दिसण्यासाठी अकोल्याची योजना नियतीने केली होती असे दिसते.

अध्यक्षीय निवडणुकीपासूनच या समेलनाने अत्यत अनिष्ट वळण घेतले. वास्तविक साहित्य-समेलनाच्या अध्यक्षाची निवड ही केवळ एक सन्मानाची बाब; परंतु ती सुद्धा भल्याभल्या साहित्यिकांच्या वाट्याला येऊ नये, अशी परिस्थिती आता या क्षेत्रात निर्माण झाली

आहे. केंद्र-कारस्थाने, बाजारी प्रचार, गटबाजी आणि प्रसंगी पैशाचाही उपयोग करण्यापर्यंतची तयारी यामुळे भल्या साहित्यिकांनी या रिंगणात पडणे म्हणजे हात दाखवून अवलक्षण करून घेण्याचा प्रकार झाला आहे. गमत अशी की, या मार्गांचा उपयोग करणाऱ्या कित्येकांना नंतर ही पद्धती बदलण्याची भाषा बोलल्याखेरीज गत्यंतरच राहत नाही. ही भाषा म्हणजे एक केविलवाणी थट्टाच होऊन राहिली आहे.

## प्रा. अष्टीकरांचे प्रताप

शासकीय मेहेरबानीची झूल पांघरावयास मिळविण्यासाठी अनेक प्रकारच्या खटपटी-लटपटी करणाऱ्यांची साहित्यिकांमध्ये कधीच वाण नसते आणि अशा लटपटयांच्या हातात 'मराठी साहित्य महामंडळ' नावाची केवळ संमेलने भरविणारी संस्था गेली म्हणजे काय होते, ते पाहायची संधी अकोल्याने फेब्रुवारीच्या या पहिल्या आठवड्यात दिली. जातीयतेचा भस्मासुर उभा करून त्या जोरावर नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदावर बसलेले डॉ. कोलते अकार्यक्षमतेच्या आणि जवळ केलेल्या ज्या काही व्यक्तींमुळे कुलगुरुपदाच्या अप्रतिष्ठेला कारणीभूत होऊन खुर्ची गमावून बसले, त्यामध्ये अष्टीकर ही एक महत्त्वाची व्यक्ती होती. कोलत्यांची सत्ता संपलेली पाहून विदर्भ साहित्य संघाच्या राजकारणात हे महाशय कोलत्यांचे कट्टर विरोधक आ. रा. देशपांडे यांच्या कळपातच जाऊन बसले आणि या दोघांनी मिळून विदर्भ साहित्य संघाची विदर्भातल्या साऱ्या महत्त्वाच्या साहित्यिकांपासूनच फारकत केली. विदर्भातले कोणी मोठे साहित्यिक संघाकडे फिरकेनासे झाले. अशी ही व्यक्ती मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदावर त्या जागेवर बसण्यासाठी दुसरे कोणी बसावयास तयार नव्हते म्हणून जाऊन बसली आणि आपल्या प्रतापाने साऱ्या संमेलनास कशी काळिमा लागली हे तिने अकोल्यास दाखवून दिले.

अगोदर महामंडळाच्या या अध्यक्षानेच अकोल्यास संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी आपली उमेदवारी जाहीर केली. प्रा. मांडवगणे नावाच्या एका इंग्रजीच्या प्राध्यापकास हाती धरून हे महाशय इंदिरा काँग्रेसच्या गोटात सामील झाले आणि स्वागतमंडळाच्या मताच्या जोरावर संमेलनाच्या अध्यक्षीय खुर्चीवर बसण्याचे चुरमुरे खाऊ लागले. इंदिरा काँग्रेसवाल्यांना सारेच संमेलन आपल्या ताब्यात घ्यावयाचे होते म्हणून त्यांनी स्वागतसमितीला असे काही पद्धतशीर रूप दिले की, त्यामुळे अकोल्यातील इतर साऱ्या पक्षाचे कार्यकर्ते आपोआप गळले. स्वागतसमितीचे कार्याध्यक्ष वैराळे यांची मुंबईत साहित्यिकांमध्ये बरीच ऊठबस असल्याने, आष्टीकरांसारखा अध्यक्ष होणे म्हणजे काय विटंबना आहे, हे त्यांच्या लक्षात आल्याने, त्यांनी आष्टीकर वगळले जातील अशी व्यवस्था केल्याने, नाईलाजाने आष्टीकरांना नाव मागे घ्यावे लागले. अकोल्यामध्ये साहित्यिकांची काहीशी जाण असलेले मधुकर वैराळे हे एकच नाव आणि ते लोकसभेच्या कामात हरविलेले आणि शेतकरी दिंडीच्या कार्यक्रमामुळे झोप उडून बसलेले. तिला वेळ नाही आणि मांडवगणे हे नावाप्रमाणेच मांडवाच्या गमतीला उपयोगी पडण्यासारखे. मग साहजिकच जे संमेलन होणे, ते अकोल्यासारखे, ते दुसरे कसे होणार ?

अष्टीकरांनी आपल्या सत्ताधाऱ्यांच्या अनुनयाचे या प्रदर्शनात अत्यंत कोडगे असे प्रदर्शन केले. महामंडळाला अंतुल्याकडून पंचवीस हजाराची देणगी मिळवली म्हणून अंतुल्यांच्या अभिनंदनाचे ठराव पास करून घेतले. महामंडळाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत बाकीच्या महत्त्वाच्या ठरावांची वासलात लावून शासनाच्या निषेधाचा ठराव आपल्याला हवा तसा सौम्य करून घेतला आणि विषयनियामक समितीत तो गारद तरी व्हावा किंवा अगदी पातळ व्हावा, यासाठी शासनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी उघडउघड हातमिळवणी केली. वास्तविक विषयनियामक समितीचा अध्यक्ष हा संमेलनाचा अध्यक्ष असायला हवा. अनिल-आष्टीकर कंपनीने काही दिवसांपूर्वी घटना बदलून या ठिकाणी महामंडळाच्या अध्यक्षाची वर्णी लावली. तसेच स्वागतसमितीचे पाच सदस्य विषयनियामक समितीत संकेतानुसार असावयाचे, तेथे स्वागतसमितीचे सारेच सदस्य येतील, अशी योजना केली. त्यामुळे परमेश्वराचा बाप आला तरी शासनाविरुद्ध ठराव पास होणार नाही, हे पक्के ठरून गेले !

अष्टीकरांना चपराक दिली ती संमेलनाच्या सुरुवातीसच आणि तीही हजारोंच्या संख्येने जमलेल्या प्रेक्षकांनी ! हे महाशय महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने जे काही बोलले त्यानेच सारे अगोदर जाम वैतागून गेले. (गेल्या वर्षी कवी अनिलांनी यापेक्षा भयंकर वैताग आणला होता. बार्शीकरांनी वैतागून लाउडस्पीकरच त्या वेळी बंद ठेवून त्यांचा गळा दाबला होता.) अंतुल्यांची वारेमाप स्तुती आणि संमेलन लंडनला भरविण्याच्या विदूषकी वल्गना यामुळे या महाशयांनी स्वतःचे हसे करून घेतले होते. प्रा. सरदारांनी आपल्या भाषणात या कल्पनेचे वाभाडे काढल्यानंतर पुन्हा हे महाशय बोलायला उभे राहिले तेव्हा साऱ्या श्रोत्यांनी 'खाली बसा !', 'पुरे झाले ते लंडन !' म्हणून ओरडून त्यांना गप्प बसविले. दुसऱ्या दिवशी कोडगेपणाने हे महाशय पुन्हा कथाकथनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर हजर ! वेदोपनिषदे व ब्राह्मणग्रंथ यांमध्ये अनेक महत्त्वाच्या कथा कशा आहेत, या विषयांवर यांनी या वेळी भाषण देण्याचा प्रयत्न केला, तेव्हाही श्रोत्यांनी टाळ्या वाजविल्या. कथाकथनामध्ये तीन-चार कथा झाल्यावर श्रोत्यांनी पुढच्या कथाकारांना टाळ्या वाजवून खाली बसावावयास सुरुवात केली तेव्हा हे महाशय हसतहसत मांड्या उडवीत गंमतीने पाहात होते.

महामंडळाचे अध्यक्ष संमेलनाच्या सुरुवातीसच बोलून गेले असल्याने समारोपप्रसंगी आभाराचे भाषण मंडळाच्या कार्यवाहांनी करावयाचे असा संकेत आहे. तो धुडकावून हे महाशय आभार मानावयास उभे राहिले तेव्हा संमेलनास न येणाऱ्या साहित्यिकांचा उपहास करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मोठमोठे साहित्यिक संमेलनास येण्यासाठी मानधन मागतात. त्यांना बोलावून आणून सर्कशीतल्या पिंजऱ्यात वाघ, सिंह उभे करतात तसे उभे करावे आणि त्यांना पाहण्यासाठी तिकिट लावावे, असे आष्टीकरांनी म्हणताच; 'विदूषक म्हणून आष्टीकरांना त्या सर्कशीत उड्या मारायला पाठवावे', अशी श्रोत्यांमध्ये कुजबूज झाली. काय ही शोभा !

महामंडळासारख्या संस्थेचे अध्यक्ष अष्टीकरांसारखी व्यक्ती झाली तर दुसरे काय होणार ? हे महाशय आता शासकीय पारितोषिके देण्याचे काम आपल्याकडे सोपवावे अशा प्रयत्नात आहेत.

शासकीय पारितोपिकाचे आणखी धिडवडे निघावेत असे शासनाला वाटल्यास त्यांनी हे कोलित जरूर त्याच्या हाती देऊन पाहावे !

## सरदारांचा प्रभाव

संमेलनामध्ये दोन अशा गोष्टी घडल्या की, त्यातील परस्पर विरोध चांगलाच लक्षात राहिला. माजी अध्यक्षाने नव्या अध्यक्षाला अधिकार सुपूर्द करण्याच्या निमित्ताने प्रा. गं. बा. सरदार केवळ पाच-सातच मिनिटे बोलले आणि त्यांच्या भाषणाने सारे संमेलन थरारून गेले उद्घाटक म्हणून मंत्री वसंत साठे यांचे भाषण आणि आष्टीकरानी संमेलन लंडनला भरविण्याची घोषणा या दोन मुद्द्याना धरून सरदारांनी आजच्या वैचारिक दारिद्र्यावर अगदी नेमक्या शब्दात प्रहार केला. मंत्रिमहोदयानी धर्म आणि बुवाबाजी या विषयावर न पेलणारा घास घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आगरकर ज्या शाळेत शिकले त्या शाळेच्या प्रांगणात भरलेल्या संमेलनामध्ये सरदाराच्या भाषणात क्षणभर आगरकरच संचारले आणि त्यानी राजकीय विचाराच्या माजलेल्या घातकी बुवाबाजीवर मर्मग्राही प्रहार केला. संमेलने लंडनला भरविण्याऐवजी तळागाळातल्या जनतेसाठी ती लहानशा खेड्यात भरवावीत असे त्यानी म्हटल्यावर लक्षलक्ष हातांनी सरदाराच्या विचाराला उत्स्फूर्त दाद दिली. *अकोल्याच्या संमेलनात सन्मानाने ज्याचा उल्लेख करावा* असे जर काही अत्यंत महत्त्वाचे घडले असेल तर ते सरदाराचे पाच मिनिटाचे रोमांचकारी भाषण ! या भाषणानतर पुन्हा 'लंडन' ऐवजी ब्रह्मपुरीला भरविण्याची आष्टीकरांची कोलांटउडी तयारच ! महामंडळाच्या बैठकीमध्ये सर्वानुमते संमत झाल्यानंतर जी गोष्ट जाहीर करावयाची ती दडपून कोणालाही न विचारता जाहीर करण्याचा आगाऊपणा आष्टीकरापूर्वी दुसऱ्या कोणी केला नव्हता ! महामंडळाच्या सदस्यांनी जाब विचारल्यावर पुन्हा क्षणात माफी मागायलाही हे तयार ! लंडन–ब्रह्मपुरी आणि रायचूर अशा झटपट लटपटी करून प्रा. आष्टीकरानी आपली विदूषकी चांगल्या रीतीने प्रकट केली.

दुर्दैव हे की, सरदारांच्या भाषणाची दखल वृत्तपत्रांना चांगल्या रीतीने घेता आली नाही. 'सरदाराच्या भाषणाने वृत्तपत्रांनी सहा कॉलमी हेडिंग दिले आणि आष्टीकरांनी आपल्या विदुषकी चाळ्याने चौकटीला विषय दिला' असे जाणकार म्हणत होते; परंतु बहुसंख्य वृत्तपत्रातून या दोन्हीही गोष्टी दिसल्या नाहीत. सरदारानी मंत्र्याच्या तोंडावर निःस्पृहपणे केलेला मर्मभेदी प्रहार वृत्तपत्रांना नीटपणे पकडता आला नाही; परंतु हजारो श्रोत्यांनी मात्र उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून त्याना अभूतपूर्व दाद दिली. ईकॉवाल्या वृत्तपत्राना सरदाराचे भाषण अडचणीचे वाटणे साहजिक होते; परंतु नागपूरच्या 'तरुण भारत'ने त्याची साधी दखलही घेऊ नये याचे साऱ्याना अतिशय आश्चर्य वाटते. वृत्तपत्रे अलीकडे कशी संज्ञाशून्य झाली आहेत, याचे हे एक ज्वलंत उदाहरण होय !

सरदाराच्या भाषणाने संमेलनाचे कार्यकर्ते खूपच अस्वस्थ झाल्याचे तात्काळ लक्षात आले. केंद्रीय मंत्र्यांच्या पंक्तीला ज्यांच्या शेजारी सरदारानी भोजनास बसावयाचे असे ठरले होते, त्यांची मंत्र्यानी वाट न पाहता आपल्या गोतावळ्याची पंक्तीसाठी निवड केली. कऱ्हाडला दुर्गाबाईंच्या जयप्रकाश गौरवाने यशवंतराव अस्वस्थ होतेच दुर्गाबाईंच्या शेजारी बसून जेवण्याचे त्यानी टाळले. यशवंतराव त्यावेळी रागाने फणफणत होते !

सरदाराच्या उपस्थितीत विषयनियामक समितीची बैठक घेण्याची टाळाटाळ कार्यकर्ते करू लागले. त्याना सरदाराचा आता धाक वाटू लागला होता. दोन तारखेला पाच वाजता सरदार परत जाणार याची खात्री पटल्यानंतर त्यानी विषयनियामक समितीची बैठक जाहीर केली आणि तीत प्रा. त्र्यं. कृ. टोपे यांचे सरदारनिंदेचे पत्र आणवून ते चक्रमुद्रित करून बैठकीत वाटण्याची व्यवस्था केली ! टोपे यानी मुंबईहून ३१ तारखेला पत्र लिहून टाकले आणि ते दोन तारखेला अकोल्याला आदल्या दिवशी पोचून त्याच्या प्रतीही निघाल्या आणि त्या तत्परतेने वाटल्या गेल्या ! यापाठीमागचा सारा बनाव केविलवाणा होता. दुसरी लक्षात आलेली गोष्ट म्हणजे संमेलनास प्रा. मा. प. मंगुडकराची उपस्थिती. तिन्ही पुस्तकातील त्यांना आक्षेपार्ह वाटणाऱ्या उताऱ्याचे मंगुडकरांनी केलेले चक्रमुद्रित संकलन प्रकाशित करण्यात आले होते. खुल्या अधिवेशनात जरूर पडल्यास हे महाशय निबंधाच्या ठरावास विरोध करणार होते म्हणे ! टोपे आणि मंगूडकरांची अंतुले–निष्ठा आता कशी फळाला येते ते पहावयाचे !

## बेहेऱ्यांची पळपुटी हिरोगिरी

आष्टीकराच्या विदूषकी चाळ्याचा आणि संमेलनाच्या कार्यकर्त्यांच्या भोंगळपणाचा जर कुणी फायदा करून घेतला असेल तर सोबतकार ग. वा. बेहेरे यानी. आष्टीकराच्या साऱ्याच हालचाली उघडपणे शासनाच्या समर्थनाच्या असल्याने आणि त्याला कसलाही विधिनिषेधाचा लगाम नसल्याने त्याच्यावर हल्ला करून त्याची फजिती करणे फार सोपे होते. 'हा हा हा, हू हू हू' करून अष्टीकर आपल्या चुकाचे आणि चाळ्याचे केविलवाणे समर्थन करू लागल्याने बेहेऱ्यांना त्यांच्यावर प्रहार करून सहजगत्या 'हिरो' होता आले; परंतु ही आपली भूमिका शेवटपर्यंत न टिकविता त्यांनी अनपेक्षित माघार घेऊन अवसानघात केल्याने निषेधाच्या ठरावाचे चांगलेच भजे झाले ! कुरुंदकरादी इतरांनीही त्यांच्याच मार्गाचे अनुकरण केले.

विषयनियामक समितीला कुणाकुणाला हजर राहता येते, यासंबंधी महामंडळाच्या घटनेत निर्देश असताना (ही घटना कमालीची भोंगळ आहे) आणि दुसऱ्या कुणालाच घटना म्हणजे काय ते कळत नाही, आपण मागे न्यायधीश असल्याने आपलाच तो अधिकार आहे, असे तोऱ्यात मिरवणाऱ्या कवी अनिलाचे महामंडळाला पाठबळ असतानाही केंद्रिय मंत्री साठे बैठकीच्या सुरुवातीपासून बैठकीस हजर राहिले ! ते या बैठकीस उपस्थित कसे राहू शकतात असा आक्षेप बेहेऱ्यानी घेतला तो केव्हा ? तर बैठक सुरू झाल्यानंतर दोन तासानी ! तो तरी शेवटपर्यंत पक्का धरून ठेवायचा ? नाही. बेहेऱ्यांनी लगेच टोपी फिरविली आणि मंत्र्याना या बैठकीत बोलण्यालाही हरकत घेतली नाही. 'आम्ही जोडण्यासाठी आलो आहोत, तोडण्यासाठी नव्हे'. ही पुन्हा वर मखलाशी. म्हणजे, मंत्र्याच्या उपस्थितीला आक्षेप घेण्याची माझ्यामध्ये हिंमत कशी आहे ते पाहा' हे चारचौघामध्ये बेहेऱ्याना दाखवायचे होते आणि त्याचवेळी त्या मंत्रिमहाशयाना खूप

करून त्यांच्या कृपाप्रसादाचे पुण्यही जोडावयाचे होते ! निषेधाचा किंवा असमाधानाचा ठराव पास होऊ नये, असे गो. नी. दाडेकरांनाही वाटू लागल्याचे लक्षात येताच विरोधातली सारी हवाच निघून गेली. दाडेकरांनी ठरावाचा पहिला मसुदा तयार केला होता, त्यामध्ये शासनाबद्दल साध्या असमाधानाचाही निर्देश कटाक्षाने टाळला होता. बेहेरे, कुरुंदकर आणि दाडेकर यानीच पलटी खाल्ल्याने विषयनियामक समितीचे वागे होउन गेले आणि स्थानिक कार्यकर्त्यांना हवा तसा मसुदा तयार करण्याची त्यांच्यामध्ये अहमहमिका लागली. संमेलन शांततेने पार पडावे म्हणून केवढा हा स्वार्थत्याग ! असले मिळमिळीत सौभाग्य पत्करून विषयनियामक समितीच्या आघाडीच्या सदस्यांनी चागलाच मुखभंग केला. त्यापेक्षा सारा ठरावच गारद होऊन ढळढळीत वैधव्याचे ते धनी ठरले असते तर महाराष्ट्राने त्याचा निश्चितच गौरव केला असता या प्रसंगी सरदार हजर न राहिल्याचा हा परिणाम होय हेही लक्षात आले मंत्र्यासमोर निर्भीड पणे स्पष्ट बोलणाऱ्या सरदारानी विषयनियामक समितीची बैठक आता लगेच होणार आहे, हे माहीत झाल्यावर परत जावयाची घाई करावयास नको होती. या बैठकीस ते हजर राहते तर या बैठकीला काही आब राहिला असता.

बेहेऱ्यांनी ऐनवेळी अवसानघात केल्याचे फळ त्यांना लगेच मिळाले आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा हिरोगिरी करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. बेहेऱ्यांच्या उपकारातून उतराई होण्यासाठी दुसऱ्या दिवशी दलित वाङ्मयाच्या परिसंवादाचे अध्यक्षपद त्यांना बहाल करण्यात आले. त्याचा समारोप करताना, बेहेऱ्यानी विषय सोडून आदल्या दिवशीच्या विषयनियामक समितीच्या बैठकीतील चर्चेचा गौप्यस्फोट केला. 'आम्ही साहित्यिक षंढ आहोत, नादान आहोत, जोड्याने मारण्याच्या लायकीचे आहोत अशी पोकळ आत्मनिंदा करीत त्यांनी आष्टीकर आणि दांडेकर यांच्यावर भेकडपणाचा आरोप केला आणि आपणच काय ते एकटे दंड ठोकून उभे राहिल्याचे घोषित केले !

या नव्या सनसनाटीने पत्रकारांना बेहेऱ्यांना आणखी बोलते करण्याची संधी मिळाली आणि त्यानी पत्रकार–परिषद घेऊन बेहेऱ्याना मनसोक्त बोलू दिले. वृत्तपत्रानी ती लगेच प्रसिद्ध केली. नगाऱ्यापुढे टिमकी वाजवावी, त्याप्रमाणे आष्टीकरांनी आपली आणखी एक पत्रकार परिषद घेऊन बेहेऱ्याना शिवीगाळ केली. आष्टीकराच्या साऱ्या हालचालीची आता पूर्ण कल्पना आल्याने ती पूर्णत. वाया गेली. त्वयार्ध–मयार्धंचा हा सारा खेळखंडोबा उबग आणणारा होता !

## महामंडळ–मराठीचे मारेकरी

'मराठी साहित्य महामंडळ' ही संस्था कुणाची आहे, कशासाठी आहे, याचा गंभीर विचार करण्याची वेळ आता आली आहे. गेली काही वर्षे या मंडळाच्या अध्यक्षाच्या हालचाली साऱ्याच्या उपेक्षेचा विषय ठरत आहेत. यंदा त्या हालचालीना अक्षरशः चाळघांचे स्वरूप आल्याचे लक्षात आले. महामंडळाजवळ एकही पैसा नसताना त्याने प्रचंड संमेलने भरविली आहेत. मुख्यमंत्र्याकडून अनुदान मिळाल्यानतर, या नैसर्गिक घटनेबद्दल मुख्यमंत्र्याचे आभार मानणे उचित असता बॅरिस्टर अतुले या व्यक्तीचे आभार मानण्याचा लघळपणा हे मंडळ करू पाहते याचा अर्थ काय ? इतकेच नव्हे तर उद्या प्रस्थापित व्हावयाच्या इदिरा गांधी प्रतिष्ठानाचेही ठराव करून अभिनदन करण्याचा कोडगेपणाही तत्परतेने हे मडळ दाखवू शकते, याचा अर्थ काय ? लवकरच साऱ्या काळाबाजारवाल्याकडून, आकडेवाल्याकडून आणि स्मगलर्सकडून देणग्या मिळवून 'मंडळाने मोठा निधी उभारला' म्हणून हे टिमकी वाजविण्यास कमी करणार नाहीत अशी त्यांची लक्षणे सध्या आहेत.

संमेलनाकडे आलेल्या ठरावांची छाननी करून ते विषयनियामक समितीकडे पाठविण्याचे कार्य महामंडळाकडे असते. ज्या महामंडळाने अंतुलेंच्या अभिनंदनाचा ठराव संमत केला, त्यानेच मराठीबद्दलच्या ठरावला बगल देऊन तो फेकून दिला, असे सांगितले तर त्याच्यावर कुणी विश्वास ठेवील काय ? पण तसे अकोल्यास घडले ! विद्यापीठातून मराठी या विषयास पद्धतशीरपणे अर्धचंद्र देण्याच्या कारवाया आणि शासनाच्या कारभारात त्याचा वापर करण्याबाबत होत असलेली कुचराई यासंबंधी असमाधान व्यक्त करणारा महाराष्ट्र साहित्य परिषदेने अधिकृतपणे पाठविलेला ठराव महामंडळाने असंमत करून फेकून दिला ! ज्या महामडळावर व. दि. कुलकर्णी, नरहर कुरुंदकर, वि. रा. करंदीकर, ह श्री. शेणोलीकर, म. वि. फाटक, तु. शं. कुलकर्णी इतके मराठीचे प्राध्यापक आहेत, त्यांच्या महामंडळात मराठीचा ठराव फेटाळला जातो, याचा अर्थ काय ? विषयनियामकसमितीत मांडून त्याची परत प्रस्थापना झाली ती अन्य सभासदांच्या आग्रहामुळे. खुल्या अधिवेशनात त्याची चर्चा होऊ न देता अध्यक्षाकडून तो मांडला गेल्याने हा ठराव (सारेच ठराव) अगदी परिणामशून्य होऊन गेले !

## गलथान महामंडळ

अकोल्याच्या संमेलनाची जी केविलवाणी अवस्था झाली ती सारी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे. मोठमोठ्या साहित्यिकाना मानधन कसले द्यावयाचे, एवढे फक्त महामंडळाच्या अध्यक्षांनी अकोलेकराच्या मनात भरवून दिले, त्यामुळे मोठमोठ्या साहित्यिकांना केवळ हजर राहण्याचे पत्राने आवाहन अकोलेकरांनी केले. तेही इतक्या उशीरा की, इच्छा असूनही कुणाला हजर राहता येऊ नये. सवलतीच्या प्रवासाची आवेदनपत्रे अशाच दिरंगाने पाठविण्यात आली. संमेलनाच्या कार्यक्रमासंबंधाने महामंडळाचे आणि घटकसंस्थेचे सदस्य तीन-चार वेळा भेटी देऊन स्थानिक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याची रीत आहे. विदर्भ साहित्यसघात तर सध्या सारा आनंदच आहे ! त्याचे कार्यवाह विषयनियामक समितीच्या बैठकीमध्ये साहित्यिकांना निषेधाचा ठराव आणण्याबद्दल दमदाटी करीत होते ! महामंडळाच्या मार्गदर्शनाअभावी स्थानिक कार्यकर्त्यांना समेलनाची पद्धतशीर माडणी करता आली नाही. अकोलेकरांनी आपल्यातर्फे व्यवस्था चोख ठेविली; पण केवळ भोजना–खाण्याची चागली व्यवस्था केल्याचे श्रेय त्याना मिळाले आणि चांगले कार्यक्रम केल्याचे श्रेय ते विनाकारण हरवून बसले. परिणामी संमेलनाच्या सांगता–कार्यक्रमाची इतकी विटंबना झाली की सांगता सोय नाही ! नाव खुले अधिवेशन, पण अधिवेशन झालेच नाही ! ठराव माडून त्यांच्यावर चर्चा, वादविवाद झालेच नाहीत चार-दोन मिळमिळीत ठराव अध्यक्षानीच माडून अधिवेशन संपले ! ते संमत आहेत का असे श्रोत्यांना कुणीच विचारले नाही. म्हणजे एकही ठराव (दुखवट्याचा सोडून) संमत झालाच नाही ! एकही ठराव संमत न होता पार पडलेले हे एकमेव संमेलन होय ! खुले अधिवेशन म्हणजे केवळ आभारप्रदर्शन झाले. अध्यक्षानी समारोप करताना समेलनातील वाङ्मयीन चर्चेचा ऊहापोह करावयाचा असतो. दाडेकरांनी त्यातले काहीच न करता केवळ आभारप्रदर्शनाचे काम केले. 'मी यापूर्वीच कोणत्याही समेलनाला हजर राहिलो नाही, परतु प्रतिज्ञेवर सांगतो की एवढे चागले समेलन झालेच नाही !' असे ते

म्हणू लागताच त्यातल्या विसंगतीने लोक हसू लागले. 'काय तो भव्य मंडप, काय तो समुदाय, केवढी ही गर्दी आणि केवढे ते रुचकर आणि स्वादिष्ट जेवण हा दाडेकरांच्या भाषणाचा खाक्या होता. त्यात कविसंमेलनाचा निर्देश राहून गेला म्हणून त्यांच्या कन्येने चिठी पाठवताच 'सासूबाई' म्हणून तिचे कौतुक हे त्यांचे समारोपाचे जिव्हाळ्याचे मनोगत होते. नंतरच्या आभारप्रदर्शनाच्या भाषणात हेच कौतुक होते. 'अनिलानी तीन वाट्या श्रीखंड मागून खाल्ले' असे म. श्री. दीक्षितानीही सांगितले. 'महाराष्ट्र टाइम्स'ने 'भिक्षुकाचे संमेलन' अशी त्याची यथास्थित संभावना केली, हे योग्यच होते. 'निषेधाचा ठराव आल्यास उद्याचे स्वादिष्ट व रुचकर जेवण मिळणार नाही या भीतीने साहित्यिकांनी ठराव मागे घेतला' अशी संमेलनामध्ये एक कुजबूज होती. संमेलनास आलेले एकमेव ज्येष्ठ साहित्यिक माधव मनोहर हे होते. त्यांनी संमेलनात भाग घेतला नाही. 'मी साहित्यिक नाही' म्हणून सहीसाठी आलेल्या मुलांना ते पिटाळीत आणि 'संमेलनाच्या मंडपात पाऊलही टाकले नाही' असे इतराना सांगत. त्याचे पैलवानासारखे धोतराचा सोगा हातात धरून मंडपाबाहेर फेऱ्या घालण्याने हे कोणी मंत्र्यांचे शरीररक्षक आहेत, अशी हूल उठली होती. संमेलनाच्या यशामध्ये त्याचाही थोडाबहुत वाटा आहे.

## कार्यक्रमांची केविलवाणी अवस्था

संमेलनाच्या कार्यक्रमांमध्ये एकही परिसंवाद रंगला नाही. कारण त्यामध्ये भाग घेण्यासाठी साहित्यिकांची उणीव होती. 'स्वातंत्र्योत्तर काळातील विविध मराठी साहित्य व समीक्षा' असाही विषय परिसंवादाला असू शकतो, हे अकोलेकरांनी दाखविले. दलित वाङ्मयाच्या परिसंवादात या वाङ्मयाच्या ठेकेदारांनी या विषयाचा अल्पावधीतच जो चावून चोथा केला आहे, त्याचीच शुष्क पुनरावृत्ती झाली. 'आजचे मराठी स्त्रीसाहित्य बेगडी आहे' या चर्चेचेही तसेच झाले. विज्ञानविषयक ललितसाहित्यासंबंधाने प्रेक्षकाना जेरीस आणणारे निबंधाचे वाचन झाले. कथाकथनामध्ये बा. भ. पाटील आणि मधुकर केणे याच्या इरसाल चुटकेवजा गोष्टीवर वेळ मारून नेऊन बाकीच्या कथाकारांना सूर्याची पिल्ले दाखविण्यात आली. कविसंमेलनात तर ही कत्तल कित्येक दशकावर गेली. हजारोनी जमलेल्या प्रेक्षकाना बरेवाईट चांगले कळते. त्याना कुणी फार बनवू शकत नाही याची जाणीव सर्वत्र येत गेली. 'लेखक तुमच्या भेटीला' हा कार्यक्रम अभिनव होता. त्यात पुन्हा दाडेकरच होते. लोकांना माहीत असलेले शिवाजी सावंत सोडले तर आनंद यादव व रा. रं. बोराडे हे साहित्यिक सामान्य वाचकापासून किती दुरावलेले आहेत हे लक्षात आले. विशेषांक काढून आपले महत्त्व वाढविण्याची त्याची लटपट किती दुबळी आहे हे अशा प्रसंगी दिसून येते. वास्तविक या कार्यक्रमासाठी उपलब्ध असलेल्या अनेक लेखकाना सन्मानाने व्यासपीठावर बोलावणे अगत्याचे होते. ना. सं. इनामदार, माधव मनोहर, श्री. मा. कुलकर्णी तर समोरच होते. वामनराव चोरघडे, उद्धव शेळके, मुक्तिबोध, सुरेश भट, मनोहर तल्हार याना सन्मानाने संमेलनास आणले असते तर कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचे चीज झाले असते. महाराष्ट्रातला तर राहोच; परंतु विदर्भातला एकही महत्त्वाचा साहित्यिक संमेलनास उपस्थित नव्हता! माजी अध्यक्षापैकी फक्त दोन अध्यक्ष उपस्थित होते. महाराष्ट्रातल्या एकाही विद्यापीठाचा एकही मराठीचा प्रमुख उपस्थित नव्हता अगदी जवळच्या नागपूरचाही!

## कुठे गेले ते दलित पँथर्स ?

अकोल्याच्या संमेलनातील सर्वांना बुचकळ्यात पाडणारी घटना म्हणजे दलित साहित्यिकांची आणि दलितांची अगदी तुरळक उपस्थिती. यवतमाळपासून अकोल्यापर्यंतच्या साहित्य-संमेलनाचे बारकाईने निरीक्षण केले तर असे दिसून येते की, सत्ताधाऱ्यांनी भरविलेल्या संमेलनातून गडबड करण्याबाबतीत दलितांचा फारसा पराक्रम दिसून येत नाही. यवतमाळला जाबुवंतराव धोटे आणि तत्सम उपद्व्यापी लोकाना वसंतराव नाइकानी अटकेत टाकले होते, आणि संमेलनाच्या अवतीभवती पोलिसाचे कडे उभे केले होते! (त्या वेळी दलिताचा प्रश्न आजच्यासारखा तीव्र नव्हता!) इचलकरंजीला घोषणा देणाऱ्या दलितांच्या एका गटाला तिथल्या कार्यकर्त्यांनी संमेलनाच्या मंडपापर्यंतही येऊ दिले नव्हते. कऱ्हाडला तर दलितासह अनेक विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांची धरपकड केली होती. फक्त पुणे आणि चंद्रपूर येथील संमेलने सत्ताधाऱ्याच्या आश्रयाने उभी राहिली नव्हती. त्यामुळे ती उधळण्यात दलिताना यश आले. दलिताच्या पराक्रमाला असे गालबोट का लागावे ? चंद्रपूरचे संमेलन उधळले जाण्यामध्ये संमेलनाच्या आणि महामंडळाच्या अध्यक्षाचा आडमुठेपणा कारणीभूत होता, हे खरे असले तरी पुण्याच्या संमेलनाचे अध्यक्ष प्रतिगामी असल्याच्या भूमिकेवरून ते संमेलन उधळले गेले होते. अकोल्याच्या अध्यक्षाबद्दल ते प्रतिगामी असल्याची जाणीव सर्वांनाच होती आपल्या अध्यक्षीय भाषणातच अध्यक्षानी आपण एके काळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक असल्याबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. अशा अवस्थेत दलितानी काहीच हालचाल न केल्याने ते सत्ताधाऱ्याच्या बंदोबस्ताला घाबरतात अशी समजूत होऊन बसते. वास्तविक विदर्भ म्हणजे दलिताचे व दलित साहित्यिकाचे मोहोळ. अशा वेळी त्यांचे पँथर्स इतके गप्प का बसले हे गूढ आहे. महामंडळाने मराठवाडा नामांतरप्रकरणाचा ठरावही मराठीच्या ठरावाप्रमाणे पद्धतशीरपणे गारद केला होता. विषयनियामकसमितीच्या बैठकीत काही व्यक्तीच्या आग्रहासाठी त्याचा कसाबसा समावेश करण्यात आला आणि अध्यक्षानीच तो वाचून चटावर श्राद्ध उरकावे अशी त्याची अवस्था केली. माधव मनोहराप्रमाणे दलित कवी यशवंत मनोहर संमेलनास उपस्थित होते; पण त्यांनी कश्श्याकश्श्यात भाग घेतला नाही त्याचे गूढ काही उकलले नाही.

जाता जाता आणखी एका गोष्टीने प्रेक्षकाना बुचकळ्यात पाडले. अध्यक्षीय भाषणापूर्वी टिळक आणि आवेडकर याच्या पुतळ्यास हार अर्पण करण्याची इच्छा दाडेकरांनी व्यक्त केली होती. त्याप्रमाणे कार्यकर्त्यांनी त्या दोघाचे पुतळे व्यासपीठावर आणले होते. वास्तविक हे हार गोळवलकरगुरुजी आणि गाडगेबाबा यासही नकोत का ?

एकूण साराच प्रकार म्हणजे स्टंट वाटावा असाच झाला.

'आलात तर तुमच्यासह, नाही तर तुमच्याविना' संमेलन पार पाडण्याची प्रतिज्ञा अकोलेकरानी पार पाडली!

संमेलन भव्य स्वरूपात झाले. जेवणे फार चांगली होती, व्यवस्थाही उत्तम होती; परंतु–

या परंतूने संमेलनाची सारी रया गेली!

इतके निःसत्त्व, इतके स्वाभिमानशून्य आणि इतके चैतन्यहीन असे दुसरे संमेलन पाहण्याची वेळ आमच्या नशिबी न यवो! त्यापेक्षा साहित्य-संमेलने न झालेलीच बरो!

आणि महामंडळ? ते असेच चालावयाचे असेल तर शक्य तितक्या लवकर टेम्स नदीच्या किंवा अगदीच नाही जमले तर पूर्णा नदीत बुडवून टाकण्याची आता नितांत गरज निर्माण झाली आहे! ☐

मुक्ताफळे

# कुणा एकाची भ्रमिष्टगाथा

अकोल्याच्या गोपाळकाल्याला आम्हाला जाता आले नाही प्रा. नपुसकलिंगे गेले होते. म्हणून आम्ही त्याना गाठले. हे नपुसकलिंगे कोण ? असा प्रश्न पडेल. तर त्यानीच मला एकदा सांगितले–

'आम्ही मूळचे कुळकर्णी. सर्वच कुलकर्णी साहित्यसमीक्षा लिहितात. आम्हीही अपवाद नाही. आमचे आजोबा व्याकरणकार होते. मराठी भाषेत पुल्लिंगाचा, स्त्रीलिंगाचा जेवढा विचार होतो, तेवढा नपुसकलिंगाचा होत नाही हे मत त्यानी आयुष्यभर मांडले व याचे महत्व लोकांच्या मनावर ठसावे म्हणून त्यांनी नपुसकलिंगे हे आडनाव स्वीकारले.'

तर असे हे आमचे प्राध्यापकमित्र. गोपाल नीलकंठ दाडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणावर स्वारी बेहद्द खूष होती. म्हणाले–

'चागले, सद्भावनांना आवाहन करणारे- खूप खूप लिहा असे त्यानी सागितले. हे छापणार कोण हे त्यांनी सागितले नसले, तरी हे सर्व छापले जाईल असा त्याचा आत्मविश्वास होता. लेखकाची तळागाळातली दुःखे त्यानी आईच्या तळमळीने माडली. मराठी लेकरू चांगलं. रागतं-धावतं पाहावं यासाठी त्यानी सर्वांगी धाडोळा घेतला. सगळे वाचक आपले अलीकडे इंग्रजी वाचतात ! मराठी लेखकांचे कोणी वाचीत नाही हे सागताना त्याचा कंठ दाटून आला– !'

आम्ही विचार करू लागलो की, यात इतके दुःखी होण्यासारखे काय बरे असावे ? धाकटे शास्त्रीबुवा इंग्रजी वाङ्मयाचे शिक्षण हे वाघिणीचे दूध असे म्हणाले ना ? मराठी साहित्यिक हे दूध आतापर्यंत गटागटा पीत होते तेव्हा दाडेकरांना का दुःख झाले नाही ? कोण काय वाचतो हे कळले की तो काय लिहिणार हे कळते. म्हणून दोन बहुप्रसव लेखक एकमेकाना भेटले तर– 'आपण काय लिहिता ?' हा स्वतःकडे कमीपणा घेणारा प्रश्न न विचारता, 'आपण काय वाचता ?' असा चाणाक्ष प्रश्न विचारण्याची पद्धत काय उगाच पडली ? आता मराठी लेखकांनी इग्रजी वाचून मराठी लिहिण्याची पद्धत हरिभाऊ आपटयांपासून नाही का ? मराठी लेखकानी भरपूर इग्रजी वाचावं आणि नंतर त्यांनी लिहिलेले मराठी आपण वाचावे याचा कंटाळा मराठी वाचकाना आला तर त्यात एवढं नवल ते काय ? दरवर्षी 'महाराष्ट्र टाइम्स' त्याच त्याच मराठी लेखकांना 'गेल्या वर्षात चागलं काय वाचलंत ?' असा प्रश्न करतो आणि मराठी लेखक भडाभडा इंग्रजी पुस्तकाची नावं सांगतात. 'इग्लंड-अमेरिकेची डाक बंद झाली तर आमच्या लेखकांचं व समीक्षकांचं स्वरूप तावडतीव चव्हाट्यावर येईल' असं शेजवलकरांनी लिहिलेलंच आहे

दाडेकरानी तळतळून विचारले-'बरं,इंग्रजी वाचणारे तरी वाचून वाचून वाचतात काय ? पेरी मॅसन ! नाही तर हॉट कादबऱ्या ! नाही यांना शेक्सपियरचा स्पर्श नाही. हेमिंग्वेची ओळ याना ठाऊक–'

प्रा. नपुसकलिंगे यांना अडवीत आम्ही म्हटल–

'पण आम्हाला वाटते आहे हीच स्थिती चांगली नाही का ? वाचू द्या लोकांना पेरी मॅसनच. अहो, पेरी मॅसन वाचणारा मराठी वाचक कदाचित 'माचीवरला बुधा' वाचील तरी; पण ज्याने हेमिंग्वे वाचला, 'ओल्ड मॅन ॲन्ड दि सी' वाचली–तो 'माचीवरला बुधा' वाचील का ?'

परंतु प्राध्यापक नपुसकलिंगे काही ऐकून घेण्याच्या मन स्थितीत नव्हते. ते सागत होते–

'सरकारी पारितोषिकाना दाडेकरानी काय सुदर प्रतिशब्द सुचवला ! पूजाद्रव्य ! किती मंगल कल्पना ! आमच्या डोळ्यांसमोर पर्वतीपायथ्याचा रमणा त्यानी साक्षात उभा केला–पूजाद्रव्य ! भिकेचे गलबत सुरक्षित नसते. दुसऱ्याने नाही म्हणताच ते फुटते. हे गलबत आता सुरक्षित राहील. दाडेकरानी डॉक्टरेट मिळवणाऱ्या प्राध्यापकाचे भळभळणारे दुःखदेखील वेशीवर टांगले. अहो, ही मंडळी साहित्यसमेलनाला शोभा आणतात. त्याच्या दु.खाकडे अध्यक्षानी पहायैला नको ? गावोगाव कॉलेजं आहेत. गावोगाव मराठीचे डॉक्टर्स आहेत; पण त्याच्या डॉक्टरेट मिळवलेल्या ग्रंथाची कुणाला ओळख आहे ? कोणी ते छापीत नाही. दाडेकरानी प्रकाशकाना विनती केली– 'याचे ग्रंथ छापा !'

'दाडेकराचे प्रकाशक केशवराव कोठावळे आहेत; त्यांना हे ऐकून काय वाटले ?'

'क्षणभर कोठावळे याचा चेहरा गंभीर झाला; पण लगेच ते आम्हाला म्हणाले, 'तुमच्या ओळखीचा कुणी मराठीचा प्राध्यापक दाडेकरांच्या वाङ्मयावर ,पी. एच्. डी. करीत असेल तर त्याचा ग्रंथ आम्ही छापू–'

'त्यांनी नामांतरचा प्रश्न नाही का हाताळला ?'

'नामांतराच्या प्रश्नाशिवाय साहित्य-संमेलन पुरे होऊ शकत नाही ! दाडेकर म्हणाले– 'या ज्वलत प्रश्नाचा उल्लेख केल्याशिवाय माझे व्याख्यान पूर्ण होऊ शकत नाही !'

'काय म्हणाले दांडेकर ?'

'दाडेकर म्हणाले– चर्चा करा. वाद विकोपाला गेले तरी चर्चा करा. डोकी फुटली तर बँडेज बाधून चर्चा करा. चर्चा कधीही बंद करू नका–'

'नपुसकलिंगे–या प्रश्नावर आमच्यापाशी नामी तोडगा आहे–' आम्ही भीत भीत म्हटले.

'सागा. आम्ही तो दांडेकरांना कळवू ते वसंत साठे यांना कळवतील साठे अंतुल्याना सागतील–'

'मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलायला विरोध आहे ना ? औरंगाबादचे नाव बदला. ठेवा आंबेडकरनगर. म्हणजे काय होईल ? मराठवाडा विद्यापीठच आंबेडकरनगरात असेल ! बाबासाहेबांचे हे जास्त मोठे स्मारक होईल ! अंतुले सध्या नावे बदलत आहेतच. कुलाब्याचे रायगड केले, औरंगाबादचे आंबेडकरनगर करा! –'

प्रा. नपुसकलिंगे जोरजोराने नकारार्थी मान हलवीत म्हणाले–

'हे शक्य नाही ! तुमचा तोडगा दांडेकराना मान्य होणार नाही त्यांचे इतिहासावर विलक्षण प्रेम आहे. ऐतिहासिक वास्तु, वस्तू, शहरे, गड, गढया, दगड, माती यावर त्याचे नितात प्रेम आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या नामातराच्या प्रश्नावर'अखंड चर्चा' हाच तूर्त तरी उपाय आहे !'

प्रा नपुसकलिंगे यांना, शासनाने काही पुस्तकांना बक्षिसे नाकारून जे वादळ उठवले त्याचा निषेध करण्याचे धारिष्टचही अध्यक्षानी दाखवले नाही, याचा तरी निदान राग यावा की नाही ? आम्ही त्यांना म्हटले–

'उपहास आणि तिरस्कार करणाऱ्यांची खुशामत करून तेज चढत नाही, कीर्ती मिळत नाही. हे ठाऊक असून दांडेकर या प्रश्नावर असे कसे हो वागले ? मंत्र्याना त्यानी विषय-नियामक समितीत काय बसवलं ? भ्रमण गाथा लिहिणाऱ्याने असा भ्रमिष्टपणा का करावा ? एक गोलमाल ठराव केला. 'महाराष्ट्र टाइम्स 'ने अग्रलेखात दाडेकराना भ्याड म्हटले आहे– !'

प्रा. नपुसकलिंगे म्हणाले–

'वाघिणीचे दूध प्यायले म्हणजे सतत डरकाळया फोडण्याची गरज नाही. द्रव्य हा शब्ददेखील नपुसकलिंगी आहे हे विसरू नका ! अंतुले याची इंदिरा- प्रतिभा- प्रतिष्ठान ही नवी लॉटरी सुरू होते आहे तुम्ही या डरकाळया मारणाऱ्याच्या गटापासून चार हात दूर रहा ! तुमच्या हिताचे सांगतो. एक लक्षात ठेवा– महाराष्ट्र राज्य लॉटरीका फल– आज नही तो कल !'...

हे ऐकल्यापासून आम्ही आता गप्प आहोत.

— ग्यानबा

अवतीभवती । शरद कृष्णन्

□

# राजीव आईच्या शब्दाबाहेर जाणार नाही
## –सदोबा पाटील

आजचे राजकीय संदर्भ लक्षात घेता सत्ताधारी पक्षात असूनही या माणसाला तशी किंमत नाही. आपल्याला फारशी किंमत नाही, किंबहुना आपला जमाना संपला आहे व आपले वय आता झाले आहे याचीही ८१ वर्षांच्या या वृद्ध नेत्याला कल्पना आहे. असे असले तरी एके काळी मुंबईवर अधिपत्य गाजवलेले हे एस्. के. पाटील किंवा आपल्याला जास्त परिचित असलेले नाव सांगायचे झाले तर सदोबा पाटील, आहे या परिस्थितीतही समाधानी आहेत. राजकारणी माणसे तशी निवृत्त होत नसतात. अगदी अलीकडे राज्यसभा निवडणूक लढवण्याची केविलवाणी धडपड केलेले सदोबा सध्या काँग्रेस-भवनमध्ये बसून अडल्या-पडल्यांची शक्य ती कामे करतात आणि त्यानी स्वतः स्थापन केलेल्या बृहद् भारतीय समाज या संस्थेचे कामही उत्साहाने करतात.

वाढत्या वयाबरोबर थोडेफार विस्मरण होत असले आणि हालचाली, चेहरा-मोहरा वय झाल्याचे जाणवून देत असला तरी महत्त्वाच्या गोष्टीचा ते आवर्जून उल्लेख करतात–'पाच बडे नेते केंद्रस्थानी असूनही ज्या पक्षाला सत्तावीस महिनेही राज्य करता आले नाही त्या जनता पक्षात मी कधी डेरेदाखल झालो नाही याचे मला समाधान आहे. मी काँग्रेसमध्ये म्हणजे इंदिरा काँग्रेसबरोबर आहे. दुसरी काँग्रेस आहेच कुठे ? ती तर केव्हाच मृतप्राय झाली आहे !' सदोबा रहातात ते तसे मोक्याच्या जागी. त्याच्या एका बाजूला मोरारजीभाई तर दुसऱ्या बाजूला चव्हाणसाहेब रहातात. या दोघांबद्दलही तसे ते कडवटपणानेच बोलतात. 'आपण सर्वसाधारण माणसाप्रमाणे हिंडतो-फिरतो; पण कोणी माझी टिंगल-टवाळी करत नाहीत, की माझ्याकडे बोटे दाखवत नाहीत' असे सांगून सदोबा म्हणतात, 'आयुष्यभर आम्ही थोडेच मंत्री राहणार आहोत ? सत्तेचे वलय हटल्यावर सर्वसामान्य माणसाप्रमाणे रहावयास काय हरकत आहे ? आता मोरारजीभाई माझे शेजारी. ते म्हणे फिरायला गच्चीवर जातात. माझे तसे नाही. मला जनसंपर्क आवडतो. आजही मी केवळ चार मंडळीना भेटता यावे म्हणूनच सकाळ-संध्या-काळ काँग्रेसभवनवर जाऊन बसतो !' आणि इतर वृद्धांप्रमाणे चांगला मैल-दीड मैल पायी जातो.

यशवंतराव चव्हाणाबद्दल सदोबा अतिशय कडवटपणे बोलतात. कुंपणावर बसून वाटचाल करण्याची हातोटी यशवंतरावांना उत्तम साधली; पण त्यांचाही जमाना संपला असून त्यांना आता राजकीय भवितव्य नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त करून सदोबा म्हणतात, 'ज्याप्रमाणे काही झाडाची वाढ मर्यादित असते, त्याचप्रमाणे काही माणसाचे असते. एका विशिष्ट मर्यादेपलीकडे ते झेपावू शकत नाहीत. चव्हाणांच्या बाबतीत नेमके तसेच आहे.' आपल्या निवासस्थानाचा संदर्भ देऊन ते म्हणतात– 'एका बाजूला चव्हाण आणि दुसऱ्या बाजूला मोरारजी असल्याने आपले अगदी भजे होऊन गेले आहे !' म्हातारबुवांची विनोदबुद्धी शाबूत असल्याचा आणखी पुरावा ते विद्यमान परिस्थितीबाबत बोलतात त्या वेळी पहावयास मिळतो. राजीव गांधीच्या राजकारणप्रवेशाबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणतात, 'मला नाही वाटत तो राजकारणात काही फार मोठे करून दाखवेल. मी त्याला लहानपणापासून पाहिले आहे. त्याचे वडील माझे मित्र होते. राजीव राजकारणात आलाच तर तो आईच्या शब्दाबाहेर जाणार नाही !'

इंदिराजीच्या सहकाऱ्यांची तर सदोबा चक्क टिंगल-टवाळी करतात. ते म्हणतात, 'हा झैलसिंग बघा ! एकदम सामान्य माणूस ! कुठे सरदार पटेल, गोविंद वल्लभ पंत यासारखी बडी मंडळी आणि कुठे हा झैलसिंग ! परराष्ट्रमंत्री नरसिंह राव–माणूस म्हणून उत्तम; पण जवाहरलालजीनी स्वतःकडे ठेवलेले परराष्ट्रखाते एकदम ह्याच्याकडे ? माझ्या मते तर इंदिराजीनीच हे खाते साभाळणे जरूर होते !'

काँग्रेसला खरा विरोध जनसंघाकडून होऊ शकेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त करून ते म्हणतात की, हीच मंडळी आपल्याला आता भारतीय जनता पक्ष म्हणवून घेतात.

एक राजकीय नेता म्हणून कोठे थांबावे, हे सदोबांना उमजले नाही. तथापी एवढी एक बाब सोडली तर सदोबाची कारकीर्द तशी चांगलीच यशस्वी मानावी लागेल. दोन–चार फोन करून काँग्रेस निवडणूक फंडासाठी प्रचंड रक्कम गोळा करण्याची किमया साधलेल्या सदोबानी एका जमान्यात मुंबईवर राज्य केले. सलग तीन वर्षे महापौरपद भूषवण्याची किमया पुण्यात कै. बाबुराव सणस यानी करून दाखवली होती. मुंबईमध्ये १९४९ ते ५१ अशी तीन वर्षे सदोबा महापौर होते आणि महापालिका–सदस्याना धरून आणण्याची अथवा त्याची डोकी मोजत बसण्याची वेळ त्यांच्यावर कधी आली नाही ! लोकसभेचे ते चागली १७ वर्षे सदस्य होते आणि केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये त्याना महत्त्वपूर्ण स्थान होते. अनेक वर्षे रेल्वेखाते त्यांनी जबाबदारीने संभाळले आणि ते अन्नमंत्री असताना अमेरिकेबरोबरचा प्रसिद्ध PL ४८० करार करण्यात आला. चव्हाणांच्या वाढत्या वर्चस्वाबरोबर त्याची पीछेहाट होत गेली. आणि ज्यांच्यापासून त्यांना त्रास झाला त्या तमाम मंडळीची कारकीर्द त्यांच्या डोळयादेखत नरम पडलेली पहायला मिळाल्यामुळे त्याबाबत ते काहीशा आसुरी समाधानाने बोलतात. दक्षिण मुंबईतून सदोबा सातत्याने निवडून येत होते, तेथे त्यांचा पराभव होईल असे काही कोणाला वाटत नव्हते; पण जॉर्जने ती किमया करून दाखवली. जायंट किलर म्हणून जॉर्जचे कौतुक झाले जॉर्जचा विषय निघाला की उपहासाने हसून म्हातारबोवा म्हणतात, 'आज हे जॉर्जसाहेब कुठे आहेत ?' मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे स्वतंत्र अस्तित्व रहावे म्हणून त्यांनी खूप आटापिटा केला; पण ते जमू शकले नाही. अगदी अलीकडेही या संदर्भात त्यांनी खटपट केली होती; पण त्याना यश

यऊ शकले नाही. आपले आयुष्य तसे आबादाबात गेल्याबद्दल ते समाधानी असले तरी आपण वृत्तपत्रक्षेत्रात काम करत राहिलो असतो तर त्या क्षेत्रात फार मोठे यश मिळवले असते असे त्यांना वाटते. अर्थात प्रत्यक्ष क्रियाशील राजकारणाची मौज काही वेगळीच, अशी जोडही ते लगोलग देतात. आज वयाच्या ८१ व्या वर्षीही आपल्या परीने हीच मौज अनुभवायला मिळावी म्हणून सदोबा सकाळ-संध्याकाळ काँग्रेस कचेरीत जाऊन, गप्पा मारतात. आपण अजूनही कोणी तरी आहोत असे वाटत राहणे महत्त्वाचे असते. हाच अनुभव घेण्यासाठी सदोबा काँग्रेस कचेरीत फेऱ्या मारतात. ◻

## दरबारासिंग विरुद्ध झैलसिंग

सत्ताधारी मंडळी फार तोलून-मापून बोलतात असा अनुभव असला तरी अती झाले की, मग या अंतर्गत सत्तास्पर्धेला तोड फोडावेच लागते. पंजाबचे मुख्यमंत्री दरबारासिंग आणि केंद्रीय गृहमंत्री सरदार झैलसिंग यांच्यामधील संघर्षाबाबत अतिशय तिखट प्रतिक्रिया पंजाबचे मुख्यमंत्री दरबारासिंग यांनी व्यक्त केली आहे. 'करंट'च्या संपादकांबरोबर त्यांनी मनमोकळी बातचीत केली. विचारण्यात आलेला पहिलाच प्रश्न असा होता की, 'तुमच्यापुढील महत्त्वाचे प्रश्न कोणते?' क्षणाचाही विलंब न लावता मुख्यमंत्री म्हणाले, 'माझ्यापुढील सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे ग्यानी झैलसिंग. केंद्रस्थानी झैलसिंग गृहमंत्री असले तरी आपण पंजाबचे मुख्यमंत्री आहोत असाही त्यांचा समज आहे. अधिकाराचा गैरवापर करून ते पंजाबच्या राजकारणात हस्तक्षेप करतात.'

प्रश्न : असे करणे कसे शक्य आहे? शासकीय यंत्रणेला आपल्या आदेशाप्रमाणे काम करावे लागते आणि वरिष्ठ अधिकारी आपल्या आदेशाप्रमाणे काम करत असताना आपण असे कसे म्हणता?

मुख्यमंत्री : सर्वसाधारण परिस्थितीत आपले म्हणणे बरोबर आहे; पण पंजाबची परिस्थिती थोडी वेगळी आहे. पंजाबमध्ये राष्ट्रपती-राजवट असताना केंद्रीय गृहमंत्र्यानी अनेक महत्त्वपूर्ण नेमणुका केल्या. आज त्यापैकी कित्येक मंडळी मोक्याच्या जागी आहेत. त्यांच्या निष्ठा झैलसिंग यांच्याशी असून ते त्यांच्याकडून आदेश घेतात आणि अनेक महत्त्वाच्या फाइल्स त्याना दाखवतात.

प्रश्न : अशा अधिकाऱ्यांविरुद्ध तुम्ही कारवाई करू शकता ना?

मुख्यमंत्री : वरवर पाहता हे साधेसोपे वाटत असले तरी शासकीय यंत्रणेमध्ये जाणवण्यासारखे बदल करणे तसे सोपे नाही. अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे, त्यांच्या बढत्या थांबवणे अथवा त्यांचा दर्जा कमी करणे यासारख्या गोष्टी करता येणार नाहीत असे नव्हे; परंतु तसे करणे हितावह नसते. त्यामुळे यंत्रणेमध्ये अविश्वासाची भावना बळावते, अंतर्गत संघर्ष वाढतो आणि ज्यांच्याकडून काम करवून घ्यायचे त्या शासकीय यंत्रणेकडूनच मिळावे तसे सहकार्य मिळत नाही. खेरीज अनेक आमदार अधिकाऱ्यांना संरक्षण देत असतात. झैलसिंग यांचा पाठपुरावा करणारे अधिकारी जसे आहेत तसेच आमदारही आहेत. आपली कामे ते झैलसिंग याना अनुकूल असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून करवून घेतात आणि मी काही हालचाल केलीच तर हेच आमदार मी पक्षांतर्गत संघर्ष वाढवत असल्याचा आरोप करतात.

अलीकडेच पंजाबमधील विरोधी पक्षानी विधानसभेला घेराव घालून आपल्या ताकदीची चुणुक दाखवून दिली. पोलीस व निदर्शक यांच्यामध्ये नकली संघर्ष झाला आणि त्यात अपेक्षेप्रमाणे निदर्शक यशस्वी ठरले. चंडीगढ हे हरियाना व पंजाबची राजधानी असून तेथील व्यवस्थापन व पोलीस यावर केंद्रीय गृहखात्याचे नियंत्रण असते. पंजाब सरकारचे नाव बदनाम व्हावे म्हणूनच झैलसिंग यांनी विरोधकांना आतून सहकार्य दिले व विधानसभा घेराओचा कार्यक्रम यशस्वी झाला असा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

इंदिरा काँग्रेसचे सगळ्यात कमकुवत सरकार पंजाबमध्ये आहे. विरोधी पक्ष तेथे जवळजवळ बरोबरीने बसलेला आहे आणि अशा राज्यात अंतर्गत सत्तासंघर्ष एवढा तीव्र असताना इंदिराजी स्वस्थ कशा असा प्रश्न पडेल; पण प्रत्यक्षात झैलसिंग व दरबारासिंग या दोघांनाही सांभाळून घेत वाटचाल करण्याचा प्रयत्न त्या करत आहेत. अलीकडेच इंदिराजींनी दिल्लीमध्ये पंजाबमधील आमदारांच्या एका सभेत भाषण करून ऐक्याचे आवाहन केले. या सभेमध्ये झैलसिंग यांचे समर्थक आक्रमक धोरण स्वीकारतील अशी अपेक्षा होती; पण इंदिराजींचा ऐक्याचा सूर पाहून त्यांनी थोडे नरम धोरण स्वीकारले. या सभेला झैलसिंग हजर नव्हते. ते पतियाळामध्ये डोळ्यांवर कसलीशी शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी गेले होते आणि ही शस्त्रक्रिया आटपून सभा झाली त्याच्या दुसऱ्याच दिवशी ते दिल्लीमध्ये हजरही होते.

हा वाद मिटवण्यासाठी मंत्रिमंडळाची गटवार पुनर्रचना करावी, दरबारासिंग यांच्या समर्थकांना साठ टक्के व झैलसिंग यांच्या समर्थकांना चाळीस टक्के जागा द्याव्यात असा एक तडजोड-प्रस्ताव होता; परंतु दरबारासिंग यांनी या प्रस्तावाची चेष्टा केली. ते म्हणाले, 'माझे सहकारी निवडण्याबाबत पंतप्रधानानी मला पूर्ण मोकळीक दिली आहे. सहकारी निवडताना मला अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागत असल्या तरी अशी टक्केवारी ठरवून गटवार विभागणी कशी करता येईल? ज्यांच्या निष्ठा झैलसिंग यांच्यासारख्या एखाद्या नेत्याच्या चरणी वाहिलेल्या आहेत आणि ज्यांच्याबद्दल मला विश्वास वाटत नाही असे सहकारी मी का म्हणून निवडावेत? केंद्रीय गृहमंत्र्यानी पंजाबमध्ये अवाजवी लक्ष घातले नाही तर पुष्कळसा गुंता सुटण्यासारखा आहे.' झैलसिंग वारंवार पंजाबला भेट देतात त्याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. 'केंद्रीय गृहमंत्र्यांवर सुव्यवस्थापनाच्या दृष्टीने संपूर्ण देशाची जबाबदारी असते. गृहमंत्री जर स्वतःच्या राज्यामध्ये अवाजवी लक्ष घालू लागले तर ते सयुक्तिक होणार नाही. झैलसिंग यांनी आपला दृष्टिकोन बदलला आणि पंजाबमध्ये अवाजवी लक्ष घातले नाही तर पुष्कळसे काम होण्यासारखे आहे.'

'पंजाबमध्ये विरोधी पक्ष बलवान असल्याने अंतर्गत संघर्षाला कंटाळून किंवा सत्तेची लालूच दाखवल्याने सत्ताधारी पक्षामधील आमदार पक्षांतर करणार नाहीत का?' या प्रश्नावर प्रतिक्रिया व्यक्त करताना दरबारासिंग म्हणाले, 'पक्षांतर करणाराबद्दल जनमानसामध्ये असलेला राग लोकांच्या लक्षात आला आहे. त्यामुळे

आणि सत्ताधारी पक्षात असल्याने होणाऱ्या फायद्याचा लाभ मिळत असल्याने कोणी आमदार सुखासुखी पक्षांतर करील असे वाटत नाही. समजा तसा आचरटपणा कोणी केलाच तर त्याचा फायदा उठवण्याची ताकद विरोधी पक्षाजवळ नाही. त्यांच्यातही भरपूर लाथाळ्या आहेत. अकाली दल हा येथील बलवान विरोधी पक्ष अंतर्गत कलहाखाली भरडला जात आहे. अशा परिस्थितीमध्ये माझ्या शासनाला कोणाकडूनही, कसलाही धोका संभवत नाही. स्वच्छ कारभार हे माझे वैशिष्ट्य ठेवण्याचा माझा प्रयत्न असून आमदारांनी या कामी जर चांगले सहकार्य दिले तर मी मोठे यश मिळवू शकेन.' ◻

# मुदपाकखान्यात इंदिराजी !

जगामधील फार थोड्या सत्ताधाऱ्यांनी सत्तेवर असताना आत्मचरित्रात्मक पुस्तके लिहिली आहेत. इंदिराजी अशा मोजक्या सत्ताधाऱ्यांपैकी एक. 'माय ट्रूथ' या पुस्तकामध्ये इंदिराजी आपल्या राजकीय कारकीर्दीचे सिंहावलोकन करतात. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळामधील राजकीय घडामोडींचा, त्या घडामोडी प्रत्यक्ष पाहणाऱ्या, त्यात सहभागी होणाऱ्या इंदिराजींकडून आढावा घेतला जातो. तसेच नेहरू घराण्याबाबतची तपशीलवार माहिती येथे पहावयास मिळते. या पुस्तकाची स्वतंत्रपणे दखल घेणे आवश्यक असले तरी इंदिराजींच्या विनोदबुद्धीची चुणुक दाखवणाऱ्या काही गमतीदार प्रसंगाची नोंद येथे करणार आहे. इंदिराजींचे पिताजी जवाहरलाल यांनी पंतप्रधान म्हणून देशाची सूत्रे हाती घेतल्यावर, 'तीन मूर्ती' या निवासस्थानी ते रहायला गेले आणि आपल्या मुलीवर घर लावण्याची जबाबदारी त्यांनी सोपवली. काहीशा अनिच्छेनेच इंदिराजींनी ती जबाबदारी स्वीकारली. एक तर पंतप्रधानांकडे येणाऱ्यांमध्ये सहजपणे मिळून-मिसळून वागणे किंवा निरनिराळ्या विषयावर गप्पा मारत दिल्या जाणाऱ्या पार्ट्यांमध्ये सतत फिरत राहणे आपल्याला मुळीच आवडत नव्हते, अशी नोंद करून इंदिराजी म्हणतात, 'खेरीज त्या वेळी माझे पती लखनौमध्ये होते आणि स्वाभाविकपणे मी त्यांच्याजवळ रहावे अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे लखनौ–दिल्ली करताना माझी चांगलीच धावपळ होत असे. मी लखनौमध्ये येऊन जरा कोठे विसावते की, पिताजी मला तार करून बोलावून घेत. पुढे फिरोझ गांधी दिल्लीला आल्यावर गोष्टी सोप्या झाल्या. आणि पिताजींबरोबर राहणे सुलभ झाले.'

'पिताजींकडे पाहुण्यांची कायम वर्दळ असे. अधिकृत सरकारी मेहमान त्यात असत तसेच व्यक्तिगत संबंधामुळे येणारी मंडळीही असत. त्या सर्वांची बडदास्त ठेवावी लागे. बड्या पाहुण्याचे स्वागत करताना, त्याचा दर्जा लक्षात घेऊन स्वागताबाबतचे सर्व संकेत सांभाळायचे आणि तरीही कोठे कृत्रिमता मात्र जाणवू द्यायची नाही, हे तसे अवघड काम होते आणि तारेवर कसरत करावी त्याप्रमाणे मला सारे तंत्र संभाळावे लागत असे' असे सांगून इंदिराजी म्हणतात, 'आपल्या लोकांच्या विक्षिप्त वागणुकीमुळे, पाहुणचाराचे प्रसंगी अनेकदा गडबड-गोंधळ उडत असे. हिंदू गोमांस भक्षण करणार नाहीत आणि डुकराचे मुसलमानांना वावडे आहे हे एक सर्वसाधारण तत्त्व ठीक आहे; पण त्यापुढील एकएक तत्त्व म्हणजे नमुनाच आहे. काही मंडळी म्हणे आठवड्याचे फक्त काही ठराविक दिवस शाकाहारी असतात. काही शाकाहारी मंडळी आपण फक्त अंडी मात्र खातो असे सांगतात, तर शाकाहाराचा पुरस्कार करणारी मंडळी चक्क मासे खात आपण शाकाहारी असल्याची ग्वाही देताना पाहून मला खूप हसू येत असे. आमच्याकडे आलेल्या एका पाहुण्याने तर कहरच केला. शाकाहारी असल्याचे वारंवार बजावणाऱ्या या पाहुण्याने त्या दिवशी कोंबडी सोडून बाकी सारे काही चापून खाल्ले.'

'आता असे पाहुणे आल्यावर भटारखान्यामधील माणसांना सूचना तरी कशी देणार?' असा त्या वेळी भेडसावणारा प्रश्नही इंदिराजींनी उपस्थित केला आहे.

'पाहुण्यांची ऊठबस करण्याच्या बाबतीत आलेले काही अनुभव इतके विक्षिप्त आहेत की, मला तर असे कधी प्रत्यक्षात घडू शकेल असे वाटले नव्हते; पण तसेही घडले! पिताजींनी सत्ता स्वीकारल्यावर पहिल्या वर्षी आमच्याकडे अनेक पार्ट्या दिल्या. विदेशी दूतावासामधील राजनैतिक मंडळींसाठी दिलेल्या एका पार्टीनंतर बरेच अन्न उरले असे माझ्या लक्षात आले. म्हणून साधारण तेवढीच मंडळी असलेल्या दुसऱ्या एका पार्टीमध्ये पदार्थांचे प्रमाण कमी केले तर मंडळी एवढी वस्ताद निघाली की, खाद्यपदार्थांची टूट भासून घाईगर्दीने पदार्थ आणवून घ्यावे लागले!'

'वेधशाळेकडून हवामानाबाबतचा अंदाज घेऊन एक पार्टी हिरवळीवर आयोजित करण्यात आली आणि ऐन पार्टीच्या वेळी ढगांचा गडगडाट सुरू झाला. पार्टी हिरवळीवर म्हणून जास्त लोकांना आमंत्रित करण्यात आले होते; पण पावसाची शक्यता वाटल्याने सर्वांना आत बोलवण्यात आले तेव्हा एकच गर्दी उडाली. गोंधळ वाढला. गोंधळ कमी व्हावा म्हणून नोकरांकडून मिठाई, सामोसे, भजी असलेल्या डिशेस फिरवल्या. अपेक्षा अशी होती की, मंडळींनी एखाद-दुसरा सामोसा घ्यावा अथवा मिठाईचा तुकडा घ्यावा; पण प्रत्यक्षात काही पाहुण्यांनी वेटर्सच्या हातामधील बशा काढून सामोसे व भजीच फस्त करून टाकली. आधीच गर्दी, त्यात खाण्यापिण्याचा गोंधळ यामुळे लोकांना मोकळेपणाने फिरता येईना. जे थोडेफार अन्न होते ते सर्व फस्त झाले आणि सुकामेवा आणि आयत्या वेळी मागवलेली भजी यावर वेळ साजरी करावी लागली! पाहुण्यांनी अथवा पिताजींनीही काही विशेष घडले आहे असे दाखवले नाही तरी त्या दिवसापासून मी जागरूक झाले आणि पार्टी बाहेर हिरवळीवर असो अथवा घरात असो, भरपूर पदार्थ कायम उपलब्ध होतील याची दक्षता मी घेऊ लागले.'

'एकदा धार्मिक परिषदेसाठी आलेले बौद्ध भिक्षू जेवायला येणार होते. कोणी तरी आयत्या वेळी सांगितले की, भिक्षू दुपारी १२ नंतर काही खात नाहीत. घाईगर्दीने ७५ भिक्षूसाठी ११॥ वाजता आणि इतर शंभर मंडळींसाठी दीड वाजता भोजनव्यवस्था करण्यात आली. आयत्या वेळी बदल झाल्याने आमची खूप धांदल उडाली!'

'न्याहारीचे वेळी स्वयंसेवा सर्वोत्तम असे पिताजींचे मत होते. आम्हा सर्वांनाही ते सोईस्कर होते; पण न्याहारीचे वेळी उपस्थित असणारी पाहुणेमंडळी, स्वयंसेवेच्या बाबतीत बुजतात असे लक्षात आल्यावर आम्ही ती प्रथा बंद केली. कॉफीपूर्वी दूध साखर देण्याच्या पद्धतीनेही भले-भले पाहुणे चांगले गांगरून गेल्याने ती प्रथाही मी बंद करवली!'

स्वयंपाकघरातील हे अनुभव इंदिराजींना आजही मोठे मजेशीर वाटतात. ◻

कथा

# एका मरणाच्या मागे आणि पुढे

अर्जुन शिवराम भोसले

काखेला घरातल्या कधीच्या धोतराच्या घडप्याचं गठुळं, जेवत्या हातात काठी; काठीचा निमा आधार आणि निमा बोजा. चालताना भेलकडायला झालं तर तिचा आधार, पण तीच उचलून टाकायची म्हण-ल्यावर ओझं. डोक्यावरले केस पिकून आभा-ळातल्या पाढऱ्या ढगागत झालेले. नाकाखाली व्हटाळीवर असलेले चार मोठे केसही पिकून असेच उठून दिसत होते. बारीक काडीच्या चौकड्याचं हातमागाचं लुगडं अंगावर. दमून गेल्यानं तोंड उसासत होतं.

ती म्हातारी चौडाबायकडनं आलेली पांद संपतासंपता पडक्या हिरीतल्या वडापस्नं जी निघाली ती पाय ओढीत पाय ओढीत कित्ती उशिरानं दमगीर होऊन नेरवाडीच्या वाटेतनं कोरेगावला फुटणाऱ्या गाडेवाटेच्या नीट मधल्या सुमारात चार कासऱ्यावरल्या पिराच्या देवळात विसाव्याला थाबली; त्या वेळी देवळात मोहन, नागेश्वर, बाळू ही भोसल्याची कपनी छताडाला लावायच्या दोन काजाच्या बटनावर पत्त्या खेळत होती.

ओळखीची ना पाळखीची; इतकी थक-लीय म्हातारी; जोडीलाही आधाराला कुणी नाही; कुठं निघालीय ? ह्या आडवेळेला ?

'कुट निगाला व ?' मोहन.

ती उसासता उसासता तकीम होत होती. अग सैल सोडीत होती. पाठीत जरा पोक आलं होतं. विसावताना तोंडाच्या बोळक्याची कोरडी मचमच करीत होती. कावल्यागत म्हणाली, 'निगाली कूरीगावला. कोरटात.' अस म्हणून ती पुन्हा जरा थाबली; पण आता तिन्हीसाजा व्हायला आलेल्या. तीन मैलांवर कारेगाव गाठायच म्हणलं तर चागल्या माणसाचा तासभर घामटा निघतो आणि हा म्हातारी आता रातभर चालत राहिली तरी पोचेल का कारगावा ? आणि राच्ची झोपंल कुठं–कशी ? हातरायपांघरायला काय ? आणि कोर्टं कुठं घावायचं ? तिथं हिला कोण विचारील ?

'आता कवा वं पोचायचा ? कोर्टं आता बंद झालं की !' बाळू.

'कवाबी पोचंन. उंद्या पोचंन. परवादिशी पोचंन, पन जाईनच का न्हाय ? जाऊन सागी-नच कोरटाला–माजी सुई लावा. मला लुटली. माज हुतं–न्हवतं ती घेतलं. फसवून कागदाव माजं आगटं घेत्यातीय वय. आन आता मला वाऱ्याव सूडलीय. माजा म्हातारीचा सराप घेत्यातीय वय. वाट्टुळऽळं व्हइल त्यांचं ! माझा म्हातारीचा तळतळाऽऽट लागंल-वसखड हुईल... !'

दमली म्हातारी. धापाय लागली.

'आवं पन झोपनार कुट ?'

'कुटंबी झोपंन...आन का करायचंय जगून तरी...आन का हाय माज्यापशी तवा मला चोराचिलटाचं भ्या. ह्यो नौका ह्यो घडपा, यवडा हाय. बाकीचं साऽऽरं लुटलं! उगडी कीली मला. मी कोरटाच्या दारात बसन, आन म्हनीन त्याला, माजी सुई लावा त्याशिवी हालत न्हाय ! ..'

पोराचा डाव आता तिन्हीसाजा झाल्यानं मोडायच्या गतीला आला होता. खेळणाऱ्या तिघा पोरांच्यापेक्षा अगदीच पोरछाव अस-लेला नाम माळी डावात नव्हता. कडेला गुडघेमिठी मारून मान ताठवीत डाव बघून बघून कंटाळला म्हणून तो आपला खांबाला पायाची तिडी टाकून उभा होता. इतक्या थकील माणसानं निवाऱ्याला असायच्या वेळी अशा आडरानी असं पडावं ?

घटकाभर म्हातारीनं साऽऽरी तळतळ बाजूला ठेवली; केविलवाणं म्हणाली, 'मला यवडी भाकरी आनून देता का रं कुनी तरी ? ती दयायाचना करीत हा।।

खांबाशी उभ्या असलेल्या नामज्याकडं बघून नागू म्हणाला, 'जा आन जा रं, भाकरी जरा नामबा ! ' नामजीनं मानं वेळावून ते डावललं. त्याची लहर लागली असती तर त्यानं ढेगा मारीत घर गाठून आणलीही असती भाकरी. नामा जात नव्हता आणि पोरांच्या हातात डाव होता. तिघानाही अवघडल्यागत झालं. ती भुकेली म्हातारी नजर ह्याच्याकडं त्याच्याकडं टकाटका बघीत होती. येवढ्यात नागूचा भोड जुळून तो. सुटला. त्या उत्साहाच्या भरात डाव उचलून, पत्त्या टाकून पिरामागं जवळच असलेल्या आपल्या घरी जाऊन त्यानं म्हातारीनं मागितली तशी थोर चतकोर भाकरी आणून दिली. ती कोरडी भाकरी तिला चावेल का ? गिळेल का ? पाणीबिणी तिला लागेल, कुणाच्या काही ध्यानात आलं नाही. पोरं पागली.

¤

आदल्या दिवशी बेत केल्याप्रमाणं गुरां-मागच्या टोळक्यानं भाकरीवर सुकं कोर-ड्यास न आणता तेल-चटणी आणली होती. घरात घसमुरडीला येऊन तेलाची धार जरा जास्त सोडायला लावली होती. मानसिगच्या घरी त्याला जरा जास्त मोकळीक होती म्हणून त्यानं बारक्या बाटलीत तेल वेगळं आणलं होतं. किसनरावनं तर खोबऱ्याचा तुकडाही आणला होता. एक-दोघानी लस-णाचा कादा, कुणी मीठ, कुणी काड्याची पेटी, सायवूनं खेकड्याला भगुलं असा सारा सराजम गोळा केला होता. काय कमीबिमी पडेल का त्याचा एकवट होऊन हिशोब केला होता. मग अधेमधे ठेपे न खाता पोरानी तडक बोरबन गाठली होती.

घायपाताच्या खाली खडीच्या माळाला गुर हाकून पोरं येस्कळच्या बेदेत उतरली. सुग्या आटपून सगळीकडं भुरकाडं झाली होती. पांदीच्या वर गावाकडल्या अंगाला हिरीवर बागायत होतं; पण तिथं आता पपई असल्यानं गुर तिकडं तोड घेण्याचा प्रश्न नव्हता. बाकी सारी सडासुडाची काळी' वावरं, म्हसरं चुकायचं भ्या नाही. गावच्या ओढ्यापेक्षा येस्कळच्या बेदाडाला पाणी कमी आणि गाळवान मोळकाड असल्यानं बेचक्या-सादी जास्त, म्हणून येस्कळच्या बेंदाडाला खेकडा जास्त असतो हे पोरास्नी ठाव होत.

फासेपारधी, घिसाडी, छत्र्या दुरुस्त करणारी, नंदीवाली अशी लोकं खेकड्याला आली तर टिकाव- खोऱ्यानं बिळं काखहात खणून आतनं खेकड्याची पाट्याळीच्या पाट्याळी बाहेर काढतील. पोरांचा काही तेवढा घास नव्हता आणि हत्यारं तरी त्यांना कुठून मिळायची? सुतारवाडीकडनं पायवाट येते ती जिथं बेंदेत घुसलीय तिथनं पोरं धारेला उतरली आणि डोहाच्या कडेचे, बेचकांडाच्या कडेचे गाळवनातले दगडचिपा उलटायला त्यांनी जुपी केली. येड्या भिम्याकडं कापडं-भाकरी-छपाट्या काय असेल नसेल ते सोपवून पोरं खेकडं धरायला लागली. ती तिथं घोटाळेस्तोवर भीमरावनं जरा पुढं डोळ्याखाली असलेली जागा बघून सगळा सरजमा नेऊन तिथं ठेवला आणि थोडा वेळ पोरांचं खेकडं धरणं बघून 'आयला मुतून ईतू' म्हनीत सुतारवाडीच्या वाटेच्या अगाला निवडुंगाच्या आडोशाला पळाला. लघवी करून तो उठला त्या वेळी इकडं मानसिगनं बळ करून एक मोठी चीप उचलली आणि तिच्याखालचा मोठा थोरला काळ्या पाठीचा खेकडा बघून तो 'आयोऽऽ' करून ओरडला. तशी सारी पोरं बिचकली म्हणून 'ल्यका इरुळा' असं तो बळेच ओरडला आणि चीप सोडून बाजूला झाला. मानसिगनं चीप उचलली त्याच वेळी इकडं भिम्याला पायवाटेला असलेल्या मुटक्या जांभळीच्या आड्याल ओढ्याकडच्या बाजूला एक म्हातारी पडलेली दिसली. कोण म्हातारी वाट सोडून आडबाजूला कशी काय झोपलीय म्हणून तो बघायला जाणार तेवढ्यात त्याला मानसिगचं 'आयोऽऽ' आणि पाठोपाठ 'ल्यका इरुळा' ओरडलेलं ऐकायला आल्यानं तो इकडं धावला.

'कुठाय इरुळा' म्हणून बाकीच्यानी विचारल्यावर 'ती काय ल्यका' म्हणून मानसिगनं त्याना जरा चाळवलं; पण त्याचा जीव त्या काळ्या पाठीच्या खेकड्यात होता. त्यानं चिपेखाली मोठा खेकडा असल्याचं सांगितल्यावर सारी पोरं हालून त्याला धरायच्या नादाला लागली. सायबूनं चीप उचलून धरली; पण ती उचलून टाकल्यानं, पुन्हा उचलल्यानं जास्त खडूळल्या पाण्यात तळाचं काही दिसेना. म्हणून मानसिगनं नेहमीगतच बेगुमानपणे आत हात घालून चापसायला जुपी केली. 'तुमी आड्यालपड्याल ध्यान द्या रं!' त्यानं बाकीच्यास्नी बजावलं. त्याप्रमाणं साऱ्यांच्या नजरा सावध होत्या.

बराच वेळ चापसून टेहेळणी करीत असताना काही दिसत-धावत नव्हतं. तेवढ्यात भीमदादाला त्या म्हातारीचं ध्यान झालं. 'ल्यका, कोन म्हातारी तितं मदीच झपलीय' असं तो बोलणं पुरं करतोय न करतोय तोच किशा 'आल्याका' करून टुणुकदिशी उडी मारून अलवार बाजूला झाला. पायात वळवळल्यानं तो बिचकला तरी खेकड्याच्या आशेनं सावध असल्यानंच मोठ्यानं झेप घेऊन उडी न मारता तो अलवार बाजूला झाला. त्या जाग्यावर नेमक्या साऱ्याच्या नजरा गेल्या. तोच मानसिगला तरातरा खोल पाण्यात निघालेला खेकडा दिसला. आता तो निवळ पाण्यात होता. मोठा होता. खोल पाण्याचा विचार न करता मानसिगनं झेप घेऊन पालथा सफई हात टाकलाच. पंजाच्या पकडीत आल्यावर उजव्या हातानं त्या बाजूचा नांगा धरला. डावीकडचा नांगा धरताना अंगठा नांग्याच्या काट्यात आला आणि तो खेकड्यानं नांग्यात जाम केला. मानसिग थोडा कळवळला; पण खेकडा सोडला नाही! सारी जणं पाण्याबाहेर आली. 'ल्यका ल्यका' करीत विव्हळत मानसिगनं काठावर खेकड्याला डाव्या हाताखाली दाबून उजव्या सुरक्षित हाताखालचा नांगा काटकिनी मोडला. मग डावीकडचा मोडला, पण काटे रुतल्यानं नागा तसाच मानसिगच्या अंगठ्याला लोंबत होता. ती मजा बघीत बिननांग्याचा खेकडा सायबूनं कडाकडा मधोमध मोडला. त्याचा लंगोट सोडिवला. आतली पिवळी अंडी घेता का, यावर जरा बोलणं झालं.

आल्या आल्या एवढं पाट्याळं घावलं म्हणून पोरास्नी हुरूप आला होता; पण त्याच खेकड्यासाठी चीप उचलून मानसिग ओरडला म्हणून येडा भिम्या मुतून उठल्यावर त्या अध्यात ना मध्यात झोपलेल्या म्हातारीकडं जाता जाता राहिला. तो खेकडा जर मानसिगला न दिसता आणि तो तसा न ओरडता तर नक्की पुढं होऊन भिम्यानं म्हातारी झोपलीय का जागी आहे, का पडलीय तिथं, ते पाहिलं असतं आणि त्याच्या ध्यानात आलं असतं की ती झोपली नसून किंवा उगीच अधेमधे पडली नसून मरून पडलीय. कारण तिथं पडलेल्या म्हातारीच्या उघड्या तोंडात माशा घोंगावताना किंवा सुरकुतल्या डोळ्यांच्या खोबणीत वाऱ्याच्या झुळकीबिळकीनं उडून पडलेला पाला, धूळ असं काही तरी चिन्ह त्याला दिसलं असतं आणि तो भोळसट असला तरी ती जिती आहे की मेलीय हे त्याच्या ध्यानात आलं असतं. मग कदाचित पोरं घाबरली असती, बिथरली असती. खेकड्याच्या बेताचा विस्कोट झाला असता. कुण्या तरी पोक्त्या माणसाला गाठून त्यांनी ते मढं दाखवलं असतं; पण तसं काहीच घडलं नाही आणि आता सुतारवाडीकडनं किंवा नेरवाडीकडनं जरी कुणी आलं-गेलं तरी त्याला म्हातारी दिसायला काहीच मार्ग नव्हता. कारण ती आडबाजूला पडली होती. शिवाय दोन्ही गावची गुरं त्या शिवंधडीला न येता चौंडाबायला सात राजणाच्या डोहाकडं मोठ्या मोळवनाच्या पटांगणात आणि शिवाय तीही ओढ्याओढ्यानी चरत सावकाश येतात. आज खेकड्याचा बेत आणि बेंदाडाला खेकडा जास्त म्हणूनच ही पोरं या बाजूनं आली होती.

पोरं खेकडं धरीत पिळान मारून सात राजणांच्या डोहाच्या अंगाला खालीखाली जात राहिली. दगडचिपा उलटायच्या; बारके-चिरके मिळतील तसले चिगुर खेकडे धरायचे. काळ्या अंगाचा मोठासा खेकडा दिसला की त्याना आनंद व्हायचा. या वेळी मोकळ्या हाती जावं लागत नव्हतं म्हणून त्यांचा उत्साह दुणावत राह्यचा. पांढरट अंगाचा लिबलिबीत बिलबिला दुध्या खेकडा दिसला की पोरं त्याची किळस करायची. तरी कधी उगीच तसल्यालाही मारून टाकायची. कालवण कसं करायचं, कुठं धामण-विरोळा दिसतोय का यावर बोलणी व्हायची. असं करीत करीत दिवस कलता-कलता पोरं कट्टाळली आणि चौंडाबायला गावच्या ओढ्याला जिथं बेंद मिळते तिच्या कासरा- दोन कासरे अलीकडच ती धारेतनं बाहेर निघाली. गुरं चरून दुपारीला ओढ्याच्या डोहात पोहून उन्हं उतरता उतरता परत दात खुरटायला उठली. पोरास्नी त्याची काळजी नव्हतो. ती पुढं चौंडाबायकडंही

गेली नाहीत. कारण चूल पेटवायला त्याना इथंच जळण मिळणार होतं. पुढं झाडांचं गचपण संपून खडकाळ कटाण लागतं. तिथं गचपण नाही. त्यांनी बेंदाडाच्या झाडाझुडाच्या बुडख्याला पुराच्या पाण्यानं आलेल्या पुरवठ्याच्या काटक्यांचं जळण काढलं. डोहाकडेला सफई काळा दगड बघून त्यावर नांग्या-पाय मोडून टाकलेले खेकडे ओतले. लंगोट सोडवून सोलून काढून मोकळ्या पाण्यात खळखळ स्वच्छ धुऊन काढले. हिरवासुद्धा नागा चांगला लागतो म्हणीत मध्यमसा बघून तो खात राहिली. झिंगासुद्धा कच्चा खायला चांगला असतो अशी साऱ्यानी कबुली दिली. खेकडे धुतलेला दगड पाणी टाकून स्वच्छ करून त्यावर लसूण-खोबरं जरा चेचलं. सगळ्यांच्या चटण्या-मीठ एकजागी केलं. दगडाच्या चुलीत पुरवठ्याचं सरपण घालून ती पेटवली; वर भगुलं चढवलं. घरात बायका आमटी जशी फोडणीला टाकतात तसं लसूण-खोबरं परतून खेकडे फोडणीला टाकले. तोवर कुणी झरा करून कडणाला पाणी आणलं. लाल-जर्द होस्तवर मार्नासगच्या नुसत्या तेलात खेकडे परतल्यावर तिखटाचं कढत पाणी टाकून उकळून उकळून कालवण केलं. जाभ-ळीच्या सावलीला स्वच्छ स्वच्छ वाळुसऱ्याला कडं करून सारीजणं बसली. मध्ये खेकड्याचं भगुलं घेतलं. मानसिगनं कर्तेपणानं थोरल्या वाटीनं साऱ्यास्नी खेकडे वाटले. मोठा खेकडा साऱ्यानी वाटून घेतला. चिकार सापडले होते. कटळेस्तवर खाणार होती कुणाला कमी जास्ती उण्यादुण्याचा सवाल नव्हता. मस्त झालंय, मस्त झालंय करीत कडाकडा फोडीत पोरानी खेकड्याचं काल-वण खाल्लं. कडान ओरपलं. फडकी झटकीत वाटघा गाळानं घासून धुऊन काढल्या. झऱ्याचं पाणी घटाघटा प्याली. तिथं जाभ-ळीच्या तळाला लोळत ,घरी जायच्या वक्ता-पतवर रेंगाळली.

चौंडाबायच्या कडलात सात रांजणाच्या डोहाकडं जर पोरं असती किंवा बेंदाडाच्या बाजूनं येऊनही आज जर त्याना खेकडे मिळाले नसते तर आल्या वाटेच्या उलटघा बाजूनं गावच्या ओढधानं ती घरी परतली असती; पण ती आज अलीकडंच बेदेला होती; आणि चिक्कार खेकडा मिळालेली वाटच त्याना आपलीशी होती. नाही तर पोरास्नी एक वाट पुन्हा तुडवावी वाटत नाही. एक-मत होऊन अलीकडची अलीकडं साऱ्यांनी आली वाट धरली आणि गुरे हाकली.

रमतगमत जियनं खेकडे धरायला जुपी केली त्या जागी थोडी घोटाळत असताना येड्या भिम्याला त्या सकाळच्या म्हातारीची आठवण झाली. त्या जागेकडं ध्यान देता-देताच तो म्हणणार होता की, 'ल्येका, सकाळी तितं आदीमदीच येक म्हातारी पडली होती.' पण भीमरावचं ध्यान जाऊन म्हातारी जागची जाग्याला होती तशीच बघून त्याचं ते बोलणं आतच अडकलं आणि तो अचंबित झाला. खुट रोवल्यागत जागचा जाग्याला खिळला. तो भर ओसरल्यावर तो म्हणाला, 'ल्यका ल्यबक ल्येका सकाळी पडलीली म्हातारी जशीच्या तशी तितं हाय!'

'ल्यका कोन म्हातारी मदीच झोपलीय!' हे त्याचं सकाळचं बोलणं मोठ्या खेकड्याच्या नादात वाऱ्यावर विरून गेलं होतं; पण आता पोरं अगदी निवांत होती. त्याना काही तरी विषय हवाच होता. कुठाय कुठाय करीत सारी त्या जाग्याला गेली. अर्धवट उघड्या व्हटाळीत करंजाचं की कशाचं वाळलेलं पान अडकलं होतं. धुळीनं माखलेलं तोंड त्यांनी बघितलं. माशाही घोगावत होत्या. अंगा-वरचं लुगडं विस्कटलं होतं. पोरं घाबरली. बिथरली!

'सुतारवाडीची शिव टाकून जरा आडघाल नेरवाडीच्या शिवेत कोण म्हातारी मरून पडलीय, ही गोष्ट पोरांनी रस्त्यांनी पेरीत चावडीपतवर नेऊन भिडवली. पाटील हालला. कोतवाल आले. तिन्हीसांजेला मानसिगला घेऊन पाटील-कोतवाल त्या जागेला आले. ओळखू येईना. तशीच त्यानी सुतारवाडी गाठली. तिथला पाटील आला. सुतारवाडीत बातमी पसरली. पाटलाची बोलणी होस्तवर केरबा कोतवाल त्याच्या भनीकडं गया रामुसनीकडं गेला. का आला ते त्यानं गयाला सांगितलं.

केशा सुताराची कोण चुलत आजी का काय मरायला टेकली होती. तिला कुणी रक्ताचं मागंम्होरं नव्हतं. तिचं दायतं त्यानं हाडपलं जणू. तिला वाऱ्यावर सोडली. काल कुठ वोबलत इथं मारुतीच्या देवळात आली. देवळाच्या कंबरेइतक्या जोत्यावरनं कोचली. पिचकली. बेवारशी. गावावर बालट नको म्हणून सुतारवाडीतनं नेरवाडीच्या शिवेत येऊन पडली. ऐन गारठ्यात काकडून काक-डून गेली असेल राती. केशा देवदेवस्कीतला माणूस. अवसेपुनवेला चौंडाबायच्या सात रांजणाच्या डोहात मध्यान राच्चा नागवा होऊन कंबरेइतक्या पाण्यात उभा राहून काही मंत्रतंत्र करतो. त्याच्याकडं गंडेदोरे असतात. तो भाईरवशाचं काढतो. विच्चू उतरतो. पायात वहाण घालीत नाही. विटाळशीचं वारं घेत नाही. लोटताना केर-सुणीचा आवाज ऐकीत नाही. असे बरेच नेमधर्म त्याचे. कोण त्याच्या नादी लागेल? सारे त्याला भला म्हणून असतात. गयानं ही गोष्ट केरबाला सांगितली.

केरबा गयाकडनं पुन्हा चावडीवर आला...मूग गिळून राहिला. ते माघारी फिरले. कोतवालास्नी सजा : मड्यापशी थांबा. येकयेकानं जाऊन जेवून या. मी कोरेगावला जाऊन पोलिसास्नी खबर देऊन येतो! पाटील म्हणाला. शेवटच्या गाडीनं कोरेगावी आला. रिपोर्ट दिला. ऐन कडा-क्याच्या गारठ्यात पोलीस काय नि कोण काय तिथं येऊन करणार काय? कुणी आलं नाही की गेलं नाही. पाटील तडफडत पाय-पीट करीत घरी येऊन झोपला.

नेरवाडीच्या मावळत अंगाला सकाळी सकाळी नेवरू मांग, बाबा, गणू जाळ करून शेकत बसली होती. केरबा कोतवाल तीनं शेलची बॅटरी काखोटीला मारून शिवेकडनं आपल्या घरी जाता जाता शेकोटा घ्यायला थाबला. तिथं ती आतली बातमी खालच्या आवाजात त्याच्याकडून बाहेर पडून आता साऱ्या गावात होईल. पंचनामा होऊन वयस्कपणानं मयत झालेली बेवारशी म्हातारी मेली तिथंच जवळ मैदान पाहून जाळली. म्हातारी नेरवाडीच्या शिवेत होती. जळण-रॉकेल वगैरे खर्च नावे मौजे ग्रामपंचायत नेरवाडी.

□

# श्री. वसंतराव काणे (८०)
# स्नेहशील संपादक

वि. स. वाळिंबे

श्री. वसंतराव काणे यांनी वयाची साठी पार केलेली आहे, ही वस्तुस्थिती असली तरी ती चटकन स्वीकारायला मन तयार होत नाही. याचे कारण अगदी साधे आहे. पस्तीस–एक वर्षांपूर्वी वसंतरावानी आपल्या व्यावसायिक जीवनाला प्रारंभ केला तेव्हा त्यांच्यापाशी जो उत्साह होता, जी तडफ होती, तीच आता, दैनंदिन कार्यमग्न व्यापातून निवृत्त होण्याचे वय झालेले असताना, कायम आहे; पूर्वीइतकीच प्रखर आहे. वाढत्या वयोमानानुसार माणसाच्या जिद्दीला तडे जातात. वसंतरावांच्या बाबतीत तसे घडलेले नाही.

वसंतरावांना हे बळ कोठून लाभले ?

मला वाटते, ते त्यांना स्वभाव-रसायनातून मिळालेले आहे. वसंतराव कधी कोणावर रागावलेले मी तरी पाहिलेले नाहीत. संकटांच्या काचामुळे कधी स्वत.वरही कातावले नाहीत. मनःशांतीची ही दुर्मिळ देणगी त्याना स्वभावतःच लाभलेली असावी. वसंतरावांचे लौकिक जीवन आता सर्वांगांनी फुलले-बहरलेले आहे. त्यामुळे आता ते शांत, प्रसन्न, हसतमुख असले तर नवल नाही; पण मला आठवतो तो त्यांचा तरुणपणातील विलक्षण बिकट असा जीवनसंघर्ष.

अहमदनगर सोडून ते नुकतेच पुण्याला स्थायिक झाले होते. 'रोहिणी' मासिकाबरोबर मुद्रणालयाची मांडामांड करू पहात होते. त्या व्यवसायातील पुरेशा अनुभवाच्या अभावी वसतरावांना खूपच आर्थिक तोशीष सहन करावी लागत होती. सकाळी कचेरीत पाऊल टाकले की प्रथम दर्शन घडे ते धनकोचे. वैतागून जावे असेच त्या वेळचे वातावरण असायचे. व्यवहाराच्या बाबतीत आपण दिलेला शब्द पाळू शकत नाही याची वसंतरावाना मनोमनी खंत वाटे; पण परिस्थिती अशी होती की, कितीही खटाटोप केला तरी ते जमत नसे. हेलपाट्यांना कंटाळलेला सावकार मन जखमी व्हावे असे शब्द उच्चारी; पण त्या वेळीही वसंतरावांचा शात सोशिकपणा ढळलेला नसायचा. त्यांच्या तोंडून एकदाही वावगे उत्तर बाहेर पडले नाही. नोकरीची सुरक्षित वाट सोडून देऊन, स्वतंत्र व्यावसायिक म्हणून उभे राहण्याचा खडतर मार्ग आपण होऊन स्वीकारलेला असताना, या निर्णयाची पडेल ती किंमत चुकती केली पाहिजे, असे ते मानत असले पाहिजेत. त्यामुळे, आर्थिक विपत्तीनी घेरले गेलेले असताना देखील वसंतरावाच्या गौरवर्णीय चेहऱ्यावरील मिष्किल स्मित कधी ओसरले नाही. आपल्यावर रागावलेल्याचीही ते साहाय्यकर्त्याइतकीच अगत्याने वास्तपुस्त करीत. पुढे परिस्थिती बदलली आणि तिच्याबरोबर, सुरुवातीला सहन करावी लागलेली मानखडनाही वसंतराव मोठ्या मनाने विसरून गेले. त्याचे त्या वेळचे सावकार कालांतराने स्नेही होऊ शकले, यात वसंतरावाच्या परिस्थितिनिरपेक्ष ऋजुतेचा वाटा फार मोठा आहे.

येथे आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करायला हवा. माणूस कितीही कर्तृत्ववान असला, स्वत.वरचा त्याचा विश्वास कितीही अभंग असला तरी अनपेक्षित अडचण उभी ठाकली की तो गांगरतो, बावरल्यासारखा होतो. अशा वेळी जीवनसहचारिणीची समर्थ साथ मिळाली नाही तर त्याची हिंमत खचते. वसतरावांचे भाग्य असे की त्यांच्या आकांक्षा, त्यांची स्वप्ने समजावून घेणारी, त्यांच्याशी समरस होणारी पत्नी त्यांना लाभली. सौ. कमलताई पुण्यातील सदाशिवपेठेत वाढलेल्या आणि शालेय शिक्षणाच्या पलीकडे मजल न मारलेल्या. मुंबईचे बहुरंगी-बहुढंगी व्यापारीविश्व त्यांना अनोखे होते; परंतु वसंतरावाचा पुण्यातील व्याप वाढल्यानंतर त्यांना वारंवार मुबईला जाणे जमेना. सौ. कमलताईंनी ही जबाबदारी स्वतःकडे घेतली; इतकेच नव्हे तर वसंतरावांची अनुपस्थिती जाणवू नये इतक्या यशस्वी रीतीने ती पार पाडली.

'संध्या' हे सायंदैनिक सुरू करणे हे वसंतरावाचे मोठे धाडसच होते. कारण सायंदैनिकाचा प्रयोग पुण्यात त्यापूर्वीही अनेकांनी केला होता; नंतरही अनेकांनी करून पाहिला; पण एकटे वसंतरावच यशस्वी झाले. यामागे त्यांची चिकाटी तर होतीच; पण सगळ्या कुटुंबियांचा हातभार लागला म्हणनच आपल्याला हे अद्वितीय यश लाभले, हे मला वाटते, वसंतरावही मान्य करतील ! वसंतरावांच्या बरोबरीने सौ. कमलताई 'संध्या'च्या कचेरीत राबत असत. पुढे चि. अशोक वसंतरावांबरोबर कचेरीत जाऊ लागल्यावर सौ कमलताईंनी पुन्हा गृहिणीची भूमिका स्वीकारली.

'ज्वाला' साप्ताहिकाच्या रूपाने वसंतरावांनी पत्रकारितेची दीक्षा घेतली तेव्हा त्यांना कोणाचेही मार्गदर्शन लाभले नव्हते. ती त्याची अंतःस्फूर्त प्रेरणा होती; पण केवळ ते स्वतःच पत्रकार झाले नाहीत; त्यांनी आपल्या दोन धाकट्या बंधूनाही हा पेशा पत्करायला प्रवृत्त केले. त्यामुळे, काणे कुटुंबाच्या थोरल्या पातीने पुण्यात 'संध्या'ची मुहूर्तमेढ रोवली त्याच सुमाराला धाकट्या पातीने अहमदनगरला 'समाचार' हे सायंदैनिक सुरू केले आणि 'समाचार'चा संसार सुदृढ पायावर उभा करून 'हम भी कुछ कम नही' हे दाखवून दिले. वसंतरावांना अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. आपले मेहुणे श्री. मनोहरपंत फडके यांनी 'बहर' हे शेतीविषयक मासिक सुरू करण्याचे ठरविले तेव्हा त्यानाही वसंतरावाचे प्रोत्साहक पाठबळ लाभले. नव्या कल्पना, नवे उपक्रम याचा पुरस्कार करणे, त्याना साहाय्यभूत होणे याची वसंतरावाना आवड आहे आणि म्हणूनच ते 'काणे कुटुंबा' चे 'काणे परिवारा'मध्ये रूपांतर करू शकले.

वसंतरावांचा मित्रपरिवार समाजाच्या सर्व थरातील, सर्व वर्गातील, विविध पातळ्यावरील आहे. याचे कारण वसंतराव हा माणसात रमणारा माणूस आहे. शेतकरी आणि उद्योजक, राज्यकर्ते आणि विरोधक, उच्चपदस्थ आणि उपेक्षित–वसंतराव सगळ्याशी तेवढ्याच आत्मीयतेने जवळीक साधू शकतात. पुण्यात प्रेस क्लबची वास्तू उभारली जावी यासाठी वसंतराव जेवढा पुढाकार घेतात तेवढाच उत्साह जिल्हा पातळीवरील छोट्या वृत्तपत्राची संघटना बांधण्यातही दाखवितात. वसंतराव केवळ

पत्रकार नाहीत. त्याच्या अंतरंगात एक सार्वजनिक कार्यकर्ताही वावरत असतो. तसे नसते तर केवळ ' संध्या ' स्थिरपद करण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले असते; पण गेली चार–पाच वर्षे ते एका वेगळ्याच उद्योगात गढून गेले आहेत. ' संध्या 'सारखी महाराष्ट्रात तीनशे-साडेतीनशे जिल्हा वृत्त पत्रे आहेत. वसंतरावानी त्याचा सहकारी संघ स्थापन करण्याचे ठरविले असून या कार्यासाठी ते आपला बराच वेळ देत असतात. मुबईपासून दूर असलेल्या जिल्हा वृत्तपत्रांना अनेक प्रकारची गैरसोय सहन करावी लागते. प्रशासन–यंत्रणेला जाग करण्यासाठी वारंवार मुबईला येणे त्यांना जमण्यासारखे नसते. जिल्हा वृत्तपत्रांना एकत्र आणून, आपले प्रश्न सोडविण्याला त्यांना समर्थ करणे, हा संकल्पित सहकारी संघाचा प्रमुख उद्देश राहणार आहे.

वसंतरावांना ग्रामीण भागाविषयी विशेष आस्था आहे. सहकारी साखर कारखान्यांमुळे आतापर्यंत नागरी सोयी–सुविधांना वंचित असलेल्या खेडूत जनतेमध्ये परिवर्तन–प्रक्रिया सुरू झालेली आहे हे जाणून घेऊन या परिवर्तनाचे पडसाद टिपण्यासाठी त्यांनी 'ऊसमळा' हे मासिक सुरू केले. या मासिकामुळे वसंतरावांना महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्वाशी अनुबंध जोडता आला आणि या नेतृत्वाच्या मनोगताला ' ऊसमळ्या 'मधून प्रसिद्धी देणे शक्य झाले. ' पंचायत ' हे मासिक सुरू करण्यामागेही वसंतरावांचा हाच दृष्टिकोन होता; परंतु हे प्रकाशन पायरोवा करीत नाही असे आढळून आल्यावर ते अकारण चालू ठेवण्याचा अट्टाहासही त्यांनी बाळगला नाही.

वसंत काणे हे नाव प्रथम प्रकाशात आले ते ' रोहिणी 'मुळे. सुरुवातीला कै. बापूसाहेब माटे आणि श्री. भा. द. खेर या ख्यातनाम साहित्यिकांच्या सहकार्याने वसंतरावानी हे वाङ्मयीन मासिक सुरू केले असले तरी अल्पावधीत ' रोहिणी 'ची सर्व जबाबदारी त्यांच्याकडेच आली. ' रोहिणी 'चे संपादन करीत असताना वसतरावांनी एक गोष्ट कटाक्षाने जपली आणि ती ही की आपले नवोदित लेखक–लेखिकाचे माध्यम झाले पाहिजे. चागले लेखनगुण असलेला साहित्यिक, नावाचे वलय नाही म्हणून दुर्लक्षित राहता कामा नये, हा ' रोहिणी 'च्या सपादनामागचा वसंतरावाचा विचार अनेक उदयोन्मुख साहित्यिकांना प्रकाशात आणायला, नाव मिळवून द्यायला कारणीभूत ठरलेला आहे. आज नावाजल्या जात असलेल्या अनेक तरुण–तरुणीचे पहिलेवहिले लेखन ' रोहिणी 'च्या अंकांमधूनच वाचकांना सादर झालेले आहे.

' रोहिणी 'ची लोकप्रियता वृद्धिंगत झाली ती तिच्यातील ' शुभमंगल मेळया 'मुळे. नावावरून वाटते तसे केवळ वधूवरसूचक मंडळ असे या सदराचे स्वरूप नाही. विवाह ही व्यक्तिजीवनातील अत्यंत महत्त्वाची आणि तितकीच नाजूक घटना असते आणि म्हणूनच याबाबतीत फसवणूक होण्याचा धोकाही मोठा असतो. वधूवराना परस्परांसंबंधी, विवाहबधन स्वीकारण्यापूर्वी संपूर्ण आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून दिली तर वैवाहिक जीवन अयशस्वी होण्याचा सभव बराच कमी होईल हे ओळखून वसतरावानी ' शुभ मगल मेळा ' हे सदर सुरू केले. त्यानंतर, त्यांना घटस्फोटाच्या खडकावर आदळून ज्याचे गृहजीवन उद्ध्वस्त झालेले आहे अशा असंख्य व्यक्ती भेटायला येऊ लागल्या; आपली कर्मकहाणी सागू लागल्या. या दुर्दैवी जीवांचे पद्धतशीर पुनर्वसन करण्याचे कार्य हाती घेऊन वसंतरावानी ज्ञात–अज्ञात बंधु–भगिनीचा दुवा मिळविलेला आहे. ' शुभ मंगल मेळ्या 'च्या रूपाने वसंतराव केवढ्या मूलभूत महत्त्वाचे समाजकार्य पार पाडत आहेत, याचे जितेजागते पुरावे महाराष्ट्राच्या आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक घरांतून पहायला मिळतात. वैवाहिक जीवनाविषयी किंवा एकूणच स्त्री–पुरुषसंबंधाविषयी, त्यातील गुंतागुंतीसंबंधी एखाद्याला सखोल आणि सर्वंकष जाण प्राप्त करून घ्यायची जिज्ञासा असेल तर त्याला ' शुभमंगल मेळ्या 'च्या फायलीमधील पानोपानी उमटलेले उसासे आणि निश्वास यांची दखल घ्यावीच लागेल !

परवा, बऱ्याच दिवसांनी वसंतराव अचानक भेटले तेच दिलखुलास हास्य, गंमतीने बोलण्याची तीच लकब, तोच अकृत्रिम जिव्हाळा. जुन्या दिवसाची आठवण निघाली. बोलण्यात कोठेही कटुता नाही; कोणाबद्दल राग वा आकस नाही. सगळे कसे तृप्त आणि समाधानी. दीड तास मजेत गेला. निरोप घेताना मी म्हटले, ' वसंतराव, आतापर्यंत खूप कष्ट केलेत. आता थोडी विश्रांती घ्यायला काहीच हरकत नाही !'

लगेच म्हणाले, ' कशाला ? दिवसभर थकून घरी गेल्यावर, डोकं दाबायला आई आहे, पाय चेपायला नातू आहे. माणसाला या वयात आणखी काय हवं असतं ?'

या वेळी वसंतराव वेगळे वाटले. आवाजात गहिवर होता; चष्म्याआडच्या पापण्या ओलावल्या होत्या. □

( एकसष्टीसमारंभ दि. ८ फेब्रुवारी )


**New Titles Received**

1. The Rockefellers–(Biography of an American dynasty)– Peter Collier & David Horowitz– $ 2–75/-
2. Sharky's Machine–( Thriller )– William Diehl
3. The Complete Scarsdale Medical Diet– Herman Tarnower & Samm Sinclair Baker– Rs. 23–40/-
4. The Search for the Gold of Tutankhamen– Arnold C. Brackman $ 1–95/-
5. The Hide And Tallow Men– ( Western ) – J. T. Edson

□ महागडी पुस्तके विकत घेण्याकरिता फक्त काही दिवस सर्व प्रकारच्या वर्गण्यांवर २५% सूट !

५ वर्षे, ७ वर्षे व Life membership घेऊन भरपूर सूट मिळवा ! !

□ Phoenix–a Library which has extended the life of a newspaper from one day to several years.

The Phoenix Library, 727 Sadashiv, Pune-30.

# पुस्तके

## ' सलाम ' ला ॲकॅडेमी अवॉर्ड मिळाले त्यानिमित्ताने—

## गुप्तकाळातील सुवर्णयुगातील कवी आणि ' श्वापद '

—अजय आरोसकर

गुप्तांच्या सुवर्णयुगात कवी कालिदासांनी उत्तमोत्तम नाटके लिहिली. आजही त्याचा परिमळ मोहवितो.

केसरबाई केरकरांचे संगीत राजेरजवाडयांच्या महालात, दरबारातच रंगले. ज्या काही तबकडयात त्यांचे संगीत आज सामान्यांनाही उपलब्ध आहे ते मोडक्या एका खोलीच्या संसारातही रंगते.

अभिजात कला, अभिजात मूल्ये, चिरंतन मानवी मूल्ये या गोष्टी प्रत्यक्ष आहेत. मानवाने निर्माण केल्या आहेत. जतन करून ठेवल्या आहेत.

चिरंतन मानवी मूल्ये कोणती ? यादी स्पष्टपणे मर्यादित करता येणार नाही; पण करीम खाँचे गाणे चिरंतन आनंद देणारे असावे असे वाटते. शाकुंतल वाचताना हजारो वर्षांनंतरही जी मोहिनी मनावर पडते ती केवळ शब्दलालित्यामुळे नसावी.

' असावी ' ' नसावी ' असे शब्द मी का वापरतो ? निश्चितपणे ' आहे ' ' नाही ' असे का म्हणत नाही ?

कारण आज असे काही निश्चित सांगता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

' सलाम ' ही कविता कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनात गाजली. त्या वेळी आणीबाणी होती.नंतर पुण्याच्या साहित्य संमेलनात ती परिणाम करू शकत नव्हती. कारण प्रसंग वेगळा होता. कविता प्रासंगिक तर खरीच; पण प्रासंगिक कविता क्षणभंगुर असली तरी चिरंतन मूल्यांना स्पर्श करू शकत नाही का, हा प्रश्न आहे.

' सलाम ' या संग्रहातील ' तुमच्यासाठी ' आणि ' राघोबा रघुनाथ ' यासारख्या काही कविता सोडल्यास कवीने एका विशिष्ट भूमिकेतून लिहिलेल्या कविता या संग्रहात एकत्रित केल्या आहेत.

त्यामुळे मी हा प्रश्न उपस्थित करतो की, प्रासंगिक कविता ही क्षणभंगुरच, प्रसंगापुरतीच जगणारी असते का ? की त्या कवितेतही चिरंतन मानवी मूल्यांना स्पर्श करण्याची शक्ती असते, असू शकते ?

दुसऱ्या महायुद्धानंतर holocaust literature म्हणून काही लिखाण प्रसिद्ध झाले आहे. हिटलरने ज्यूंचे जे हत्याकांड केले त्यामध्ये जळालेले जे अनेक कलावंत व निरुपद्रवी माणसे होती त्यांनी लिहिलेले व त्यातूनही वाचलेल्या लोकांनी लिहिलेले हे लिखाण. मानवाची सहन करण्याची अंतिम सीमा कोणती हे सांगणे कठीण; पण धगधगत्या भट्टीमध्ये पूर्ण नग्नावस्थेत जिवंतपणे जाळले जाण्याच्या अगोदर केलेले लिखाण म्हणून ते सुन्न करते. त्यांच्या वाङ्मयीन मूल्याचा विचार कोणी केलेला नाही, अजूनही कोणी करू शकत नाही. तो अनुभव, ते सारेच विसरण्याची माणसाची धडपड असते ते चूकही नव्हे. फक्त वर्षातून एका दिवशी इस्त्राइलमध्ये ते सारे T. V. वर दाखविले जाते ते एवढ्याचसाठी की, हे सर्व अशक्य वाटणारेही होऊ शकते— केव्हाही होऊ शकते.

' सलाम ' ही कविता त्या भडाग्नीतून जन्म पावते.

असा भडाग्नी जिवंत माणसाला जेव्हा अनुभवावा लागतो तेव्हा ' श्वापद ' ही कविता जन्म पावते.

आणि कदाचित् असे असेल की, कालिदासाला या श्वापदाची जाणीव नसावी. ती शक्यतादेखील त्या वेळी नसावी. या श्वापदाची जाणीव ठेवून शाकुंतल निर्माण करणे शक्य नाही.

आणि एकदा ' श्वापद ' निर्माण केल्यानंतर ' शाकुंतल ' लिहिणे किंबहुना त्याचा आस्वाद घेणे अवघड होऊन बसते.

ग्युरेन वाल्ड या जर्मन चित्रकाराने एका धर्ममंदिरात ख्रिस्ताचे जे चित्र काढले आहे ते ( सोळाव्या शतकात) आजही टीकाकारांना चकित करते. कारण त्यात ख्रिस्त हा विकलांग दाखविला आहे. आजूबाजूची चित्रे देखील विटलेली, शेवाळे गाळणारी झाडे व क्रूर आणि कुजणारी माणसे दाखविणारी— म्हणजे क्रूसावरतीही देखणा असणारा ख्रिस्त यात कोठेच नव्हता. असेच एक होल्बाइन या चित्रकाराने ख्रिस्ताचे शरीर क्रूसावरून खाली काढलेल्या अवस्थेत कुजत असलेले दाखविले आहे. एकीकडे देवाचा दूत, शांततेचा, प्रेमाचा संदेश देणारा दूत आणि त्याची ही अवस्था- पण या दोन चित्रकारांखेरीज असा एकही चित्रकार अद्याप नाही की, ज्याने ही घटना अशी मांडली. सर्वांनी, अगदी साल्वादोर दालीने म्हणजे आजच्या चित्रकाराने, ग्लासगो चित्रसंग्रहालयासाठी जे ख्रिस्ताचे चित्र काढले ते विलक्षण मन उंचावणारे, पण देखणे असेच काढले. त्यातील उदात्तता व देखणेपणा मोहवितो.

म्हणजे ' सलाम ' कवितेतील आशय हा म्हटलेतर प्राचीन; पण त्याची फार वाच्यता कोणी करीत नाही. करणे आवडत नाही.

क्रूरता नको वाटने, किसरावीशीच वाटते, त्याच कलात्मक आविष्कारही फार लोकप्रिय, टिकाऊ तरी होत नाही.

मंगेश पाडगावकर इतक्या टोकाला जातही नाहीत. ' सलाम ' या

काव्यसंग्रहात देखील 'तुमच्यासाठी' या आपल्या तीन मुलांना दिलेल्या कवितेत 'यापुढचे सारे सूर्य तुमच्यासाठी उगवतील, यापुढचे सारे सूर्य तुमचे आहेत' असे हळवेपणाने, आशावादी सूर काढतात.

त्याची 'छोरी' आपल्याला पुन्हा भेटणार नाही. विशीत लिहिलेली ती कविता तशी बालपणातील एका साध्या अनुभवावर आधारलेली. अभ्यास केला नाही- कोरी पाटी– मास्तरनी सपासप छड्या मारल्या– हाताची आग– त्यावर एका छोरीने ठेवलेली कैरीची फोड. हळुवारपणे जपलेला हा अनुभव पुन्हा केव्हा नि कसा भेटणार ? त्या हळुवार अनुभवाची अनेक दर्शने पुन्हा होणार नाहीत.

'कधी कधी बाबा अगदी लाडात येतात.

व्यायाम केलाच पाहिजे म्हणून फिरायला चला म्हणतात.

टॅक्सीतून घेऊन जातात, टॅक्सीतून परत आणतात.

आणि आमच्या निमित्ताने आपण भरपूर भेळ खातात'

हेही पाडगावकर 'सलाम' मध्ये भेटत नाहीत.

'सलाम'मध्ये भेटणारे पाडगावकर वेगळे, 'काळजीपूर्वक' वेगळे आहेत म्हणजे १९७०–८० या कालात त्यांनी तरल कविता केल्या नाहीत असे नाही. पण त्यांना सलाममध्ये आवर्जून असे म्हणायचे आहे की, हा कुजणारा, शेवाळणारा ख्रिस्त पहा. इथे शाकुंतल शक्य नाही. गुप्तकाळात सुवर्णयुगातील कालिदास इथे शक्य नाही. अशी ही स्थिती मानवानेच निर्माण केली आहे. त्या मानवाला मानवानेच केलेला हा सलाम आहे. हा सलाम भयंकर आहे. कारण तो क्षणभगुर नाही. क्षणभंगुर आहे ती छोरी, भेळ खाणारा बाप, भीमसेनचे गाणे.

'श्वापद' मरणार नाही. कधीच मरणारे नाही. कारण त्याचे मानवाला विलक्षण आकर्षण आहे. हिटलर एखादाच असेल; पण प्रत्येक मानवात हे श्वापद आहे. आणि ते सर्वांना झपाटून टाकणाऱ्या सामाजिक रूपात केव्हा येईल हे सांगता येणार नाही.

सलाममध्ये आहे ते ग्रीक नाटकातले अटळ कारुण्य; पण उदात्ततेचा स्पर्श नसलेले. जीवनाची असहाय्यता, अगतिकता व त्याविरुद्ध दिलेली बिनदिक्कत धडक आणि हे जाणून की, हे सर्व व्यर्थ आहे. त्यातून हाती अपयशाखेरीज काहीही येणार नाही, तरीही दिलेली धडक आणि त्यातून निर्माण झालेले निराधार, अगतिक, उघडे, अर्थशून्य कारुण्य !

'उद्याचे सर्व सूर्य तुमचे आहेत.

आजचे ?

आज सूर्य उगवलेलाच नाही.

उमलणारी सर्व फुले तुमची आहेत.

पण फुले आहेतच कुठे ?

कोठे, कधी तरी ती उमलतील तेव्हा ती तुमचीच असतील.'

पाडगावकर फार टोकाला जात नाहीत. त्यांना त्यांची मुले (अजित, अंजली, अभय) आशा देतात.

फुले इथे नसतील, या विश्वातही नसतील. फुलांची संकल्पना देखील मानवी जीवनात शक्य नाही, या कल्पनेपर्यंत ते जात नाहीत.

फुले कधी तरी, कोठे तरी उमलतील, उमलत असली पाहिजेत, उमलावीत आणि ती सर्व नवीन येणाऱ्या मानवांची असतील, असावीत, असू देत असे ते म्हणतात.

पण ते फक्त 'तुमच्यासाठी' या कवितेत बाकी सर्वत्र उथळ कलाप्रेम आहे, खोटेपणा आहे 'तिला उमजलेले कुमारगंधर्व' आहेत आणि या उथळ जगाला साज देणारा तो भयंकर सलाम आहे.

श्वापद झोपी जाते तेव्हा संस्कृती निर्माण होते.

श्वापद कायमचे कधीच झोपी जात नाही.

तेव्हा गुप्तकाळातील ते सुवर्णयुग नष्ट झालेले असते.

भीमसेनचे गाणे त्या सुवर्णयुगातले. तसे ते सुवर्णयुग आपल्या मनात असतेच. आश्चर्य वाटावे; पण हिटलरच्या हृदयातही ते सुवर्णयुग होते.

गॅस चेंबरमध्ये जाळायला निघालेला अधिकारी सकाळी त्या सुवर्णयुगातले मोझार्टचे संगीत ऐकून, मनात घोळवून बाहेर पडत होता व त्या जिवंत जळणाऱ्या मानवांच्या अखेरच्या किंकाळ्या बंद होईपर्यंत तेथे थांबत होता व घरी परत आल्यावर पुन्हा ते उदात्त संगीत ऐकत होता.

श्वापद कधीच झोपी जात नाही.

सलाम केव्हाही शक्य होऊ शकतो. कोणत्या क्षणी, कोण कोणाला सलाम करील हे सांगता येणार नाही. भलेभले तत्त्वज्ञही सलाम करतील अगदी तर्कशुद्धपणे !

आणखी एक सांगायचे राहिले.

कलेने कधीही, कोठेही राज्यक्रांती केलेली नाही. राज्यक्रांतीची कारणे सांगताना इतिहासाच्या शालेय, पाठ्यपुस्तकात वॉल्टेयरच्या पुस्तकांमुळे क्रांती झाली असा उल्लेख येत असे; पण ते खरे नाही.

तसे असते तर डिकन्सच्या कादंबऱ्यांनी इंग्लंडमधील बकाल जीवन कायमचे नष्ट व्हायला हवे होते.

स्टोनच्या 'अंकल टॉम्स केबिन' या प्रचंड गाजलेल्या कादंबरीने अमेरिकेतील निग्रोंची समस्या थोडी तरी सुटायला हवी होती.

साम्यवाद पृथ्वीतलावर आणला आहे असा दावा करणाऱ्या रशियातील सोल्झेनित्सिनला देशत्याग करावा लागू नये.

श्वापद मेलेले नाही.

सलाम चिरंतन आहे.

दुर्दैवाने सलाम चिरंतनच राहणार आहे.

गुप्तकाळातील सुवर्णयुगात कालिदासाला हे श्वापदाचे स्वरूप कदाचित माहीतही असेल; पण त्याच्या प्रतिभेला संयम, तोल, मर्यादांची जाणीव होती व त्याचा सांभाळ केला तरच संस्कृती उभी राहू शकते हे भान त्याला होते.

आज सर्व शक्यता नुसत्या तपासून पाहिल्या जात नाहीत तर प्रत्यक्षात त्या अनुभवल्या जात आहेत.

अशा वेळी एकाच वेळी एकीकडे भीमसेनच्या 'थरारली वीट' या अभंगाला 'वाहवा' आणि त्याचबरोबर इतर कोणत्याही फालतू गोष्टीला वाहवा शक्य होत आहे.

अशा या काळात 'गुप्तकाळातील सुवर्णयुग' सांभाळणे कितपत शक्य आहे ?

गुप्तकाळातील सुवर्णयुगातील कवीच खरा मानवाला मानवाचा दर्जा देणारा कवी होऊ शकतो.

पण 'गुप्तकाळातील सुवर्णयुग' हे केवळ सकाळच्या न्याहारीच्या वेळचे मन रिझविणारे साधन–मग ते कोणाचेही असो, नाझीचे असा आग्रह नाही–होते त्या वेळी चिरंतन मानवी मूल्ये कोणती हा प्रश्न

उपस्थित होतो.

एरव्ही नाही.

एरव्ही चिरंतन मानवी मूल्ये सर्वांना न सांगताही माहीत असतात व त्याची काटेकोर यादीही अपेक्षित नसते.

'सलाम' नंतर मात्र ही चिरंतन मानवी मूल्ये कोणती याची निश्चित यादी करता येणे अवघड आहे.

सलाम आहे तो त्या वृत्तीतला. 'सिंहासन' ही कादंबरी परिपूर्ण नसेलही. तसे मराठीतील एकही पुस्तक परिपूर्ण नाही, पण ज्या पद्धतीने विचारवंत त्याची चर्चा करीत आहेत, त्या दृष्टीने ही वृत्ती अखेरी 'सलाम'मधीलच आहे.

सलाम कायम आहे.

'सलाम'मध्ये फुले उमलणार नाहीत. उमलावीत अशी इच्छा आहे; पण शक्यता कमी.

प्रश्न आणखी एक दुसराच आहे. तो 'सलाम' स्वीकारील का?

प्रश्न हा की–

हो, या गांडुळालाही सलाम; पण गांडूळ म्हणाले की, अरे, मला कसला सलाम करतोस? मी तर तूच आहेस. तर–

तू काय करशील? आणि काही करणार आहेस का?

प्रतिस्पर्धीही केवळ सत्तास्पर्धेत सत्तास्पर्धेसाठी उतरतात. हिटलरला प्रतिहिटलरच–त्याच डावपेचासह उभा राहतो तेव्हा प्रश्न पडतो–

सलाम कोणाला करायचा?

मंगेश पाडगावकर या प्रश्नाचे उत्तर देणार नाहीत. कारण ते कोणालाच देता येणार नाही.

म्हणून 'सलाम' ही एक चिरंतन समस्या आहे. □

---

फिनिक्स निवड

# More Books In Offing

याच सदरात याच मथळ्याखाली 'माणूस'च्या ११ ऑक्टोबर १९८० च्या अंकात प्रसिद्धीच्या मार्गावर असलेल्या काही पुस्तकांविषयी लिहिले होते. त्यातली काही पुस्तके प्रसिद्ध होऊन फिनिक्समध्ये दाखल सुद्धा झाली आहेत. लॅरी कॉलिन्स व डॉमिनिक लापिए याचे 'द फिफ्थ हॉर्समन' या पुस्तकावर मी आणि रवींद्र बिवलकरांनी स्वतंत्र लिहिलेसुद्धा आहे. त्यानंतर याच लेखात उल्लेखिलेले आयर्विंग वॉलेसचे 'द सेकंड लेडी' हे सुद्धा माझ्या ग्रंथालयात आलेले आहे.

'एक्झोडस'फेमवाले लिऑन युरी यांचे एक नवीन पुस्तक बाजारात येत आहे. त्याचे शेवटचे पुस्तक 'ट्रिनिटी' आमच्या ग्रंथालयात दाखल होऊन बरेच दिवस झाले. ते दाखल झाले त्या वेळेला त्याची इतकी मागणी होती की, तीन-तीन प्रती पुरत नव्हत्या. लिऑन युरीच्या पुस्तकाला नेहमीच मागणी असते. त्यांचे १९७२ साली बाजारात आलेले QB VII या पुस्तकाचे स्वागत मात्र वाचकांकडून चांगले झाले नाही.

लिऑन युरी यांच्या पहिल्या बायकोने (मार्जोरी युरी, वय २६) लग्नानंतर सहा महिन्याच्या आतच गोळी झाडून आत्महत्या केली होती, अशी एक पाच ओळीची बातमी २८-२-६९ च्या टाइममध्ये आली होती. त्यानंतर युरीनी जील नावाच्या बाईशी लग्न केले. आता या जोडप्याचे एक नवीन पुस्तक या वर्षाअखेर प्रसिद्ध होणार आहे. त्याचे नाव असेल 'जेरुसलेम, सॉंग ऑफ सॉंग्स'. हे पुस्तक डबल डे नावाचे प्रख्यात प्रकाशक प्रकाशित करणार आहेत. या पुस्तकात जीलचे १०० वर फोटो असतील व एक लक्ष वीस हजार शब्दांचा मजकूर लिऑन युरी याचा असेल इ. स. पूर्व १५०० ते आत्तापर्यंतची जेरुसलेमविषयी माहिती या पुस्तकात असेल. हे काही फक्त प्रवास व इतिहास यांचे पुस्तक नसून त्यात युरीची स्वतःची अशी स्वतंत्र मते मांडली असतील अरब व ब्रिटिश लोकांविषयी युरींनी अत्यंत निर्भीड व परखडपणे लिहिले आहे. जेरुसलेमची वार्ता तशी नवीन नाही, तरीपण लिऑन युरी यांना या विषयावर बरेच काही नवीन सांगायचे आहे.

मायकेल कोर्डा हे सीमन अॅण्ड सुस्टर या प्रसिद्ध प्रकाशनसंस्थेचे संपादक. (पाश्चात्य देशात बहुतेक प्रकाशन संस्थेत पूर्ण वेळचे संपादक असतात. मालक-मुद्रक-प्रकाशक-संपादक असेल प्रकार जवळजवळ नसतातच. संपादक नेहमी डोक्यात राख घालून असतात. तसे व मालकही. प्रकाशक व मुद्रक याचे मात्र तसे नसते. दोन्ही प्रकारची राख एकत्र येऊ नये म्हणून तिथे असे केले असेल!) मायकेल कोर्डा हे प्रकाशझोतात आले ते त्यांच्या 'Power' व 'Success' या पुस्तकांमुळे. आता ते फिक्शनकडे वळलेत. त्याचे पुस्तक मात्र दुसरीच प्रकाशनसंस्था छापत आहे. रँडम हाउस. युरोपमधील एका गर्भश्रीमंत कुटुंबावर ही कादंबरी आहे. कुटुंबातील सूड, वैरबुद्धी वगैरे विषयावर ही कादंबरी आहे.

नॉर्मन मेलर याना नेहमीच तुफान मेल येत असते. फॅन मेल. त्यांच्या वाचकाची. त्यांचे सध्या एक प्रख्यात पुस्तक बाजारात विक्रीकरता आले आहे. बहुतेक ते गॅरी गिलमोर या कैद्याविषयी आहे. या कैद्याने पुष्कळ प्रमाणात अमेरिकेत व काही प्रमाणात जगभर काहूर माजवले होते. या कैद्याने खून केला होता. त्याचा हट्ट असा की त्याला फाशी द्यावी! या पुस्तकात पाश्चात्य देशातील अॅफ्लुएंट सोसायटीची पोकळी आ वासून व भकास नजरेने आपल्याकडे बघते. द 'एक्झिक्युशनर्स' सॉंग हे पुस्तक लिहिल्यानंतर नॉर्मन मेलर यांना आणखी कैद्याची पत्रे यायला लागली. त्यात त्यांना जॅक अॅबट या कैद्याची पत्रे फार आवडायला लागली. हळूहळू या अॅबटने मेलर यांना एक हजार पानांची पत्रे पाठवली. अॅबट याला कोणत्याच प्रकारचे शिक्षण मिळालेले नव्हते. मेलर व या कैद्याने 'न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स' या नियतकालिकात तुरुंगाचे चित्रण द्यायला सुरुवात केली. आतापर्यंतच्या कोणत्याच तुरुंगाच्या चित्रणापेक्षा हे चित्रण वेगळे आहे. या मेलरच्या भागीदारी लिखाणातून मिळालेल्या पैशाचा उपयोग अॅबट हे कैदी पॅरोल मिळवण्यासाठी करणार आहेत.

प्रेसिडेंट ट्रुमनची मुलगी मार्गारेट ट्रुमन रहस्यकथेकडे वळलीय्. सहाजिकच तिला राजकारणाचा फर्स्टहॅंड अनुभव आहे. तिने

'मर्डर इन द व्हाइट हाउस' हे पुस्तक लिहिले आहे. ह्या बाई आपल्या वडिलां-बरोबर वॉशिंग्टनच्या राजकीय गोटात पुष्कळ वर्षे वावरत होत्या. व्हाइट हाउस-मध्ये तर अर्थात त्या रहात होत्याच; पण पुढे एका पत्रकाराची पत्नी म्हणून वॉशिंग्टनमध्ये आणखी त्या गोटात राहिल्या होत्या. त्यांच्या पुढील पुस्तकाचे कामचलाऊ नाव 'मर्डर ऑन कॅपिटॉल हिल' ठेवले आहे. हे बहुतेक पुढच्या वर्षी प्रकाशित होणार आहे.


पीटर मॅथियासेन यांचे नाव वाचले की, त्यांच्या तत्त्वज्ञानप्रचुर वक्तव्याची आठवण येते. ही वक्तव्ये त्यांनी त्यांच्या आधीच्या The Snow Leopard या पुस्तकात केली आहेत. या पुस्तकाबद्दल मी 'माणूस'मध्ये लिहिलेले होते. ते दक्षिण टांझानियात सफरीला गेले होते. हा दक्षिण टांझानियाचा भाग पुष्कळ प्रमाणात अज्ञात व गूढ आहे. त्यांनी बरोबर प्रख्यात फोटोग्राफर युगो व्हॉन लॉविकनाही घेतले होते. ह्या दोघांनी या प्रदेशाची छायाचित्रे व माहिती गोळा करून 'सँड रिव्हर्स' नावाचे पुस्तक लिहिले आहे. ते पहिल्या पुस्तकाइतके तत्त्वज्ञानयुक्त नसले तरी भरपूर वन्यजीवनयुक्त आहे असे कळते.

असे दिसत आहे की, इराणच्या शहाच्या आत्मचरित्राचा पुढचा भाग प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. मी इराणच्या शहाचे आताच एक रु. १२५।– चे आत्मचरित्र घेतले आहे. हे लिस्सीच्या 'विकास'ने प्रकाशित केले आहे; परंतु Answer to History हे शहाचे दुसरे आत्मचरित्र सॉल स्टॅन नावाचा प्रकाशक प्रकाशित करीत आहे अशी बातमी वाचल्याचे आठवते. पुस्तकाची नावे बदलणे, चित्रे बदलणे वगैरे प्रकार इंग्रजी पुस्तकांच्या बाबतीत भरपूर होत असतात; पण निदान शहांच्या बाबतीत तरी तसे नसावे असे वाटते.

अमेरिकेत स्तंभलेखकांचे कॉलमचे कॉलम सिंडिकेट झालेले असतात. उदाहरणार्थ, वर्तमानपत्रात एखादे सदर देशांच्या दोनशे-तीनशे वर्तमानपत्रात एकदम येत असते. अशा स्तंभलेखकाला सिंडिकेट कॉलमिस्ट म्हणतात. असल्या स्तंभलेखकाला किती प्रसिद्धी, किती पैसा मिळत असेल याची सहज कल्पना येईल. तर अलीकडे अमेरिकेमध्ये डाएटचे फॅड चालले आहे. तसे डाएटचे फॅड नेहमीच तिकडे असते म्हणा. आता तिकडे जेन ब्रॉडी नावाच्या बाई समतोल आहारावर एक सिंडिकेट कॉलम लिहीत आहेत. ह्या बाई एक नवीन पुस्तक लिहीत आहेत. पुस्तकाचे नाव आहे जेन ब्रॉडीज न्युट्रिशन बुक. या पुस्तकाला प्रस्थापित डॉक्टर्सनी फारशी दाद दिली नसली तरी तरुण पिढीचे डॉक्टर्स त्यांचे म्हणणे नीट ऐकून घेत आहेत.

डेफिनेटिव्ह बायोग्राफी, सायको बायोग्राफी वगैरेविषयी आपण वाचतो. तसाच एक ओरल बायोग्राफीचा प्रकार आहे. स्वतःच्या आयुष्याविषयी दुसऱ्या लेखकाला तोंडी सांगणे यावरून हा प्रकार आला असावा. थोड्याच दिवसात Lynidon—an Oral Biography हे मर्ल मिलरनी लिहिलेले पुस्तक बाजारात येणार आहे. याच लेखकाची श्री. हॅरी ट्रुमनवरची ओरल बायोग्राफी आमच्या ग्रंथालयात चांगलीच वाचली गेली होती.

—जे. एन. पोंडा.

Parkerson 176

# 'आक्रोश : दुसऱ्या वेळी पाहिला तेव्हा....

शिरीष सहस्त्रबुद्धे

'आक्रोश'च्या निमित्तानं लिहिणं जरुरीचं वाटलं, ते काही फक्त त्याला अलीकडच्या चित्रपटमहोत्सवात सुवर्णमयूर पारितोषिक लाभलं म्हणूनच नव्हे. ते झालं तात्कालिक निमित्त. असे पुरस्कार या चित्रपटाला आणखीही मिळणं सहज शक्य आहे. महत्त्वाची गोष्ट ही की, हा चित्रपट परवा दुसऱ्यांदा पाहिला आणि तेव्हाही तो पहिल्या वेळेइतकाच सुन्न करणारा अनुभव ठरला. अशा कलाकृती सहजासहजी भेटत नाहीत. आपल्या सगळ्या मानसिक–बौद्धिक शक्ती एकवटून ज्याचा वेध–आस्वाद घ्यावा असं खाद्य वारंवार पुरविण्याइतकी हिंदी चित्रसृष्टी श्रीमंत नाही. 'आक्रोश'चं मोठं यश इथंच आहे. भारावून जाण्याइतकंही भान प्रेक्षकाला राहू न देणारी ही कलाकृती काहीशा संथपणे सुरू होते खरी; पण त्यातल्या मुख्य संघर्षाला एकदा तोंड लागल्यानंतर मात्र महापुरातल्या भोवऱ्यात फिरणाऱ्या माणसाप्रमाणे आपली अवस्था होते. समाजातल्या अतिशय हक्कदारवर्गापैकी एक आणि अत्यंत वंचित वर्गापैकी एक यांच्यातलं हे मूक ठिणग्या उडवणारं घर्षण कडकडून अस्वस्थ तर करतंच; पण अखेरीस संवेदनाक्षमतेला बधिर करूनच थांबतं. प्रामाणिकपणे असं वाटतं की, 'आक्रोश' पाहूनही जर कुणी निर्लेप, निर्विकार मनानं बाहेर पडू शकत असेल, तर त्यानं आपल्याच संवेदनशीलतेची मोजमापं नव्यानं घ्यायला हवीत.

'आक्रोश'चं हे सामर्थ्य कुठून आलं, त्याचं उगमस्थान कोणतं, याचा विचार मी करतो, तेव्हा असं वाटतं की, त्याचा शोध या चित्रपटाच्या जातकुळीपर्यंतच जाऊनच घेतला पाहिजे. हिंदी चित्रपटांच्या साचेबंद आकृतिबंधाहून सर्वस्वी वेगळा असा जो वास्तवनिष्ठ आकृतिबंध श्याम बेनेगल यांनी 'अंकुर' या चित्रपटाच्या रूपानं दिला त्याचं शिखर 'आक्रोश'च्या रूपानं गाठलं गेलं आहे, असं याबाबतीत म्हणता येईल. अर्थात या विधानाला काही सावध तळटीपा जोडणं जरुरीचं आहे. उदाहरणार्थ बेनेगल पठडी व 'आक्रोश' यांचा नक्की संबंध काय याचं पुरेसं स्पष्टीकरण; पण बाद टाळून एवढं निश्चित म्हणता येईल की, 'अंकुर'नं सहाएक वर्षांपूर्वी जो क्रांतिकारक बदल भारतीय चित्रसृष्टीत घडवून आणला त्याची एक परिणती 'आक्रोश'ने दाखवून दिली आहे. सामाजिक वास्तवात भिनलेल्या कलापरंपरेचा पाया समकालीन हिंदी चित्रसृष्टीत श्याम बेनेगल यांनी घातला आणि बंगाली चित्रसृष्टीची त्याबाबतची मक्तेदारी मोडली. आपणा सर्वांच्या सुदैवानं 'अंकुर' हा अपवादात्मक चित्रपट राहिला नाही, तर तो एका चित्रपटमालिकेमधला पहिला दुवा ठरला. 'निशांत', 'मंथन', 'भूमिका' आणि 'जुनून' हे चार वेगवेगळ्या प्रकृतीचे चित्रपट बेनेगल यांनी नंतर दिले, तरी तत्कालीन सामाजिक वास्तवाला धीटपणे सामावून घेण्याची त्यांची मूळ बैठक पक्की राहिली. 'अंकुर', 'निशांत' आणि 'मंथन' या तीनही चित्रपटांच्या कथावस्तूचा मुख्य घटक ग्रामीण भारतातली हलाखी आणि पिळवणूक हा असला तरी रुक्ष सरकारी अनुबोधपटांचं स्वरूप त्याना येणार नाही, याची पुरेशी दक्षता घेण्यात आलेली होती. 'भूमिका' आणि 'जुनून' यांनी घटितांचं पुनर्निर्माणही स्वतंत्र पर्स्पेक्टिव्हमधून आणि भावविवशता टाळून करता येतं याची साक्ष दिली. नव्या वाटा चोखाळणाऱ्या चित्रपटाच्या वाटयाला अपरिहार्यपणे येणारा भोग म्हणजे मर्यादित आर्थिक यश. बेनेगल यांच्या चित्रांनाही मध्यम प्रतिसाद मिळाला असला तरी बेगडी धंदेवाईक कल्पनांची जी चौकट हिंदी चित्रपटाच्या गळ्याभोवती घट्ट आवळली गेली होती, तिची पकड सैल करायला तो पुरेसा होता. बेनेगल यांच्या या सर्व चित्रपटांचं देखणं आणि समजदार छायालेखन करणारे श्री. गोविंद निहलानी यांनीच 'आक्रोश' दिग्दर्शित केलेला आहे. तेव्हा बेनेगल स्कूल ऑफ आर्टचे वरीलपैकी काही गुणविशेष 'आक्रोश'मध्ये उमटलेले दिसणं अशक्य नाही व गैरही नाही; पण 'अंकुर ते आक्रोश' असा प्रवास रेखाटायचा झाला तर असं म्हणावंसं वाटतं की, 'आक्रोश'चा उद्भव 'अंकुर' कुटुंबात झाला असला तरी तो सर्वस्वी बेनेगल यांच्या धाटणीचा चित्रपट नव्हे. आवश्यक तिथं हा चित्रपट बेनेगल-शैलीला मुरड घालतो किंवा ती वाट सोडून देऊनच वेगळी वाट धरतो. उदाहरणार्थ, बेनेगल यांचे चित्रपट वास्तववादी असतात असं म्हटलं तरीही पडद्यावर मांडताना सोयिस्कर ठरेल एवढं वास्तवाचं नाट्यीकरण त्यात येतंच. 'अंकुर'चं शेवटचं दृश्य या दृष्टीनं आठवून पाहावं. घडणारं ते घडून गेल्यानंतर एकटाच मुलगा एकच दगड जमीनदाराच्या घराच्या काचेवर भिरकावतो, हे रेखीव, नीटस दृश्य प्रतीकात्मक मानलं किंवा न मानलं तरी त्याचा योजून आणलेला नाट्यपूर्ण प्रभाव लपत नाही. 'आक्रोश'चा सरळसोट शेवट आठवला आणि या दोन शेवटांची तुलना केली म्हणजे जाणवतं की, अशी हिशेबी नाट्यमयता निहलानी यांनी 'आक्रोश'मध्ये कमीत कमी ठेवली आहे. पारिभाषिक शब्द (दुर्दैवानं इंग्लिश!) वापरून बोलायचं तर असं म्हणता येईल की, बेनेगल व 'अंकुर' यांची रिॲलिस्टिक शैली टाकून निहलानी नॅचरॅलिस्टिक शैलीकडेच स्पष्टपणे झुकले आहेत. ही शैली आपल्याकडे चित्रपटात तरी फारशी रुजलेली नाही व आपल्या प्रेक्षकवर्गाला ठणठणीत वस्तुनिष्ठतेपेक्षा प्रभात / व्ही. शांतारामछाप शर्करावगुंठित गुटिकांचीच रुची जास्त आहे. त्यामुळे 'मंथन', 'सिंहासन' यासारखे थेट मुद्द्याला भिडणारे चित्रपट 'डॉक्युमेन्टरीज' म्हणून नापास होतात, तर 'आक्रोश'सारख्या अनलंकृत कलाकृतीची संभावना 'भडक' म्हणून

केली जाते, हे दुर्दैव! परंतु 'आक्रोश' मात्र खरोखरीच एखादा आदिम वास्तुकलेचा नमुना असावा तसा उघडाबोडका, उग्र आणि सघन असा चित्रपट आहे. 'प्रेक्षकाना सतत तणावाखाली ठेवू नये, अधूनमधून 'रिलीफ' द्यावा', असली तकलादू पथ्यं इथं साभाळलेली नाहीत. आयुष्याला बगल देण्यातच वाकबगार असलेल्या पिढ्यांना जीव की प्राण वाटणाऱ्या 'सूचकता' नामक वयोवृद्ध मूल्याचा फारसा आब इथं राखण्यात आलेला नाही. (या दोन मुद्द्यांच्या संदर्भात, 'आक्रोश'मधल्या अनेकांना आक्षेपार्ह वाटलेल्या दोन दृश्यांचा उल्लेख करायला हवा. पहिला प्रसंग अर्थातच लावणी-नृत्याचा. हे नृत्य तडजोड म्हणून, रिलीफ म्हणून आलेलं आहे का? ही लावणी पहिल्यापासून शेवटपर्यंत दाखविण्यात आलेली नाही, हे लक्षात घेतलं पाहिजे. जो मोठा भाग दाखविला आहे त्याचाही वापर, वकील भास्कर कुलकर्णी (नासिरुद्दिन शाह) याला डॉ. पाटील (अरविंद देशपांडे) आणि त्याच्या साथीदार गुंडांचं 'नाइटलाइफ दाखविण्यासाठी दिग्दर्शकानं करून घेतला आहे. आणखी असं की, दिग्दर्शक एका मध्यम गावाच्या संपूर्ण वातावरणाचा 'फील' प्रेक्षकाना देतोय, त्यात एकीकडे मद्यधुंद गावगुंड लावणी पाहात विचकट बोलताहेत आणि दुसरीकडे अन्यायाविरुद्ध उठलेल्या तरुण वकिलावर चाकूहल्ला होतोय या दोन्ही घटनांना महत्त्व आहे. लावणीऐवजी भजन दाखवलं असतं तर यातली पहिली घटना निकालातच निघाली नसती काय? दुसरा आक्षेपार्ह प्रसंग म्हणजे आदिवासी लहान्या (ओम पुरी) आणि त्याची बायको नागी (स्मिता पाटील) यांच्यातील शरीरसंबंधाचं दीर्घ दृश्य–ज्याचा 'आक्रोश'ला 'ए' सर्टिफिकेट मिळवून देण्यात सिंहाचा वाटा असणार! माझ्या मते या चित्रपटातल्या उत्कृष्ट ट्रॅजिक प्रसंगांपैकी एक, अशीच या दृश्याची नोंद करावी लागेल. सेक्स अपील तर त्याला काडीचंही नाही–किंबहुना सेक्सचा इथ प्रश्नच येत नाही. ज्या पातळीला आदिवासी जगतात, ती मनुष्य आणि पशू यांच्या सीमारेषेवर रेंगाळणारी पातळी या शरीरसंबंधातून जेवढ्या प्रकर्षानं जाणवते आणि त्या पातळीवरही संरक्षणाला असमर्थ असल्याची त्या दोघाचीही तडफड त्यातून जेवढ्या तीव्रतेनं व्यक्त होते, ती एरवी कशाद्वारे झाली असती? सघटित जुलुमापुढे असहाय झालेल्या दोन दुबळ्या व्यक्तीच हे एकत्र येणं म्हणजे आपली लाजिरवाणी दीनता शारीरपातळीवर क्षणभर विसरण्याचा बहाणाच. अशी दृश्यं दुर्मिळ असावीत व आक्षेपार्ह ठरावीत आणि दुसरीकडे याहीपेक्षा भडक, उत्तान दृश्यं सूचकतेच्या नावाखाली धंदेवाईक सिनेमात बेधडक विकली जावीत ही विसंगती म्हणजे समाजाची नैतिक आणि कलात्मक अभिरुची घसरणीला लागल्याचा पुरावाच नव्हे काय?

## 'जैत'छाप दुराग्रह नाही

वर उल्लेखिलेले वेगळेपण 'आक्रोश'मध्ये असूनही, आपल्या प्रायोगिकतेचा अभिनिवेश लेखक-दिग्दर्शकांनी त्यात कुठेही डोकावू दिलेला नाही, हे 'आक्रोश'चं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आणि त्याचबरोबर बेनेगल–पठडीपासून त्याच एक निराळेपण. 'आपल्याला काही तरी वेगळं द्यायचंय्' 'आपण काही तरी निराळा प्रयोग करतोय्' याची अभिनिवेशयुक्त जाणीव बेनेगल यांच्या हाताळणीत कळत–नकळत डोकावत असते. 'भूमिका' चित्रपटात हे सर्वाधिक जाणवते. गुलजारचा 'अचानक' हा चित्रपट हे दुसरं उदाहरण. 'जैत रे जैत' हे तिसरं, मराठीतलं अगदी नामांकित उदाहरण. 'आक्रोश'ची मांडणी सरळसोट आहे आणि कृत्रिम क्लृप्त्यांना त्यात वाव मिळालेला नाही. 'चित्रपटाच्या प्रत्येक फ्रेममध्ये दिग्दर्शकाची 'सावली पडलेली दिसलीच पाहिजे' असा 'जैत' छाप दुराग्रह निहलानीना सुचू नये, हे सुदैवच. बेनेगल याच्या आरंभीच्या चित्रात (किंबहुना 'जुनून' वगळता सर्वच चित्रात) कमीअधिक आढळणारा अभिनिवेश असतो तो प्रादेशिकतेचा. चित्रपटातील विषयवस्तू व्यापक असूनही बेनेगल प्रादेशिक तपशिलाशी स्वतःला आग्रहपूर्वक जुंपून घेत असल्याचे 'अंकुर'मध्येही जाणवते. निहलानींच्या 'आक्रोश'चा उपनायक आदिवासीच असल्याने प्रादेशिकतेची बाधिलकी त्यांनी सर्वस्वी पत्करली असती तरीही त्याना दोष देणे अवघडच झाले असते. तथापी विशिष्ट प्रादेशिक तपशील (उदाहरणार्थ, आदिवासीच्या जीवनप्रणालीतले बारकावे) कमीत कमी वापरून निहलानींनी आपल्या पात्रासमोरच्या समस्या अधिक व्यापक पायावर उभ्या केल्या आहेत. साहजिक अन्याय–अत्याचार हा स्थानिक अपघात न राहता सार्वत्रिक नियम म्हणून प्रोजेक्ट करणं त्याना शक्य झालेलं आहे. त्यातच त्यानी टाकलेलं पुढचं पाऊल म्हणजे चित्रकथेच्या केंद्रस्थानी असलेल्या अत्याचाराला त्यांनी बेनेगलच्या चित्रपटातील अत्याचारापेक्षा व्यापक परिमाण प्राप्त करून दिलं. म्हणजे असं की, बेनेगलच्या चित्रपटातील अन्याय–जुलुमाचा उगम प्रथम स्त्रीविषयीच्या वैयक्तिक आकर्षणातून होतो. जसं 'निशात'-मध्ये गुंड जमीनदारानी शाळामास्तरच्या पत्नीला वैयक्तिक वासनेपोटी पळवून नेल आणि त्यातून असतोषाची ठिणगी पडली. निहलानी 'आक्रोश'मध्ये भर देतात तो प्रचलित व्यवस्थेवर–ज्या व्यवस्थेने एका वर्गाला दुसऱ्या समाजघटकाला पायदळी तुडविण्याचा अलिखित परवानाच दिला आहे. मग नागी लहान्या या एका स्त्रीवरचा अत्याचार हा महत्त्वाचा असला तरी केंद्रबिंदू ठरत नाही. एकंदर जुलुमाची ती एक विधा, एक व्हरायटी बनते. नागीचं शोषण एका प्रकारे झाल, लहान्याचं दुसऱ्या प्रकारे, त्याच्या म्हाताऱ्या बापाचं तिसऱ्या तऱ्हेनं, हकनाक अमानुष मरण आलेल्या त्याच्या बहिणीच आणखी एक तऱ्हेन. फार काय, आदिवासी नसलेला पण त्याच्यात काम करणारा अनाम नक्षलवादी कार्यकर्ता, आदिवासीचं गाऱ्हाणं वेशीवर टागायला जाणारा पत्रकार आणि त्याच्या बाजूनं कोर्टात उभा राहणारा वकील भास्कर कुलकर्णी या नागर व्यक्तींनाही, त्याच शोषक, अत्याचारी व्यवस्थेकडून भरडून काढलं जातं. समर्थ–संपन्न समाजघटकाच्या–प्रिव्हिलेजड् क्लासच्या–सर्वंकष शक्तीचा बुलडोझर इथं मोकाट सुटला आहे.. वाटेत येईल त्याला तो समभावान जमीनदोस्त करणार! अशा सत्ताधाऱ्याना न्यायव्यवस्थेचाही अंकुश लागू पडत नाही. कारण कायद्याचे रखवालदार ते त्यांचे लुटीतले भागीदार आणि कोर्टात उभे राहणारे साक्षीदार म्हणजे पै-पैशावर नाचणाऱ्या कळसूत्री बाहुल्या. तेव्हा निहलानींनी आपला 'कॅनव्हस' तर भलामोठा निवडला आहे. समाजव्यवस्था (जातीजमातीची उतरंड), राज्यव्यवस्था (लोक-

तिनिधी व पोलीस) आणि न्यायव्यवस्था अशा तीन महत्त्वाच्या व्यवस्थाची टक्कर (confrontation) निहलानी चितारतात तेव्हा *विजय तेंडुलकरानी आणि त्यांनी चित्रपटाची संरचना* (स्ट्रक्चर) काळजीपूर्वक उभारलेली असल्याची जाणीव होते. म्हणजे असं की, नागीवर बलात्कार करणाऱ्या चौकडीत एक पोलीस-अधिकारी, एक फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर, गावातला बडा डॉक्टर आणि जिल्हा परिषदेचा सभापती अशा धेडांचा समावेश आहे. डी.एस.पी. त्यांच्या बैठकीतलेच असल्याने मित्राच्या संरक्षणाला सज्ज आहेत, तेव्हा गुन्ह्याच्या तपासात पोलिसांकडून कुचराई होणे ओघानंच आलं. शिवाय या सर्वांवर वरदहस्त आहे तो तालुक्याचे आमदारजी गणपतरावजी यांचा. निष्णात सरकारी वकील प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे त्याना कायद्याचं पाठबळ पुरवायची कामगिरी बजावताहेत. हे वकील–श्री. दुसाने–स्वतः आदिवासीतूनच आलेले असल्यानं ते 'राजापेक्षाही राजनिष्ठ' असावेत आणि स्वजनद्रोहाचं मिथ्यासमर्थन (–रॅशनलायझेशन–) करायलाही मन पूर्वक सिद्ध असावेत, यात नवल नाही आणि यांच्याशी लढत द्यायला उभे कोण? तर बायकोच्या खुनाचा धडधडीत खोटा आरोप माथी घेऊन मूकव्रत धारण केलेला अडाणी, गरीब लहान्या आणि त्याच्या बाजूनं, प्रथम करियरसाठी, मग कर्तव्यबुद्धीनं आणि अखेरीस धर्मयुद्धासाठी उभा राहणारा नवथर वकील भास्कर कुलकर्णी. देहानं दुबळा आणि मनानं भित्रा असलेला हा तरुण वकील, *ज्याच्या मध्यमवर्गीय रक्तात* नुसताच स्वार्थ नाही, कुठे तरी तत्त्वनिष्ठेच्याही पेशी आहेत. नक्षलवादी कार्यकर्त्याप्रमाणे संपूर्ण व्यवस्थेच्याच विरोधात स्वतःला झोकून द्यायची भास्करची हिंमत नसली तरी आपल्या परिघात घडणाऱ्या धडपडीत अन्यायाकडेही डोळेझाक करण्याइतका तो मुर्दाडही नाही. तेव्हा स्वसंरक्षणाविषयी असहाय–उदासीन बनलेल्या आदिवासीच्या बचावासाठी एक तथाकथित उच्चवर्णीय तरुण उभा राहतो, तर तथाकथित उच्चवर्णीयांच्या अत्याचाराला कायदेशीर संरक्षण देण्यासाठी एक आदिवासीच पुढे सरसावतो !

*या विषम झुंजीतून अखेर निष्पन्न काय होतं ?*

–'आक्रोश'चं अंतिम मूल्यमापन तुम्ही कसं करणार, हे या प्रश्नाला *ज्यानं त्यानं* दिलेल्या उत्तरावरून ठरेल. माझ्यापुरती प्रतिक्रिया अशी की माझ्या लेखी 'आक्रोश' हा स्वच्छ नकारात्मक–negativist–चित्रपट आहे. 'आक्रोश'ची ही नकारात्मता हे त्याचं बेनेगल स्कूलपासूनचं सर्वात ठळक वेगळेपण आहे 'आक्रोश'ची शैली नॅचरलिस्टिक वाटल्याचा उल्लेख मी मागे केला त्याचा ही नकारात्मता हा एक मोठा पुरावा आहे म्हणजे असं की, वास्तव लोकव्यवहारात जिला क्वचितच जागा असते अशी भ्रामक आशा जशी ('अंतिम विजय सत्याचाच', 'Murder will out') चित्रपट–नाटकात आणि कथा–कादंबऱ्यात मात्र बिनचूक भेटते, तसा वेगडीपणा 'आक्रोश'मध्ये नाही. 'आक्रोश'चा शेवट वैशिष्ट्यपूर्ण आहे—म्हणजे अर्धवट, अपूर्ण सोडलेला आहे. लहान्यावरच्या दोन्ही खुनाच्या आरोपांचे खटले, परिणामांची तमा न बाळगता लढण्याचं भास्कर ठरवतो इथं चित्रपट संपतो. चित्रपट संपवायला इतकी नेमकी जागा दुसरी सापडणं दुरापास्तच. सर्वसामान्य हिंदी निर्मात्या–दिग्दर्शक–लेखकांप्रमाणे, *'आपल्या प्रेक्षकांचं सरासरी मानसिक* वय पंधराच्या आगेमागे असून त्याना प्रत्येक गोष्ट अक्षरलिपीतल्या मुळाक्षराइतकी ढोबळ करूनच दाखवायला हवी' अशी तेंडुलकर–निहालानीची *धारणा नाही, याचा प्रत्यय* 'आक्रोश'च्या शेवटावरून येतो. मागे प्रश्न उरतात की लहान्याचं पुढं काय होईल? आणि त्याहीपेक्षा, भास्करच्या रूपानं विद्रोहाचा जो एक दुबळा का होईना पण कोंब, दडपशाहीच्या रेताड वाळवटाला छेदून फुटू पाहतो आहे त्याचं पुढं काय होईल? बहुसंख्य शोषिताचा आक्रोश मूठभर शोषकांच्या दहशतीच्या झंझावातात सदैव असाच विरून जाईल काय ?

'आक्रोश'नं उभे केलेले हे प्रश्न एकाच वेळी आपल्या देशकाळातलेही आहेत आणि शाश्वतचेही आहेत. नागी *लहान्याच्या बलात्काराबद्दल बोलताना सरकारी वकील* दुसाने (अमरीश पुरी) थंड, निर्विकार आवाजात 'औरतो के साथ हमेशा यही होता आया है' असा शेरा मारून हात झटकतो तेव्हा ती त्याची एकट्याची बेपर्वाई नसते. एका संपूर्ण जनसमूहाचा दीर्घकालीन दृष्टिकोनच त्याच्याकडून व्यक्त होत असतो; ज्या दृष्टिकोनातून आपल्या देशातली स्त्रियांवरच्या अत्याचाराची समस्या निर्माण झाली आहे आणि ज्या दृष्टिकोनातून स्त्री ही सदैव आणि सर्वत्र उपभोग्य मालमत्ताच मानली गेली आहे. या साऱ्या प्रश्नजंजाळाला 'आक्रोश'चा प्रतिसाद काय आहे? किंवा काय असावा ?

## एक जीवघेणी कोंडी

असं दिसतं की, तेंडुलकर-निहलानी प्रभृतींनी प्रश्न उभे करणं–किंबहुना दखलपात्र प्रश्न काणाडोळा करणाऱ्या समाजघटकांच्या रोखानं फेकून मारणं–हे आपलं प्रधान उद्दिष्ट मानलेलं असावं. त्यामुळे त्याना अमुकच उत्तर अभिप्रेत असणार असा युक्तिवाद करणं निरर्थक आहे. सबब प्रत्येक प्रेक्षकाला आपलं उत्तर शोधण्याचं आव्हान आहे आणि आपलं ते आपल्यापुरतं खरं मानण्याची मुभाही आहे. मला प्रतीत झालं ते असं की, चित्रपटाचा open–ended शेवट मान्य करूनही, *त्याचा तोल ढळला आहे तो वैफल्याच्याच* दिशेने. भाबड्या आस्तिक्य बुद्धीच्या दिशेने नव्हे. हे वैफल्यही आरामखुर्चीत बसून येणारं फॅशनेबल वैराग्य नव्हे. धडपडणाऱ्या माणसाच्याच वाट्याला येईल असं हे वैफल्य आहे. एखाद्या पटाईत पारध्यासारखा आपला फास परिस्थितीनं चोहो बाजूनी आवळत आणला आहे. पायातली चळवळीची ताकद संपली अस नाही; पण धावण्याजोगी दिशाच शिल्लक नाही. का पळायचं, किती आणि कुठवर *पळायचं याचे हिशेब मनात पक्के आहेत असंही नाही.* साराश, एक जीवघेणी कोंडी. लहान्या आणि भास्कर हे एकाच समाजातल्या दोन जगाचे प्रतिनिधी *अशा कोंडीची शिकार ठरले आहेत. लहान्याचा* मुकेपणा हा अशा कोंडीचा एक जळजळीत परिणाम. ही कोंडी एकदाची फोडण्याचा त्याचा मार्गही आत्यंतिक निराशेपोटीच सुचलेला: बहिणीचा खून– त्याच्या दृष्टीनं भवितव्यातल्या विटंबनेतून तिची मुक्तता आणि पर्यायानं आपल्या फाशीवर स्वहस्ते शिक्कामोर्तब. पिढ्यान्‌पिढ्या सोसलेल्या जुलुमाविरुद्धच्या *त्याच्या प्रतिक्रियाही* मोजक्याच आणि वाझ! एखाद्या बेभान जखमी जनावरागत एकदाच *केलेला अनावर आक्रोश. म्हणजे काही क्षणिक ध्वनिलहरी,*

ज्यांचा अर्थ समजावून घ्यायची धडपड कुणीच करणार नाही. एवढं खरं की, भास्करच्या काळजात ठिणगी टाकायचं काम त्यांनीच केलं; पण त्या एकाकी ठिणगीतून विद्रोही वणवा भडकायची शक्यता कितपत म्हणता येईल ? आसपासच्या परिस्थितीची साक्ष ' शक्यता नगण्य ' अशीच आहे. आजवर असे अनेक भास्कर या परिस्थितीच्या दलदल-डोहात अस्ताला गेलेले आपण पाहिले । ऐकले आहेत. आदिवासींना ' भडकावू ' बघणारा नक्षलवादी कार्यकर्ता अचानक नाहीसा झाल्याची बातमी खुद्द भास्करला सहेतुकपणे सागण्यात आलेलीच आहे. भास्करनं लढण्याचा हेका धरलाच, तर त्याचाही शेवट असाच काही होणार नाही काय ? या अभिमन्यूसाठी चक्रव्यूह केव्हाचा रचून तयार आहे आणि तो झुंजीत पतन पावला तर ते वीरमरण नसून निव्वळ अपघात आहे, असा हवाला देणारे विकाऊ साक्षीदारही सज्ज आहेत. चिवट आस्तिक्यबुद्धीच्या माणसालाही जाणवावं इतक्या कठोरपणे ' आक्रोश ' भोळसट आशाळभूतपणाचे दरवाजे एकेक बद करीत जातो. स्वप्नाळू ध्येयवादाला इथं स्थान नाही. पर्यायी समाजरचनेचा संकल्प सोडण्याइतकं सामर्थ्य कुठंच नाही. भास्करसारख्या एखाद्याला इतक्याउप्परही लढावंसं— निदान ताठ उभं रहावंसं वाटतं, हा एकुलता एक आशेचा किरण; पण या निबिड अंधारविश्वाला तो कितीसा उजळील ? किती वेळ उजळील ?

तेहतीस वर्षांच्या स्वतंत्र अस्तित्वाचा उपभोग घेतल्यानंतर, व्यक्तिगत आणि सामूहिक आयुष्यातले नाना परीचे बरेवाईट अनुभव घेतल्या-पाहिल्यानंतर येणारी ही सखोल नकारात्मता ' आक्रोश 'ला बेनेगल स्कूलच्या चित्रपटांपासून पुष्कळ दूर घेऊन जाते. हताश, हतवीर्य करून टाकणारे अनुभव बेनेगल यांनी आपल्या चित्रपटात साकारले नाहीत असं नाही; पण या वस्तुनिष्ठ चित्रणाला नेहमी (व्यक्तिगत ?) आशावादाची एक उजळ किनार लाभलेली असे. बेनेगल आपल्या चित्रपटाचे शेवट कधी अपुरे सोडीत नाहीत हे या दृष्टीनं लक्षात घेण्यासारखं आहे. चक्रावून, भेडसावून टाकणाऱ्या सवालांना आपल्या परीनं उत्तर शोधायचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केलेला आहे. हा निर्णय अखेरीस ज्या त्या कलाकाराच्या जीवनदृष्टी-vision of life— वर अवलंबून असतो बेनेगल यांची अशी व्हिजन, मागे उल्लेखिलेल्या 'अंकुर' चित्रपटाच्या शेवटी काहीशी अंधुकपणेच येऊन गेली. 'अंकुर' या पहिल्या चित्रपटात शेवटीच आढळणारी आशावादाची ही चमक ' निशांत ' मध्ये ठळकपणे उमटली. अन्यायाविरुद्धच्या व्यक्तिगत प्रक्षोभाकडून सामूहिक उद्रेकापर्यंत तिचा प्रवास झाला. अत्याचारी जमीनदार कुटुंबाविरुद्ध आख्खा गावच तिथं बंड करून उठला आणि जमावनीतीला शोभेलशा पद्धतीनंच अत्याचाऱ्यांचा सूड घेतला गेला. असं बंड आजवर या देशातल्या किती गावात प्रत्यक्षात होऊ शकलं आहे, ह्या प्रश्नापेक्षा अर्थातच कलाकाराची विध्यर्थी जीवनदृष्टी बलवत्तर ठरली. ' मंथन ' या बेनेगल यांच्या पुढच्या चित्रपटात तर या प्रकाशसन्मुख दृष्टीनं संपूर्ण चित्रपटाला केंद्रस्थानी असलेल्या आदर्शवादी स्वप्नाचं रूप धारण केलं. मोडतोड आणि सूड-हिंसेकडून बेनेगल यांनी पर्यायी समाजरचनेच्या स्वप्नापर्यंत मजल मारली. ' मंथन ' हा कमालीचा positivist चित्रपट होता. त्याला एक निश्चित संदेश होता. त्याचं महत्त्व कमी लेखायचा प्रयत्न नाही. अखेर पर्यायी आर्थिक-सामाजिक रचनेसारख्या विषयाला चित्रपटमाध्यमातून हात घालणारे तरी किती जण भेटतील ? सहकारी चळवळीतल्या यशापयशाकडून बेनेगल एकदम ' भूमिका 'सारख्या चरित्रात्मक कयेकडे वळले. हा चित्रपट आधीच्यापेक्षा वेगळ्या श्रेणीत मोडणारा असला; तरी त्याचाही शेवट कटु नसण्यावर कटाक्ष दिसला. एवढंच नव्हे, तर ज्यावर ' भूमिका ' आधारलेला होता, त्या ' सांगत्ये ऐका ' या हंसा वाडकरच्या आत्मचरित्रातली उग्रता आणि अनुभवातली कडवट धार चित्रपटात बरीच सौम्य होऊन आली अशी टीकाही या वेळी झाली. चरित्र व चित्रपट यांची तुलना करायचीच झाली, तर ती टीका रास्तही होती. ' जुनून 'सारख्या विशिष्ट ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या चित्रपटात कलाकाराचा जीवनविषयक दृष्टिकोन बेतानेच प्रकट होऊ शकत असला, तरी नसिरुद्दिन शाहने प्रभावीपणे साकारलेल्या भूमिकेतून ' बचेंगे तो और भी लढेंगे ' शैलीचा चिवट झुंजार बाणा प्रकर्षानं प्रतिबिंबित झाला होता.

या पार्श्वभूमीवर येणाऱ्या निहलानींच्या (जे बेनेगल चित्रनिर्मितीचे अविभाज्य घटक म्हणूनच प्रसिद्धीला आले) ' आक्रोश 'मध्ये मात्र कोणत्याही आशावादाला निर्विवाद किंवा निर्णायक स्थान नाही. आमच्या विकल पांढरपेशा आशावादाचा भ्रम खळ्ळकन् फोडणारा हा चित्रपट म्हणूनच आम्हाला जास्त जवळचा, जास्त आमचा वाटला. माझ्या दृष्टीनं ' आक्रोश 'चा नायक आदिवासी लहान्या (ओम पुरी—जो शब्दावाचूनच आपलं व्यथाकांड भरभरून व्यक्त करून गेला) नव्हेच. नायक कुणीएक ठरवायचा झाला तर तो भास्कर कुलकर्णीच असेल. स्वातंत्र्यात जन्मलेल्या आणि स्वतंत्र शिक्षणपद्धतीतून बाहेर पडलेल्या संभ्रान्त पिढीचा हा अस्सल प्रतिनिधी (नासिरुद्दीन शाह त्याच्या या भूमिकेबद्दल भरत अॅवॉर्ड वगैरे घेऊन गेला, तर नवल वाटू नये—) या देशातल्या बहुसंख्यांक सामान्याचा प्रतिनिधी--ज्याची गाठ दैवयोगानं एका असामान्य परिस्थितीशी पडते : कमालीची क्रूर आणि भ्रष्ट दमनयंत्रणा आणि मग सुरुवातीच्या दृश्यात तो समुद्राच्या लाटांत खालीवर घुसळतामा दिसतो, तसाच या परिस्थितीच्या भोवऱ्यातही हातपाय मारीत राहतो—कदाचित थकेपर्यंत मारीत राहील, आधुनिक अभिमन्यू वगैरे होण्यासाठी.

' आक्रोश ' दुसऱ्या वेळी पाहिला, त्यालाही आता पुष्कळ दिवस होऊन गेले; पण काळाबरोबर बाकीचा तपशील पुसट होत गेला तरी प्रतीकात्म वाटावं असं एक जबरदस्त दृश्य मनावर स्वच्छ कोरलं गेलं आहे. भास्कर कुलकर्णीच्या घरावर त्याला दहशत देण्याचा एक मार्ग म्हणून दगडफेक होते, तो प्रसंग. मध्यरात्र उलटून गेलेली. भास्कर झोपायला जात असतानाच पहिला दगड भिरभिरत येऊन खिडकीची काच खळाळून फोडतो आणि मग गारांचा पाऊस पडावा तसा चोहोकडून दगडांचा वर्षाव सुरू होतो. दारावर धडका बसू लागतात टेबलफॅनवर बसलेला एक दगड त्याची घरघर प्रथम मोठी करून मग बद पाडतो. भास्करचा खोलीच्या कोपऱ्यात एव्हाना भीतीनं निव्वळ लोळागोळा झालेला आहे. निर्जन भागातल्या या अनपेक्षित संकटाचा सगळा भेसूरपणा त्याच्या घामेजलेल्या चेहऱ्यावर थबथबून आला आहे—नासिरुद्दिन शाहचा हा एक शॉटसुद्धा जिवंत अभिनय म्हणजे काय ते पुराव्यासह दाखवायला जतन करून ठेवावा असा आहे—ती किर्रर रात्र, कुत्र्यांचं भुंकणं, दिवसा प्रसन्न पण या क्षणी भयानक दिसणारा खिडकीबाहेरचा निसर्ग—

आजही एखाद्या मध्यरात्री एकटाच जागा असतो तेव्हा ' आक्रोश 'ची ती रात्र माझ्या सोबतीला असतेच—आमच्या असहाय्यतेची, दुबळेपणाची, भित्रेपणाची जाणीव देत.

आणि ज्या एखाद्या सरत्या संध्याकाळी आयुष्यातलं सगळं रितेपण आणि निरर्थपण चोहोबाजूंनी आपल्यावर येऊन कोसळतं, त्या संध्याकाळवरही ' आक्रोश 'चा ठसा असू शकतो. □

हिंदी चित्रपट

# जीना यहाँ

## बासुदा तुम्ही एवढं निराश करू नका !

एखादं छोटंसं कथाबीज हलक्या-फुलक्या रीतीनं उकलत, भाषणबाजी न करता, फार मोठं तत्त्वज्ञान माथी न मारता व्यवसाय व कलात्मकता यांच्यामध्ये सुरेखसा पूल बांधण्याचं खास तंत्र बासू चटर्जींचं. देशी-विदेशी मोटारींचा पाठलाग, त्यांचं कोसळणं किंवा माँ—बहन याची महती सांगणारा, अश्रूंनी भिजलेला सिनेमा याच्यापेक्षा वेगळं, खुमासदार, चटका लावणारं बासू चटर्जींनी दिलं. रजनी गंधा, छोटीसी बात यांच्या पहिल्या बहरातली खुमारी ओसरत चालली आहे हे आपल्या लक्षात आलं तरी हिंदी चित्रपटांनी आपल्याला बहाल केलेल्या डोकेदुखी, निद्रानाश वगैरे तक्रारीवर ह्या त्यांचा 'जीना यहाँ' चक्क घरगुती मात्रेसारखा वाटतो.

जीवनातल्या अटळ वास्तवाला सामोरं जाण्याचं भान म्हणजे जीना यहाँ. सुखदुःखाशी लपंडाव खेळता खेळता जगणं म्हणजे 'जीना यहाँ.'

यातली लेखा (शबाना) मनाजोगता शेखरसारखा (शेखर कपूर) जोडीदार मिळवून, बंडखोरपणे घराबाहेर पडून छोटा संसार थाटते. लोकलच्या गर्दीचे धक्के खाता खाता, शाळेच्या वह्या तपासता तपासता थकते. मुंबईच्या धामाने उबून गेलेली लेखा चार दिवस सासरी खेडेगावी येते मात्र अन् मग मोकळी हवा श्वासात भरून घेताना तिचा जीव अन् गात्रं सुखावतात. मनसोक्त पाण्यात डुबताना, गच्चीवर उघड्यावर झोपताना, धाकट्या दीर-नणंदांच्या भोवती तिच्या साऱ्या चित्तवृत्ती फुलून येतात.

पण इथलं सुखही दृष्टावलेलं असतं. सासऱ्याच्या रूपानं निष्क्रिय पौरुष, कर्तेपणानं अहंकारलेलं सासूचं स्त्रीत्व, छोट्या दीर-नणंदेचं कोमेजू लागलेलं तारुण्य तिला अस्वस्थ करतं. बायकोच्या दागिन्यांवर नजर ठेवणारा दीर व त्याची साऱ्या तारुण्यसुलभ भावना हरवलेली पत्नी पाहता ती अवाक् होते. नवऱ्याची निराधार विधवा चुलती व तिच्यावर आग पाखडणारी सासू पाहून नदीकिनारी मनसोक्त भटकण्याचा उल्हास मावळतो.

डोकेदुखीचा असह्य त्रास सहन करणारा, फुटक्या चष्म्यानं अभ्यास करणारा दीर तिच्याकडे मोठ्या आशेनं पाहतो. प्रेमात पडलेली तिची छोटी नणंद तिचा आधार मागते. मुंबईतली घुसमट, अपुरी जागा, तीव्र जीवनकलह आठवून लेखा कष्टी होते. तिला त्या दुनियेतले जवळचे चेहरे आठवतात. पतिनिधनाच्या धक्क्यातून सावरलेली, स्वतःची शाळा उभी करणारी शिप्रा (विद्या सिन्हा) घरतातलं मिळकतीचं एकमेव साधन असलेली सुषमा (जरीना वहाब) घरातल्या विरोधाला तोंड देता देता दिनेश (अमोल पालेकर) बरोबर संसाराचं स्वप्न पाहते. अर्ध्या वयातलं बेकारीचं संकट पेलत उभा असलेला तरुण व प्रियकराच्या वचनावर विसंबून वाट पाहणारी तरुणी तिला एक धीर देऊन जातात. चाळीच्या खुराड्यातून दिसणारा आभाळाचा इवलासा तुकडा तिच्या हृदयात खूप धीर आणतो अन् मग अगतिक व्यक्तींना मोकळं करण्यासाठी ती एक पाऊल पुढे टाकते.

मन्नू भंडारीची कथा पटकथा होताना काही वेळा कमालीची संथ वाटते. मुंबईच्या जीवनातल्या लेखाच्या अवती-भवतीच्या व्यक्ती, त्यांचे जीवनातले संदर्भ, घटना ह्या कथेत महत्त्वाच्या असल्या तरी चित्रपटात तुकडेजोड केल्यासारख्या आहेत. मूळ कथेच्या बांधणीत त्याचा उल्लेख महत्त्वाचा असला तरी प्रत्यक्षात मात्र पाहुणे कलाकारांनी नुसती हजेरी लावली आहे असं वाटतं. बासूदाचं कसब असं लचके तोडल्यासारखं फसतं. मध्यंतरविरहित चित्रपटामुळं ते थोडक्यात सुसह्य होतं एवढंच.

लेखाच्या भूमिकेतल्या साऱ्या छटा शबाना दाखवते. मुंबईच्या गर्दीनं थकलेली, खेड्यात सुखावलेली, सासरच्या प्रत्येक व्यक्तीचं मन वाचणारी. शबानाएवढीच एक व्यक्ती लक्षात राहते ती दीना पाठक. सासूच्या भूमिकेतली. घरी बसून खाणाऱ्या नवऱ्याचा प्रपंच करणारी, व्यवहारी पण क्वचित एकटी असता विचाराच्या काहुरात बुडून गेलेली स्त्री दीना पाठकनं काय दिमाखदार केली आहे ? या दोघींनी विद्या सिन्हा, अमोल पालेकर, झरीना वहाब, शेखर कपूर ही गर्दी विसरायला लावली आहे.

किरण वैराळेला स्वतःला जया भादुरी किंवा झरीना वहाब न समजेल तर आशेचा किरण जरूर दिसेल. शेखर कपूर 'पॅंटीन'च्या जाहिरातीत आपल्याला आवडतो तसाच इथंही आवडतो एवढंच.

मुंबईच्या कोलाहलातून के. के. महाजनचा कॅमेरा थेट खेड्यात जातो. मग पाण्यात पडलेल्या हिरव्या झाडाच्या प्रतिबिंबाचा ताजेपणा मनात भरतो. छोट्याशा पायवाटा, नदीकिनारा किंवा उगवती-मावळतीचं आभाळ आपल्या मनात ठेवून जातो.

सलिल चौधरी या नावाभोवती असलेली जादू इथलं संगीत ऐकलं की हरवून जाते. फार वर्षांपूर्वी सवाई गंधर्वपुण्यतिथीला रोशनकुमारीच्या नाचाच्या वेळी स्टेजच्या एका कोपऱ्यातल्या अनेक साजिंद्यांपैकी एक भग्न चेहऱ्याचा 'हुस्नलाल' आहे असे कळल्याबरोबर जो धक्का बसला होता त्याची आठवण आजही विरत नाही. पुढे तो गेला. मृत्यूपेक्षाही त्याच्यासारख्याने कोपऱ्यातल्या गर्दीत हरवणं भयंकर वाटलं. 'संगीत सलिल चौधरी' असं पड्यावर झळकणं हे असंच काहीसं वाटतंय.

हिंदी चित्रपटाच्या गर्दीत बासूदाचा हा चित्रपट थोडासा सुखावून जात असला तरी रिकामं थिएटर फार सांगून जात होतं. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा दाखला देणाऱ्या निर्मात्यांना प्रेक्षक हे उत्तर नेहमी देत आले आहेत. 'शोले'ला प्रचंड गर्दी करणारे प्रेक्षक 'शान'ला निर्दयपणे फेकून देतात. 'दीवार' वर खूष असलेला प्रेक्षक 'ईमानधरम' कडे चुकूनही फिरकत नाही. अमिताभच्या हर अदांवर लट्टू असणाऱ्यांनी 'आलाप'ला विलाप काढायला लावले. रजनीगंधाच्या सुवासाने सुखावलेल्या प्रेक्षकांना बासूदा तुम्ही एवढं निराश करू नका...

—सुलभा तेरणीकर

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

# तत्परतेने कर जमा करा!

* त्यामुळे व्याज आणि दंडाची बचत होते.
* ताण आणि काळजी टळते.
* हे चांगल्या नागरिकत्वाचे लक्षण आहे.
* राष्ट्रनिर्मितीसाठी साधनसामग्री गोळा करण्यास मदत होते.

कर भरण्यासाठी ठराविक अखेरची तारीख असते. पण अखेरच्या तारखेची वाट पहायची कशाला ?

विलंब केल्यास गफलत होण्याची शक्यता असते !

## योग्य कर भरा : राष्ट्र बलवान करा.

□ निवेदक–

डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन
( रिसर्च, स्टॅटिस्टिक्स ॲंड पब्लिकेशन )
इन्कमटॅक्स डिपार्टमेंट,
नवी दिल्ली ११० ००१

DAVP 80/404